
यशवंतराव चव्हाण
प्रतिष्ठान, मुंबई

# वार्तापत्र

यशवंतराव चव्हाण
३३वी पुण्यतिथी



**श्री. भुजंगराव कुलकर्णी**
माजी सनदी अधिकारी
यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक २०१७ चे मानकरी

# TRIBUTE TO THE WAR HERO



**Marshal of the Indian Air Force**

## Late Arjan Singh

**1919-2017**

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

ट्रस्ट रजि. नं. एफ. १०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि. नं. एम. एम. एच. /बी. ओ. एम. – ५३९/८५
यशवंतराव चव्हाण सेंटर, जन. जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई – ४०० ०२१.
दूरध्वनी क्रमांक : २२०२८५९६, २२८५२०८१, २२०४५६० फॅक्स : २२८५२०८१/८२

### ➢ विश्वस्त मंडळ सदस्य ➢

१. मा. श्री. शरदराव पवार अध्यक्ष
२. मा. श्री. अरुण गुजराथी उपाध्यक्ष
३. मा. सौ. सुप्रिया सुळे कार्याध्यक्ष
४. मा. श्री. श. गं. काळे सरचिटणीस
५. मा. श्री. हेमंत टकले कोषाध्यक्ष
६. मा. श्री. शिवाजीराव पाटील–निलंगेकर
७. मा. श्री. राम प्रधान
८. मा. श्री. वसंतराव कार्लेकर
९. मा. श्री. बी. के. अग्रवाल
१०. मा. श्री. दिलीप वळसे–पाटील
११. मा. श्री. अजित निंबाळकर
१२. मा. श्री. अमित डहाणूकर
१३. मा. श्री. डॉ. समीर दलवाई
१४. मा. श्री. ना. धों. महानोर
१५. मा. सौ. प्रभा कुलकर्णी

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

१६. मा. श्री. नितीन करीर
प्रधान सचिव, नगर विकास विभाग
१७. मा. श्री. एन. जे. जमादार
सचिव व वरिष्ठ विधी सल्लागार

### ➢ कार्यकारिणी मंडळ सदस्य ➢

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. अरुण गुजराथी
३. मा. सौ. सुप्रिया सुळे
४. मा. श्री. श. गं. काळे
५. मा. श्री. हेमंत टकले
६. मा. श्री. जयंत पाटील
७. मा. श्री. राम ताकवले
८. मा. श्री. ना. धों. महानोर
९. मा. श्री. लक्ष्मण माने
१०. मा. श्री. विनायकराव पाटील
११. मा. श्री. के. बी. आवाडे
१२. मा. श्री. प्रकाश कुलकर्णी
१३. मा. श्री. जीवनराव गोरे
१४. मा. श्री. विजय शिर्के
१५. मा. श्री. जयराज साळगांवकर
१६. मा. श्री. गणपतराव अप्पासाहेब पाटील
१७. मा. श्री. राजेश टोपे
१८. मा. श्री. बाळासाहेब ऊर्फ शामराव पां. पाटील
१९. मा. श्री. यशवंतराव गडाख–पाटील
२०. मा. श्री. चंद्रशेखर मारुतराव घुले–पाटील
२१. मा. अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. (पदसिद्ध)

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

२२. मा. श्री. नितीन करीर
प्रधान सचिव, नगर विकास विभाग

### ➢ कार्यकारी समिती ➢

१. मा. श्री. शरदराव पवार अध्यक्ष
२. मा. श्री. अरुण गुजराथी उपाध्यक्ष
३. मा. सौ. सुप्रिया सुळे कार्याध्यक्ष
४. मा. श्री. श. गं. काळे सरचिटणीस
५. मा. श्री. हेमंत टकले कोषाध्यक्ष
६. मा. श्री. अजित निंबाळकर विश्वस्त सदस्य
७. मा. श्री. जीवनराव गोरे सदस्य
८. मा. श्री. यशवंतराव गडाख–पाटील सदस्य

**विभागीय केंद्र**

| | | |
|---|---|---|
| विभागीय केंद्र, कऱ्हाड | अध्यक्ष | श्री. बाळासाहेब ऊर्फ शामराव पां. पाटील |
| विभागीय केंद्र, पुणे | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| विभागीय केंद्र, नागपूर | अध्यक्ष | श्री. गिरीश गांधी |
| विभागीय केंद्र, नाशिक | मानद अध्यक्ष | श्री. विनायकराव पाटील |
| विभागीय केंद्र, रत्नागिरी | अध्यक्ष | श्री. शेखर निकम |
| विभागीय केंद्र, औरंगाबाद | अध्यक्ष | श्री. अंकुशराव कदम |
| विभागीय केंद्र, लातूर | अध्यक्ष | श्री. डॉ. जनार्दन वाघमारे |
| विभागीय केंद्र, अमरावती | अध्यक्ष | – |
| जिल्हा केंद्र, अहमदनगर | अध्यक्ष | श्री. यशवंतराव गडाख–पाटील |
| जिल्हा केंद्र, सोलापूर | अध्यक्ष | श्री. गो. मा. पवार |
| जिल्हा केंद्र, अंबाजोगाई (बीड) | अध्यक्ष | डॉ. द्वारकादास लोहिया |
| जिल्हा केंद्र, ठाणे | अध्यक्ष | श्री. मुरलीधर नाले |
| जिल्हा केंद्र, जळगांव | अध्यक्ष | श्री. रवींद्र प्रल्हादराव पाटील |

**विविध विभाग**

| | | |
|---|---|---|
| सृजन | संकल्पना व संयोजक | सौ. सुप्रिया सुळे |
| शिक्षण | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| | प्रमुख संयोजक | डॉ. वसंत काळपांडे |
| नवमहाराष्ट्र युवा अभियान | संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| | सहसंयोजक | श्री. विश्वास ठाकूर |
| | संघटक | श्री. नीलेश राऊत |
| अपंग हक्क विकास मंच | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| | संयोजक | श्री. विजय कान्हेकर |
| वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| महाराष्ट्र महिला व्यासपीठ | संयोजिका | श्रीमती रेखा नार्वेकर |
| | कार्यकारी संयोजक | श्रीमती ममता कानडे |
| कृषी व सहकार व्यासपीठ | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम | सदस्य सचिव | श्री. म. बा. पवार |

**मध्यवर्ती कार्यालय**

| | | |
|---|---|---|
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व कलादालन रंगस्वर | सरव्यवस्थापक | श्री. विजय देसाई |
| यशवंतराव चव्हाण माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | संचालक | ब्रिगेडिअर श्री. सुशील गुप्तन |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | कार्यक्रम व्यवस्थापक | श्री. दत्ता बाळसराफ |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | वित्त व लेखा व्यवस्थापक | श्री. महेश चव्हाण |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | आस्थापना व्यवस्थापक | श्री. संजय बनसोडे |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | ग्रंथालय संसाधन व ज्ञान व्यवस्थापक | श्री. अनिल पाझारे |
| मानद वास्तु विशारद | | मे. शशी प्रभू ॲण्ड असोसिएट्स |
| सांविधानिक लेखा परीक्षक | मे. सी. व्ही. के. असोसिएट्स, मुंबई | चार्टर्ड अकाउंटंट |
| अंतर्गत हिशेब तपासनीस | मार्क ॲण्ड असोसिएट्स, मुंबई | |

# संपादकीय

आज यशवंतराव चव्हाण साहेबांची ३३ वी पुण्यतिथी आहे. या तीन दशकांच्या कालावधीत १९९० नंतरच्या जागतिकीकरण आणि तंत्रज्ञानाचा वाढता प्रसार यामुळे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात प्रचंड बदल झाले. समाजातील या बदलांना संस्था सकारात्मकतेने सामोरी तर गेलेलीच आहे, पण कित्येक बदलात महत्त्वाची भूमिकाही संस्थेने बजावली.

याच बदलांचा पुढचा टप्पा म्हणजे गेल्या दहा वर्षांत प्रचंड समुदायापर्यंत झपाट्याने पोचलेली आधुनिक संवाद साधने... या तंत्रज्ञानातून नवी पिढी नवी दृष्टी घेऊन आलेली आहे. या पिढीशी संवाद साधण्यास प्रतिष्ठान सातत्याने प्रयत्नशील राहील. 'जागर युवा संवाद' या उपक्रमांच्या माध्यमातून मी व माझ्या सहकाऱ्यांनी अहमदनगर, सोलापूर, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, बीड, औरंगाबाद, जळगाव, नाशिक, रत्नागिरी या जिल्ह्यातील २५,००० महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्याशी जाहीरपणाने व मोकळेपणाने परस्पर संवाद साधला. यातून जशा या पिढीच्या आशा, आकांक्षा व अपेक्षा समजून घेता आल्या तशेच अनेक प्रश्न देखील समोर आले. ज्यांचा पाठपुरावा सुरू आहे.

आनंदाची बाब म्हणजे त्यापैकी काही प्रश्न सोडवण्यात यशही मिळाले. उदाहरणार्थ राज्यातील राष्ट्र पातळीवर उल्लेखनीय कामगिरी केलेल्या खेळाडूंना शासकीय नोकरीमध्ये ५% आरक्षण असते . 'मल्लखांब' या देशी खेळाचे आरक्षण या श्रेणीतून वगळण्याचा निर्णय राज्य शासनाने नुकताच घेतलेला होता. पंढरपूर जिल्हा सोलापूर येथील महाविद्यालयात मी विद्यार्थ्यांसमवेत संवाद साधत असतांना प्रतीक्षा निमगिरे या राष्ट्र पातळीवरील मल्लखांब खेळाडूने ही बाब माझ्या निदर्शनास आणून दिली. शासनाची ही भूमिका अन्यायकारक असून त्यामुळे राज्यातून शेकडो मल्लखांब खेळाडू हे शासकीय नोकरीपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली होती. याबाबत मी प्रतीक्षासह राज्याचे क्रीडामंत्री आ. विनोद तावडे यांची भेट घेऊन 'मल्लखांब खेळास शासकीय कोट्यात समाविष्ट करण्यात यावे,' ही मागणी केली. या पाठपुराव्यामुळे क्रीडा खात्याने मल्लखांब खेळास शासकीय कोट्यात समाविष्ट करण्याचा शासकीय आध्यादेश जारी केला. मला वाटते, राज्यातील मल्लखांब खेळाडूंना न्याय मिळाला; हे या 'जागर युवा संवाद' या उपक्रमाचेच यश आहे.

वर्तमान व भविष्यातील प्रश्नांचा वेध घेणारीही 'विज्ञानगंगा' ही व्याख्यानमाला उत्तम प्रतिसादात सुरू आहे. प्रथम वर्षातील बारा व्याख्याने ग्रंथरूपात लवकरच प्रकाशित करत आहोत.

त्याचबरोबर 'शिक्षण विकास मंचा'च्या वतीने चालविण्यात येणाऱ्या व्हॉट्सॲप ग्रुपच्या चर्चेतील निवडक मुद्यांचे संकलन संपादन करून आजच पुस्तक रूपाने वाचकांसाठी उपलब्ध केले आहे. व्हॉट्सॲप ग्रुपवरील चर्चांचे प्रकाशित होणारे मराठीतील हे पहिलेच पुस्तक असावे. त्याचे श्रेय अर्थातच या क्षेत्रातील आमचे ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. वसंत काळपांडे यांना जाते.

'प्रयोग' मालाड संस्था आणि 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,' मुंबई यांच्या सहकार्याने महाराष्ट्रातील नऊ शहरांमध्ये 'लघुपट निर्मिती कार्यशाळा' घेण्यात आल्या. या कार्यशाळेत सुमारे १००० मुलामुलींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. त्यातील निवडक लघुपटांचा सहभाग असलेला 'फिल्मिन्गो २०१७– लघुपट महोत्सव' हा २२, २३ आणि २४ डिसेंबर २०१७ रोजी प्रतिष्ठानच्या रंगस्वर सभगृहामध्ये संपन्न होत आहे.

समकालीन समाजाचे प्रश्न समाजात निर्माण होताना त्यालाही प्रतिसाद देण्याचे संस्थेचे सातत्याने प्रयत्न असतील. GST सारखा सर्व स्तरांवर परिणाम करणारा निर्णय सरकारने घेतला. त्यासंबंधात महाराष्ट्रात तज्ञांची

जी व्याख्याने व चर्चा आपण आयोजित केल्या त्यालाही उत्तम प्रतिसाद मिळाला. मुंबईतील तरुण चार्टर्ड अकाऊंटंट अजित जोशी यांचे या कार्यात उत्तम सहकार्य मिळाले. व त्यांनी या संबंधी खूप चांगल्या प्रकारे मांडणी केली.

याच कालावधीत प्रतिष्ठानच्या परिवारातील जवळचे असलेले आणि यशवंतराव चव्हाण यांच्या चित्रपटाची पटकथा ज्यांच्या हातून लिहिली गेली ते ज्येष्ठ साहित्यिक अरुण साधू यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या स्मृतींना उजाळा देणारी स्मृतिसभा प्रतिष्ठानच्या सभागृहात आयोजित केलेली होती. आणि त्यांच्या स्मृती जागविण्यासाठी त्यांच्या साहित्यावर आधारित 'सिंहासन' या चित्रपटाचे प्रदर्शन सुद्धा 'चित्रपट चावडी' या उपक्रमांतर्गत करण्यात आले.

या सगळ्यांच्या बरोबरीनेच प्रतिष्ठानच्या वतीने समाजातील उपेक्षित घटकांसाठी जो एक महत्वाचा उपक्रम राबवला जातो तो म्हणजे 'अपंग हक्क विकास मंच'च्या वतीने राबविले जाणारे उपक्रम. आणि या उपक्रमांच्या माध्यमातून दिव्यांगांना काही ना काही पद्धतीने आपल्याकडून मदत, मार्गदर्शन, सहाय्य मिळावे असा आपला प्रयत्न असतो. त्या अंतर्गत अनेक उपक्रम या कालावधीत घेण्यात आले. यामध्ये अमेरिकेतील 'स्टार्की फाऊनडेशन'च्या वतीने आपण ज्या श्रवणयंत्राचं वाटप करतो त्याचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. आजपर्यंत सुमारे ६,००० विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांना या श्रवणयंत्रांचं वाटप करण्यात आलं. आणि असे इतर घटक म्हणजे तृतीयपंथी मंडळी असतील किंवा एकल महिला...! याही घटकांसाठी आपण चर्चासत्राचे आयोजन केले होते. एकल महिलांच्या संबंधात आपली मराठवाड्यातली सहकारी श्रीमती रेणुका कड यांनी दुष्काळातील एकल महिलांच्या संबंधात 'एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरणाची आवश्यकता,' हा एक अभ्यासपूर्ण प्रबंध प्रकशित केला आहे. त्याचे प्रकाशनही आपल्या वतीने करण्यात आले. आणि आता त्यासंबंधात शासनाने धोरण आखावे म्हणून आपण प्रयत्न करत आहोत. आणि त्यासाठी महाराष्ट्रातील स्त्रियांसाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे आणि संस्थांचे सहकार्य आपण घेत आहोत.

मला आज आवर्जून उल्लेख करायचा आहे तो याचा की; यावर्षीचा यशवंतराव चव्हाण यांच्या नावाचा राज्य पुरस्कार आदरणीय भुजंगराव कुलकर्णी यांना देत आहोत. त्यांच्या कार्यासंबंधीची नोंद करणारे सन्मानपत्र याच अंकामध्ये आपल्याला सविस्तर वाचायला मिळेल. महाराष्ट्राच्या प्रशासनामध्ये समाजकारणामध्ये महत्वाचं योगदान देणारे भुजंगराव कुलकर्णी आज वयाच्या शंभरीमध्ये आहेत. या आणि अशा समाजासाठी महत्वाचं योगदान देणाऱ्या मंडळींच्या आधारावरच आपल्या समाजाचा गाडा सुरू असतो. या निमित्ताने आपल्या सर्वांच्या वतीने त्यांना अभिवादन करता येत आहे, ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. त्यांना पुन्हा एकदा उत्तम आयुरारोग्य लाभो अशी प्रार्थना करून हा अंक आपल्या हाती सोपवीत आहे.

**(सुप्रिया सुळे)**

# वार्तापत्र

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.

स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या ३३व्या पुण्यातिथीनिमित्त विनम्र अभिवादन

वर्ष : २१ वे / अंक ४१ वा / प्रकाशन : २५ नोव्हेंबर २०१७

सल्लागार

**मा. शरद काळे**

**मा. हेमंत टकले**

मानद संपादक

**सुप्रिया सुळे**

कार्यकारी संपादक

**दत्ता बाळसराफ**

सहसंपादक

**सुरेश पाटील**

**अनिल पाझारे**

विशेष सहाय्य

**पद्मभूषण देशपांडे**

सहाय्य

**मीनल सावंत**

**रमेश मोरे**

**मनिषा खिल्लारे**

**महेश साळवी**

**केंद्रातील सहकारी :**

विद्याधर खंडे, संगीता गवारे, स्मिता रायकर, महेश चौधरी, यतीन घोडेकर, राजेंद्र रुपवते, निवृत्ती भोर, संजना पवार, शैलेश चव्हाण, शोभा लोंढे, अनिल चिंदरकर, सुकेशनी मर्चंडे-शेवडे, सुहास बाभल, प्रियंका देसाई, विजय नागरे, जयेश गुजराथी, विश्वदत्त मुळे, सुरेश कोठावळे, महादेव सगरे, सुरेश सावंत, अशोक जाधव, मंगेश शिंदे, सतीश लाड, भक्ती, सुषमा, स्वाती यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार


## अनुक्रमणिका


- माननीय यशवंतराव चव्हाण लेख
- यशवंतराव चव्हाण राज्यस्तरिय पारितोषिक-२०१७ मानपत्र .....१०

**मध्यवर्ती कार्यालय व विविध विभाग**

- नवमहाराष्ट्र युवा अभियान ........ १२
- अपंग हक्क विकास मंच ........ १७
- शिक्षण विकास मंच ........ २२
- वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान ........ २४
- कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम ........ २५
- सृजन ........ २८
- महाराष्ट्र महिला व्यासपीठ ........ २९
- यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय ........ ३०
- माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी ........ ३४

**विभागीय केंद्र, कार्यवृत्त**

- विभागीय केंद्र, कऱ्हाड ........ ३५
- कृषी व सहकार व्यासपीठ आणि विभागीय केंद्र, पुणे...... ३६
- विभागीय केंद्र, नागपूर ........ ३८
- विभागीय केंद्र, नाशिक ........ ४१
- विभागीय केंद्र, रत्नागिरी ........ ४२
- विभागीय केंद्र, औरंगाबाद ........ ४६
- विभागीय केंद्र, लातूर ........ ५१
- विभागीय केंद्र, अहमदनगर ........ ५३
- विभागीय केंद्र, सोलापूर ........ ५६
- विभागीय केंद्र, अंबाजोगाई ........ ५७
- विभागीय केंद्र, ठाणे ........ ५८
- देवराष्ट्रे अहवाल ........ ५९
- प्रतिष्ठानची प्रकाशने ........ ६०



हे त्रैमासिक मुद्रक-प्रकाशक-कार्यकारी संपादक श्री. दत्ता बाळसराफ यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई करिता, मीडिया आर अँड डी (इं) प्रा. लि., कांदिवली (प) येथे छापून यशवंतराव चव्हाण केंद्र, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई ४०० ०२१ येथे प्रकाशित केले. नोंदणी क्र. ७१५८७/९९

# लोकशाहीतील प्रशासन

– यशवंतराव चव्हाण

पोलिटिकल सायन्स आणि पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन या दोन असोसिएशनच्या सदस्यांपुढे एकत्र भाषण करण्याची संधी मला मिळाली त्याबद्दल मला आनंद होत आहे. राज्यशास्त्र व प्रशासन ह्या दोन्हींचा एकमेकांशी फार निकटचा संबंध आहे. राज्यशास्त्राचा मी विद्यार्थी होतो व अद्यापही आहे. आणि प्रशासनाचा मी कधी अभ्यास केला नसला, तरी गेल्या काही वर्षांपासून प्रत्यक्ष प्रशासनाच्या क्षेत्रांत मी काम करीत आहे. लोकशाहीतील प्रशासनासंबंधी जेव्हां आपण बोलतो; त्यावेळी त्यासंबंधीच्या आपल्या कल्पना स्पष्ट असणे जरुरीचे आहे, असे मला वाटते. लोकशाहीची कल्पना हीच मुळी बदलत जाणारी कल्पना असून तशी ती असणें अगदी स्वाभाविक आहे, लोकशाही हा शब्द शेकडो वर्षापूर्वी ज्या मानवाने प्रथम उच्चारला त्याने कोणत्या अर्थाने तो उच्चारला असेल, हे नक्की सांगता येणे आज अशक्य आहे. परंतु, लोकांशी ज्याचा प्रत्यही संबंध येतो व जे जनमनाचे प्रतिनिधित्व करते, असे शासनाचे तंत्र म्हणजे लोकशाही, अशी लोकशाहीसंबंधी एक कल्पना पूर्वी सर्वत्र प्रचलित होती. तथापि इतिहासाच्या ओघांत लोकांच्या विचारांत परिवर्तन झाले, त्यांच्या सभोवतींची परिस्थिती बदलली, त्यांच्यापुढील प्रश्न बदलले आणि त्यांच्यातील संबंधित देखील बदल घडून आला. त्यामुळे त्यांच्या राजकीय कल्पनात उत्क्रांती होऊन लोकशाहीबद्दलच्या त्यांच्या कल्पना साहजिकपणेंच बदलत गेल्या. आपण जेव्हा एखाद्या सामाजिक शास्त्राचा विचार करू लागतो, तेव्हा आपण बदलत्या जगांत राहात आहोत व सामाजिक जीवन परिवर्तनशील आहे हे सत्य आपल्याला लक्षात घ्यावे लागते. ह्या परिवर्तनाच्या बरोबरीने त्या सामाजिक शास्त्राने आपली पावले टाकली पाहिजेत हे ओघानेच आले. राज्यशास्त्र हेही एक सामाजिक शास्त्र असल्यामुळे निरनिराळ्या काळी आणि निरनिराळ्या देशांत लोकशाहीची कल्पना निरनिराळी असावी यांत आश्चर्य नाही. आपल्या देशात आपण ज्या संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला आहे तीसुद्धा लोकशाहीची एक विशिष्ट पद्धत असून तिचेंही स्वरूप पुढें हेच राहील, अशी खात्री मी तरी देऊ शकणार नाही. कारण भविष्यांतील बदलत्या परिस्थितीत तिचे स्वरूप हेच राहिले तर तिचे प्रातिनिधिक स्वरूप नष्ट होऊन भावी पिढ्यांच्या आशाआकांक्षांचे प्रतिबिंब तिच्यात पडू शकणार नाही. लोकांचे, लोकांसाठी आणि लोकांनी चालविलेले शासन म्हणजे लोकशाही असे लोकशाहीचे वर्णन करण्यात येते. परंतु ही अगदी औपचारिक स्वरूपाची व्याख्या आहे. कारण या व्याख्येवरून लोकशाही सरकारच्या कार्यपद्धतीचा नक्की बोध होत नाही. माझ्यापुरते मी असें म्हणेन की, प्रशासनांतील लोकशाही म्हणजे एकमेकांच्या सतत विचारविनिमयानें चालणारा राज्यकारभार होय. कोणत्याही प्रकारचा साचेबंद दृष्टिकोन न ठेवता लोकांचे प्रतिनिधी एकत्र येऊन जिथे विचारविनिमय करतात अशा शासनाच्या पद्धतीला मी लोकशाही म्हणतो. लोकशाहीत जनतेच्या मूलभूत प्रश्नांसंबंधी एकवाक्यता व्हावी व ते सोडविले जावेत म्हणून चर्चा करून मार्ग काढण्याचा लोकप्रतिनिधि प्रयत्न करीत असतात. पण लोकशाहीच्या ह्या किंवा आताच मी उल्लेख केलेल्या दुसऱ्या व्याख्येत, शासन आणि प्रशासन यांचाच विचार प्रामुख्याने आहे असे आपणास आढळून येईल. परंतु लोकशाहीचे तत्व ज्यावेळी आपण मान्य करतो तेव्हा आपण शासनाचे फक्त बाह्य स्वरूपच मान्य करतो असे मला वाटत नाही. लोकशाहीचा अर्थ शासनाचा केवळ एक प्रकार असा होत असेल तर अशा लोकशाहीसंबंधी मला बिलकुल आकर्षण वाटणार नाही.

या प्रश्नाचा अधिक खोल विचार करण्यापूर्वी शासन आणि प्रशासन या दोन निराळ्या गोष्टी आहेत हे प्रथम समजून घेणे आवश्यक आहे. एखादी व्यक्ति यशस्वी प्रशासक आहे असे म्हटले जाते, तेव्हा शासन म्हणून जी कल्पना आहे ती डोळ्यांपुढे उभी राहत नाही. प्रशासन म्हणजे राज्यकारभार ही शासनाची फक्त एक बाजू आहे. शासनाची दुसरी बाजू राजकीय आहे. राजकीय दृष्ट्या म्हणजे जनतेच्या दृष्टिकोनांतून आपण जेव्हा लोकशाहीसंबंधी बोलतो आणि हुकूमशाहीपासून ती निराळी आहे असे मानतो, तेव्हा राज्यकारभाराच्या यशापयशाचे मूल्यमापन एक विशिष्ट कसोटी लावून आपण करतो. लोकांचे समाधान ही ती कसोटी होय. सकृत्‌दर्शन हे एक साधे सूत्र वाटते. परंतु लोकांचे समाधान कशात आहे, हे शोधणे अत्यंत कठीण असते. लोकांना आज ज्यांत समाधान आहे, त्यात काही दिवसांनी त्यांना समाधान वाटेलच असे नाही. परंतु लोकशाही सरकार जे काही करीत असते त्यापासून लोकांना समाधान मिळाले पाहिजे, ही गोष्ट निःसंशय. म्हणून लोकांचे समाधान

हा लोकशाही राज्यकारभाराचा एक निकष म्हणून आपण मानतो तेव्हा त्याच्या मुळाशी कोणते तत्त्व आहे हे आपण पाहिले पाहिजे. लोकशाही म्हणजे शासनाची केवळ एक पद्धत असे पूर्वी समजले जात असे परंतु, शासनाची अशी पद्धत निर्माण करणे हा राजकीय लोकशाहीचा अंतिम हेतू आहे असे आतां कोणी मानीत नाही. केवळ मतदानाचा औपचारिक स्वरूपाचा हक्क सर्वांना मिळणे व आपले प्रतिनिधी लोकसभेत पाठविता येणे म्हणजेच लोकशाही इतका मर्यादित अर्थ लोकशाहीचा असेल तर समाजाच्या दृष्टीने यापेक्षा अधिक हानिकारक अशी दुसरी गोष्ट असू शकणार नाही.

केवळ राजकीय लोकशाहीस लोकशाही म्हणता येणार नाही, हे आता सर्व तत्त्वज्ञांनीदेखील मान्य केले आहे. राजकीय लोकशाहीस सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीची जोड असणे आवश्यक आहे. तशी जोड ज्यावेळी मिळेल तेव्हाच तिला खऱ्या लोकशाहीचे स्वरूप प्राप्त होईल. 'सामाजिक व आर्थिक लोकशाही' या शब्दप्रयोगात काही वादग्रस्त प्रश्न उद्भवतात हे मी जाणतो. राजकीय हक्कांच्या बाबतीत सर्वांना समान संधी मिळणे हा राजकीय लोकशाहीचा अर्थ असेल, तर या राजकीय हक्कांबरोबरच, सामाजिक व आर्थिक क्षेत्रांतही प्रत्येक व्यक्तीला ज्यायोगे समान संधी मिळेल अशी आर्थिक व सामाजिक परिस्थिती निर्माण झाली पाहिजे. लोकशाहीच्या या व्यापक दृष्टिकोनांतून भारताच्या राज्यकारभाराकडे आपण पाहिले तर आपणास अभिमान वाटल्याशिवाय राहणार नाही. आणखी एक गोष्ट मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो. ती म्हणजे लोकशाहीच्या कल्पनेत हा जो बदल झाला आहे, त्यामुळे प्रशासनाच्या कल्पनेतदेखील बदल होणे अपरिहार्य आहे. गेल्या शतकांत पुढारलेल्या व प्रगतशील राष्ट्रांमध्ये प्रशासनाची जी कल्पना होती ती आता बदलली आहे. 'कार्यक्षम प्रशासन' हा शब्दप्रयोग आता सरकार, खाजगी व्यापारी संस्था या सर्वांच्या बाबतीत उपयोगात आणला जातो. कोणत्याही संदर्भात आपण हा शब्द वापरला तरी कार्यक्षमतेसंबंधीच्या कसोट्या आतां बदलल्या आहेत हे आपणांस नाकारता येणार नाही. त्याचप्रमाणे कार्यक्षमतेविषयींच्या कल्पना व ती वाढविण्याच्या पद्धती यांत देखील बदल झाला आहे. याचे कारण सामाजिक व आर्थिक परिस्थितीतील बदल हे आहे. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे लोकशाहीच्या आणि प्रशासनाच्या कल्पनेंत हा जो बदल झाला आहे तो बदललेल्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचाच एक भाग आहे. म्हणून मला स्वतःला असे वाटते की, सामाजिक व आर्थिक विकासामुळे निर्माण होणारी शक्ती हीच लोकशाही व प्रशासन यांची प्रेरक शक्ती आहे. 'सामाजिक परिस्थिती' याचा अर्थ फार व्यापक असून त्यांत आर्थिक परिस्थितीबरोबरच समाजाच्या बहुतेक सर्व अंगोपांगांचा समावेश होतो हे मला स्पष्ट करावेसे वाटते.

प्रशासन हे लोकशाहीचे आजच्या काळात एक अत्यंत महत्त्वाचे अंग आहे. एका राज्याचा मुख्यमंत्री म्हणून मला रोज नाना तऱ्हेचे प्रश्न हाताळावे लागतात. दर पाच मिनिटांनी माझ्यापुढील विषय बदलत असतो. तुमच्यासारखा एखादा प्राध्यापक असे विषय सारखे बदलून बोलू लागला तर त्याला विद्यार्थ्यांपुढे एक क्षणभरही बोलू देण्यात येणार नाही. परंतु मुख्यमंत्री या क्षणी वैद्यकासंबंधी चर्चा करील तर दुसऱ्याच क्षणी तो विजेसंबंधी बोलू लागेल, आणि त्यानंतर लगेच शिक्षणासारख्या अत्यंत महत्त्वाच्या तांत्रिक प्रश्नावर तो आपले मत देईल आणि पुढे ताबडतोब जंगल खात्याकडे तो वळेल आणि यापैकी एकाही विषयासंबंधी काहीही माहिती नसताना तो या सर्व गोष्टी करील. वैद्यक, शिक्षण, जंगल किंवा वीज या विषयांचा मी काही तज्ज्ञ नाही, परंतु निरनिराळे प्रश्न सोडविण्यासाठी कोणते अंतिम निकष लावावेत या बाबतींत मुख्यमंत्री तज्ज्ञ समजला जातो. एखाद्या धोरणाचे राज्यांतील लोकांवर कोणते परिणाम होतील आणि शासनाच्या निरनिराळ्या शाखांकडून लोकांच्या कोणत्या अपेक्षा आहेत यासंबंधीची जाणीव मुख्यमंत्र्याला असावी लागते, मुख्यमंत्री केवळ एवढ्याच बाबतीत तज्ज्ञ असतो. परंतु जे धोरण ठरेल त्याला व्यवस्थित आकार देऊन त्याची अंमलबजावणी करण्याचे काम इतर तज्ज्ञांचे असते. यांनाच आपण शासनतज्ज्ञ म्हणतो. प्रत्येक मंत्र्यास अशा तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा लागतो.

धोरण ठरविणे हे अशा धंदेवाईक प्रशासकांचे काम नसून एक प्रकारे व्यक्तिनिरपेक्ष राहून ठरलेल्या धोरणाची अंमलबजावणी करणे एवढेच त्याचे काम असते असे पूर्वी समजले जात असे. परंतु प्रशासन हे आजच्याही काळात केवळ धोरणाची अंमलबजावणी करणारे एक व्यक्तिनिरपेक्ष माध्यम बनणार असेल तर त्या प्रमाणात प्रशासनाचे लोकशाही स्वरूप नाहीसे होईल. परंतु, वस्तुस्थिति तशी नाही. मी असे म्हणतो याला दोन कारणे आहेत. पहिली गोष्ट अशी, की प्रशासक हा लोकशाही शासनाचा प्रतिनिधी म्हणून काम करीत असल्यामुळे ठरलेल्या मूल्याची अंमलबजावणी त्याला कुशलतेने करावी लागते. म्हणून व्यक्तिनिरपेक्षतेने आपण विचार करतो व सल्ला देतो असे तो म्हणूच शकत नाही आणि दुसरी गोष्ट म्हणजे लोकशाही राज्यव्यवस्थेमध्ये राजकीय पुढारीच फक्त निर्णय घेतो किंवा धोरण ठरवितो हे खरे नाही. आणि हे मी माझ्या व्यक्तिगत अनुभवावरून आपणांस सांगू शकतो. स्पष्टच सांगावयाचे

म्हणजे, अलीकडील राज्यांच्या दैनंदिन प्रशासनाचे गुंतागुंतीचे स्वरूप लक्षात घेता, सध्याच्या काळात मंत्री राज्य करीत नाहीत तर तज्ज्ञच राज्य करतात असे मी म्हणेन. कारण ते जो सल्ला देतात तो तांत्रिक स्वरूपाचा असल्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करणे कठीण असते. आणि म्हणून एखादे विशिष्ट धोरण ठरविण्यात या तज्ज्ञांचा मोठा भाग असतो.

परवाच आपल्या राज्यांतील एक वरिष्ठ पोलीस अधिकारी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या वाढदिवसानिमित्त झालेल्या सत्काराला उत्तर देताना त्यांनी एक उत्कृष्ट सल्ला दिला. हा सल्ला त्यांच्या वडिलांकडून त्यांना मिळाला होता. डॉक्टरने दिलेले सर्टिफिकेट, पोलीस अधिकाऱ्याने केलेली चौकशी व इंजिनिअरने तयार केलेला अंदाज या तीन गोष्टीखेरीज जगांतील इतर कोणतीही गोष्ट तुम्ही बदलू शकतां असे त्यांनी सांगितले. कारण या तीन गोष्टीविरुद्ध कोठेंही दाद मागता येत नाही. यांतील विनोदाचा भाग सोडला तर तांत्रिक बाबींसंबंधी सध्याची परिस्थिती अशाच प्रकारची आहे. जेव्हा धंदेवाईक प्रशासक सल्ला देतो तेव्हा तो नव्याण्णव टक्के धोरण ठरवीत असतो. तेव्हा प्रशासकाचे काम निव्वळ ठरलेले धोरण अंमलात आणण्याचे असते असे समजणे या काळात तरी संयुक्तिक होणार नाही. धंदेवाईक राजकारणी आणि धंदेवाईक प्रशासक निरनिराळ्या पातळीवर कार्य करीत असले आणि त्यांच्या कार्याच्या पद्धती व त्यांची साधने भिन्न असली तरी लोकशाहीमध्ये त्यांना मार्गदर्शन करणारी शक्ती व तत्त्वे एकच असतात. जो निवडून येतो तोच लोकशाहीचे प्रतिनिधित्व करतो, परंतु लोकशाही यंत्रणेचा कायम स्वरूपाचा घटक असणारा मात्र ते करीत नाही असे म्हणणे रास्त होणार नाही. अशा प्रकारच्या कल्पनांनी लोकशाही कधीच यशस्वी होणार नाही. कारण त्यामुळे लोकशाहींत सतत मतभेद व अडथळे निर्माण होऊन राज्यकारभारांत लोकशाही नाममात्र देखील शिल्लक राहणार नाही. म्हणून लोकशाहींशी संबंधित असलेल्या प्रत्येक व्यक्तिने, केवळ राजकीय क्षेत्रांतच नव्हे, तर सामाजिक व आर्थिक क्षेत्रांत देखील, लोकांचे समाधान हेच आपले अंतिम उद्दिष्ट मानले पाहिजे. राजकारण आणि प्रशासन या दोन्ही क्षेत्रांतील लोकांचे हेच उद्दिष्ट असले पाहिजे. राजकारण आणि प्रशासन या दोन्ही क्षेत्रांतील व्यक्ती शेवटी जनतेतूनच आलेल्या असतात आणि त्यांना जनतेचे भवितव्य घडवून आणण्याचेच कार्य करावयाचे असते. राज्यशास्त्र आणि लोकशाहीतील प्रशासन यांना सांधणारा दुवा हाच आहे असे मला वाटते.

लोकशाहीतील प्रशासनात जे जाऊ इच्छितात त्यांनी ही गोष्ट सुरुवातीपासून नीट समजावून घ्यावी. मी म्हणतो त्याप्रमाणे त्यांनी ही गोष्ट समजावून घेऊन आपल्या दैनंदिन कामांत सतत नजरेसमोर ठेवली तर आपले पुष्कळसे प्रश्न आपोआप सुटतील. एका ज्येष्ठ प्रशासकाने एकदा असे उद्गार काढले होते की, मंत्र्यांना 'नाही' म्हणण्याचे आणि प्रशासकांना 'होय' म्हणण्याचे शिक्षण मिळाले तर बरे होईल. यांत पुष्कळच अर्थ आहे, कारण हे घडून आले तर लोकशाहींतील आणि लोकशाहीच्या प्रशासनांतील पुष्कळशा प्रश्नांसंबंधी चिंता करण्याचें आपणांस कारणच राहणार नाही.

या सर्व गोष्टी आपल्याला मी हेतुपूर्वक सांगत आहे. प्रशासनाच्या कोणत्याही शाखेंत तुम्ही प्रवेश करा, परंतु मी सांगितलेल्या गोष्टी कृपा करून विसरू नका. एखाद्या खाजगी संस्थेत किंवा एखाद्या कारखान्यांत तुम्ही काम करणार असला तरी तेथेही हीच कसोटी तुम्हांला दृष्टीसमोर ठेवावी लागेल. प्रशासकाकडून अखेरीस हीच अपेक्षा असते. खासगी व्यापारी संस्थेतदेखील ग्राहकाचे समाधान ह्याच न्यायाचे त्याला पालन करावे लागते. प्रयोगशाळेत काम करणारा शास्त्रज्ञ असो किंवा रंगभूमीवर काम करणारा नट असो किंवा समाजसेवेच्या क्षेत्रांत गाजावाजा न करता काम करणारा कार्यकर्ता असो, त्याने एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती ही की, आपण जे काही काम करतो, त्याचा अंतिमतः जनतेच्या जीवनावर परिणाम होत असतो.

लोकशाही ही केवळ विधानसभेपुरतीच नसते, किंवा ती केवळ प्रशासनाचेच कार्य करीत नाही. अधिक खोल अर्थाने पाहिले तर सध्याच्या आधुनिक समाजात प्रत्येक व्यक्तीच्या जीवनावर लोकशाहीची तत्त्वे आपला प्रभाव पाडीत असतात. ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट तुम्ही समजावून घेतली पाहिजे. लोकशाही ही केवळ राजकीय कल्पना नाही असे जे मी म्हणतो ते याच अर्थाने. लोकशाही आता एक सामाजिक आणि आर्थिक कल्पनाही बनली आहे. जो विद्यार्थ्यांचे खरे समाधान करतो तो चांगला शिक्षक. तो निवडणुकीसाठी उभा राहात नाही. तरीही त्याला मान्यता मिळते. माझ्या विद्यार्थिदशेत एक प्राध्यापक होते. त्यांच्या कॉलेजांतील विद्यार्थीच नव्हे तर दुसऱ्या कॉलेजांतील विद्यार्थीही त्यांचा अतिशय मान राखीत असत. शेक्सपिअर शिकविणारे दुसरे एक अत्यंत नामवंत प्राध्यापक होते. त्यांच्या व्याख्यानासाठी भिन्नभिन्न विद्यापीठांचे विद्यार्थी येत. अंतिमदृष्ट्या ही लोकशाहीच नव्हे काय? निवडणूकीला फार महत्त्वाचे स्थान आहे, यांत शंका नाही. परंतु, निवडणुकीला किंवा लोकशाहीच्या बाह्य स्वरूपाला जनतेच्या समाधानापेक्षा अधिक महत्त्व नाही. तुम्ही कोणत्याही क्षेत्रांत काम करीत असा, जनतेचे समाधान हीच अंतिम कसोटी राहील. जीवनाच्या प्रत्येक

क्षेत्रात ह्याच मूलभूत तत्त्वाचा ठसा उमटलेला तुम्हांला दिसेल. आणि म्हणून ह्याच कसोटीवर सर्व गोष्टींबद्दलचे निर्णय तुम्हांला तारूनसुलाखून घ्यावे लागतील. 'लोकशाहीतील प्रशासन' या विषयावर आपल्यासमोर बोलावे असे मी ठरविले, त्यावेळी प्रशासनांतील लोकशाहीच्या या मूलभूत प्रश्नांची चर्चा करण्याचा माझा उद्देश होता. आपल्या दैनंदिन कामांत, मग ते प्रशासनांतील असो, राजकारणांतील असो, अगर अन्य कोणत्याही क्षेत्रांतील असो आपण या मार्गदर्शक तत्त्वाच्या स्वीकार केला तर समाजांतील अनेक गोष्टीत द्रुतगतीने सुधारण होईल, आणि सरकार व जनता यांच्यातील संबंधही सुधारतील. एवढेच नव्हे तर विशिष्ट परिस्थितीत आपले कर्तव्य कोणते हेही त्यामुळे तुम्हाला समजेल. अशा प्रकारे समाजांत केवळ लोकशाहीच नव्हे तर खरीखुरी स्वतंत्रता नांदू लागेल.

लोकशाहीमुळे ज्या वेळी समाजातील महान शक्ति मोकळया होतात आणि व्यक्तीला खऱ्या स्वातंत्र्याचा लाभ होतो त्याचवेळी लोकशाहीचे खरे स्वरूप आपणांस पाहावयास मिळते. हे जेव्हा घडते, तेव्हाच समाज सामर्थ्यवान बनतो, अशा समाजांत केवळ व्यक्तीच स्वतंत्र होते असे नाही, तर सर्व समाजाचा बौद्धिकदृष्ट्या व अन्य प्रकारे स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यास समर्थ बनतो. राज्यशास्त्र आणि प्रशासन यांचे आज जे अध्ययन करीत आहेत, ते कधी तरी राजकारणांत आणि प्रशासनांत भाग घेतीलच. त्यावेळी मी आताच सांगितलेल्या तत्त्वांची त्यांनी आठवण ठेवली, तर त्यांच्या भोंवतालच्या बदललेल्या परिस्थितीतही ते यशस्वी होतील, याबद्दल मला शंका नाही.

– 'सह्याद्रीचे वारे
श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या
निवडक भाषणांचा संग्रह'
यातून साभार

## शासनाची कसोटी

शासनाची कसोटी केवळ कार्यक्षम कारभार ही नाही. तसेच, राज्य ही काही उपभोग्य वस्तू नाही. ती समाजपरिवर्तनाची यंत्रणा झाली पाहिजे. केवळ नियोजनातील आकडेवारीने हे होणार नाही. पैसा खर्चून समाजनिर्मिती होत नाही. त्याला सर्वांगीण व जनतेच्या हृदयाला हात घालणारा ध्येयवाद लागेल व तो पेलणारे तळमळीचे नेतृत्त्व लागेल. राजकारण हा सत्तास्पर्धेचा आखाडा करणे हे या दरिद्री असलेल्या देशात महापातक आहे. ही अवस्था फार काळ टिकू शकणार नाही. म्हणून कोणत्याही शासनाला लोकाभिमुख राहावेच लागेल.

– मा. यशवंतराव चव्हाण

## यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक २०१७ माननीय श्री. भुजंगराव कुलकर्णी

# मानपत्र

मा. श्री. भुजंगराव कुलकर्णी यांचा जन्म ५ फेब्रुवारी १९१८ रोजी गाढे पिंपळगाव, तालुका परळी, जिल्हा बीड येथे झाला. त्यांच्या जन्माच्यावेळी महाराष्ट्र राज्य स्थापन झालेले नव्हते बीड जिल्हयात ते गाव नव्हते व परळी तालुकाही नव्हता. १९५६ पासून मराठवाडा द्विभाषिक मुंबई राज्यात आणि १९६० पासून महाराष्ट्र राज्यात आला व १९९० मध्ये परळी तालुका झाला. त्यांचा जन्म झाला, त्यावेळी सारा मराठवाडा निजामाच्या हैदराबाद संस्थानात होता. शिक्षणाची व्यवस्था फार मर्यादित असल्यामुळे त्यांना शिक्षणासाठी पिंपळगाव, अंबाजोगाई व औरंगाबाद अशी त्रिस्थळी यात्रा करावी लागली. त्यांचे उच्च शिक्षण उस्मानिया विद्यापीठात झाले. १९३६ मध्ये त्यांनी बी.एस.सी. ची व १९३८ मध्ये एम.एस.सी. ची पदवी मिळविली आणि या दोनही परीक्षांमध्ये ते पहिल्या वर्गात पहिले आले होते. १९३९ मध्ये त्यांची तहसिलदार पदासाठी म्हणजे मुलकी सेवेत वर्ग २ मध्ये निवड झाली. सुरुवातीच्या काळामध्ये त्यांचे महसूल खात्याच्या वेगवेगळया विभागांमध्ये प्रशिक्षण झाले. त्यावेळचा अभ्यास आणि अनुभव त्यांना पुढील प्रशासकीय कारकीर्दीमध्ये उपयोगी पडला.

१७ सप्टेंबर १९४८ ला भारताने केलेल्या पोलीस कारवाईने मराठवाडा निजामी राजवटीतून मुक्त झाला. १९४९ मध्ये निजामाची स्वत:ची विस्तृत अशी जी जहागिरी होती, तिच्यावरील निजामाचा अधिकार संपविण्याचा कायदा अंमलात आला व त्याची अंमलबजावणी करण्याच्या कामात मा. श्री. भुजंगराव यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. २६ जानेवारी १९५० पासून भारतीय संविधान लागू झाले व त्या अन्वये हैदराबाद पार्ट बी स्टेट म्हणून भारतीय संघराज्याचे एक सदस्य राज्य झाले. १९५२ मधे भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये समावेश होऊन मा. श्री. भुजंगराव यांची पहिली नेमणूक हैदराबाद येथे महसूल विभागामध्ये झाली. १९५३ ते १९५६ या कालावधीत त्यांनी नवीन कुळ कायद्याची अंमलबजावणी करण्याचे महत्त्वाचे काम परिश्रमपूर्वक व आदर्श पध्दतीने पार पाडले. कुळ कायद्याअंतर्गत राज्य सरकारने १९५६ ला भूमी आयोग स्थापन केला. त्या भूमी आयोगाचे सचिव या नात्याने त्यांनी केलेल्या कामाची तत्कालीन मंत्रिमंडळाने प्रशंसा केली.

१९५६ मध्ये राज्य पुनर्रचना होऊन मराठवाडा द्विभाषिक मुंबई राज्यामध्ये समाविष्ट झाला. त्यावेळी त्यांची सेवा महाराष्ट्र राज्याकडे वर्ग करण्यात आली व त्यांची नेमणूक औरंगाबादेस जिल्हाधिकारी या पदावर झाली. अनेक वर्षांपासून कुंठित असलेल्या मराठवाडयाच्या विकासाला गती प्राप्त झाली. मा. यशवंतराव चव्हाण यांच्या पुरोगामी व गतिशील नेतृत्वाखाली विकासाभिमुख प्रशासनाचे कार्य औरंगाबादला केल्यानंतर श्री. भुजंगराव कुलकर्णी यांची नेमणूक द्विभाषिक मुंबई राज्याच्या जनगणनेचे प्रमुख म्हणून झाली.

१९६१ ची जनगणना ही महाराष्ट्राची पहिलीच जनगणना असल्यामुळे त्यानिमित्त केले जाणारे विविध अहवाल, विश्लेषणे व प्रकाशने यातून नव्या राज्याचे चित्र वास्तव स्वरूपात मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला. जनगणनेच्या निमित्ताने जी अनेक प्रकाशने महाराष्ट्राचे दर्शन घडविण्यासाठी तयार करण्यात आली, त्यामध्ये महाराष्ट्राचे १५ खंड प्रकाशित झाले. त्यापैकी एक नावीन्यपूर्ण असा नकाशांचा खंड होता. त्याचबरोबर तत्कालीन २५ जिल्हयांचे २५ इंग्रजी परिचय ग्रंथही तयार करण्यात आले. त्यांनी केलेल्या प्रचंड व व्यापक कार्याचे तत्कालीन मुख्यमंत्री मा. श्री. वसंतराव नाईक तसेच भारताचे रजिस्ट्रार जनरल श्री. अशोक मित्रा यांनी विशेष कौतुक केले.

जनगणनेच्या व्यापक व अवघड कामातून मुक्त झाल्यानंतर मा. श्री. भुजंगराव कुलकर्णी यांची पुणे महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून नेमणूक झाली. १९६५ ते १९६९ अशी चार वर्षे त्यांनी पुणे महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून काम केले. त्या कारकीर्दीत त्यांनी पुणे शहरासाठी अनेक महत्त्वाचे प्रकल्प व योजना पूर्ततेस नेल्या. त्यापैकी नेहरु स्टेडियम, बालगंधर्व रंग मंदिर, मंडईची नवी इमारत, फिल्टर पाणी पुरवठा योजना व सारस बाग यांचा विशेष उल्लेख करणे आवश्यक आहे. प्रशासन, नगरसेवक आणि पदाधिकारी यांच्यामधील संबंध विश्वासाचे ठेवण्यात यश आल्यामुळे त्यांना अनेक प्रकल्पांना गती देता आली. बालगंधर्व रंगमंदिराच्या कामात पु. ल. देशपांडे यांनी महत्त्वाचे योगदान केले. सकाळी दोन तास शहरातून फेरी मारणे, सर्व खाते प्रमुखांची साप्ताहिक अनौपचारिक बैठक घेणे व सर्व नागरिकांना रोज दोन तास भेटण्याची खुली वेळ ठेवणे, धोरणात्मक चर्चा व समन्वय यासाठी महापौरांच्या अध्यक्षतेखाली नेमलेली अनौपचारिक समन्वय समिती व सर्वसाधारण सभेच्या बैठका एकेका दिवसासाठी न ठेवता सत्र स्वरूपात घेणे अशा संरचनात्मक सुधारणा यामुळे त्यांची पुणे येथील कारकीर्द संस्मरणीय ठरली.

त्यानंतर कांही काळ मुंबईचे विभागीय आयुक्त म्हणून काम केल्यानंतर त्यांची नेमणूक सचिवालयात नागरी विकास, आरोग्य व गृहनिर्माण या विभागांचे सचिव म्हणून झाली. त्यावेळी त्यांनी सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय शिक्षण या दोनही संचालनालयांची पुनर्रचना करण्याचे काम तडीस नेले.

१९६९ च्या नोव्हेंबरमध्ये त्यांची महाराष्ट्र राज्याचे सिंचन व विद्युत विभागाचे सचिव म्हणून नेमणूक झाली. ती १९७४ मध्ये ते निवृत्त होईपर्यंत कायम होती. या पाच वर्षांच्या कार्यकाळात मा. श्री. शंकरराव चव्हाण व मा. श्री. वसंतदादा पाटील यांच्यासारख्या दिग्गज मंत्री महोदयांबरोबर त्यांनी काम केले. महाराष्ट्र राज्याच्या जलसंपदेवरील हक्कांचे संरक्षण व निश्चिती करण्याच्या दृष्टीने हा काळ निर्णायक होता. त्यांच्या कारकीर्दीतच कृष्णा व गोदावरी या दोन नद्यांच्या पाण्यासंबंधी लवादाची स्थापना झाली. या लवादाच्या निर्णयामुळेच नर्मदेमधून निर्माण होणाऱ्या वीजेपैकी

ठरावीक वीज महाराष्ट्राला मिळावी असे ठरले. तसेच मध्यप्रदेश राज्याशी एकमत घडविता आल्यामुळे पेंच जलविद्युत प्रकल्पासारखे अनेक संयुक्त प्रकल्प मध्य प्रदेशाशी करार करून सुरू करता आले. एकीकडे राज्याच्या जलसंपदेचे संरक्षण करतानाच त्यांनी अभियांत्रिकी सेवांची पुनर्रचना केली. १९७२-७३ च्या तीव्र दुष्काळाच्या वेळी सिंचन विभागाशी संबंधित अशी लघुसिंचन, पाझर तलाव, कालवे व सामुदायिक विहिरींची कामे मोठया प्रमाणावर पार पाडली.

महाराष्ट्र राज्य स्थापन होण्यापूर्वी तेव्हाच्या मुंबई, मद्रास, म्हैसूर व हैदराबाद या चार राज्यांमध्ये कृष्णेच्या व गोदावरीच्या खोऱ्यातील पाण्याच्या वाटपाबाबत केंद्र शासनाच्या मध्यस्थीने १९५१ मध्ये एक करार झाला होता. त्यात तेव्हाच्या मुंबई राज्याला केवळ २१२ टीएमसी पाणी दिले होते. परंतु, लवादाची नेमणूक झाल्यानंतर १९५१ चा करार बंधनकारक नाही व पाण्याच्या वाटपाचे काम लवादाने नव्याने केले पाहिजे अशी भूमिका महाराष्ट्राने घेतली. दरम्यान मराठवाडयाचे ६ तालुके महाराष्ट्राकडे आल्यामुळे महाराष्ट्राचा कृष्णेच्या पाण्याचा वाटा २१२ टीएमसी पासून ५९४ टीएमसी पर्यंत पोहोचला.

१९७४ मध्ये ते भारतीय प्रशासकीय सेवेतून निवृत्त झाले. परंतु त्यांच्या कर्तृत्वाचा व दीर्घ अनुभवाचा लाभ मिळावा या दृष्टीने राज्य शासनाने मराठवाडा विकास महामंडळाचे अध्यक्ष व कार्यकारी संचालक म्हणून त्यांची औरंगाबाद येथे नेमणूक केली.

मराठवाडयामध्ये रोजगार वाढावा व उद्योगांची स्थापना करावी असे महामंडळाचे धोरण होते. त्याप्रमाणे वस्त्रोद्योग क्षेत्रातील एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प महामंडळाने सुरू केला होता. बीडमध्ये एक टॅनरीही स्थापन केली, नांदेड येथे 'गोदावरी गार्मेंट' या नावाने एक प्रकल्प सुरू केला, नांदेड जिल्हयात किनवट येथे मंगलोरी कौले उभारण्याचा कारखाना उभा केला. दुग्धविकास प्रकल्पही सुरू केला. तथापि, वित्तीय व प्रशासकीय अडचणींमुळे हे प्रकल्प अपेक्षेप्रमाणे यशस्वी होऊ शकले नाहीत. मा. भुजंगरावांनी या अपयशाचे विश्लेषण करून असा निष्कर्ष काढला की, मराठवाडयातील सामाजिक मागासलेपण, शिक्षणाच्या अपुऱ्या सोयी, सहकार चळवळ व पंचायत राज्याची दुर्बलता आणि सरकारी यंत्रणेची उदासीनता या अडचणींवर मात केल्याशिवाय मराठवाडयाच्या आर्थिक प्रगतीला गती येणार नाही.

विकास महामंडळातील मुदत संपल्यानंतर १९७७ मध्ये ते निवृत्त झाले. त्यानंतर त्यांनी प्रामुख्याने महाराष्ट्राच्या विकासातील असमतोल आणि मराठवाडयाच्या विकासातील अनुशेष या बाबींवर लक्ष केंद्रित केले. १९८३-८४ मध्ये विकासातील असमतोलाचा अभ्यास करण्यासाठी नेमण्यात आलेल्या डॉ. दांडेकर समितीचे ते सदस्य होते. १९९५-२००० या काळात ते राज्य सिंचन आयोगाचेही सदस्य होते. औरंगाबाद येथील अनेक अशासकीय संस्थांमधून विधायक कार्य करीत असतांनाच त्यांनी सातत्याने मराठवाडयाच्या विकासातील असमतोल या विषयावर प्रबोधन व लोक शिक्षण यासंबंधीचे कार्य चालू ठेवले.

वैधानिक विकास मंडळाच्या स्थापनेसाठी त्यांनी सातत्याने आग्रही भूमिका मांडली. १९९४ मध्ये वैधानिक विकास मंडळाची स्थापना झाली व मा. भुजंगरावांची मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे तज्ज्ञ सदस्य म्हणून नेमणूक करण्यात आली. अनुशेष निर्देशांक समितीचे अध्यक्ष म्हणून १९९४ मध्ये त्यांनी काम केले व नंतर त्या समितीचे निमंत्रक म्हणून त्यांची नेमणूक झाली. या समितीने २३ एप्रिल १९९७ मध्ये मा. राज्यपालांना आपला अहवाल सादर केला. अनुशेष समितीने केलेल्या शिफारसी राज्यपालांनी नोव्हेंबर २००० मध्ये स्वीकारल्या व या शिफारशींच्या आधारे २००१-२००२ च्या वार्षिक योजनेमध्ये अनुशेष निर्मूलनासाठी तरतूद करण्यात आली.

'मराठवाडयाचा विकास, अभ्यास व चिंतन' या नावाचा ग्रंथ त्यांनी १९९८ मध्ये प्रसिध्द केला व २००७ मध्ये प्रसिध्द केलेल्या आत्मचरित्राला 'मी, मराठवाडा आणि महाराष्ट्र' असे नाव दिले. आत्मचरित्राच्या मनोगतामध्ये त्यांनी म्हटले आहे की, ''महाराष्ट्र व मराठवाडा ही दोन आयुष्यभर माझी उपास्य दैवते राहिली आहेत. मराठवाडा सर्वार्थाने महाराष्ट्राच्या पोटात असल्याने या दोन दैवतांच्या सेवेमध्ये कसलाही अंतर्विरोध नाही अशी माझी धारणा आहे.''

भारतीय प्रशासकीय सेवेत प्रवेश करण्यापूर्वी हैदराबाद संस्थानाच्या सेवेत केलेले उल्लेखनीय कार्य, त्यानंतर भारतीय प्रशासकीय सेवेत परिश्रमपूर्वक सिध्द केलेले सर्वांगीण कर्तृत्व व निवृत्तीनंतर मराठवाडयासारख्या मागास विभागाच्या विकासासाठी तळमळीने केलेले प्रयत्न असे त्यांच्या प्रशासकीय व सामाजिक कार्याचे त्रिविध पैलू आहेत. या प्रत्येक क्षेत्रात त्यांनी आपल्या सर्व शक्तिनिशी सातत्याने व सर्वांचे सहकार्य मिळवून अतुलनीय कार्य केले. अशा या कर्तृत्ववान व शतायुषी प्रशासकाला या वर्षीचे 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक २०१७' देताना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईला विशेष आनंद होत आहे.

मुंबई<br>
दि.: २५ नोव्हेंबर २०१७

**शरद पवार**<br>
अध्यक्ष,<br>
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

# नवमहाराष्ट्र युवा अभियान

## कार्यवृत्त

नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे काम संयोजक दत्ता बाळसराफ, संघटक निलेश राऊत पाहतात.

विजय कान्हेकर आणि वैशाली मोटे या समन्वयक आहेत, तर कार्यालयीन संघटक म्हणून सुरेश पाटील व सहाय्यक म्हणून मिनल सावंत, रमेश मोरे, मनीषा खिल्लारे, महेश साळवी कार्यरत आहेत.

**विद्यार्थी आरोग्य शिबिर :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, न्यू होरायझन्स, हेल्थ एन्ड रिसर्च फाउंडेशन, आणि इंडियन ॲकॅडमी ऑफ पेडीयेट्रिक्स, यांच्या संयुक्त विद्यमाने ''रयत शिक्षण संस्थेच्या, वाघे माध्यमिक शाळेत नुकतेच'' विद्यार्थी आरोग्य शिबिर घेण्यात आले.

उषादेवी पांडुरंग वाघे माध्यमिक शाळा, कुलाबा येथे रविवारी (दि. ३० जुलै २०१७) विद्यार्थी आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात एकूण २५२ विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. यामध्ये रक्तदाब तपासणी, नेत्र तपासणी, दंत तपासणी, मुलांची वय व त्यानुसार त्यांची उंची आणि वजन, श्वसनक्रियेचा वेग, त्वचेचे आजार, पचन संस्थेशी सबंधित तक्रारी, व्हिटॅमिन, कॅल्शियम, बी-१२ अशा प्रकारच्या तपासणी करण्यात आल्या. या तपासणीमध्ये २९ विद्यार्थ्यांना चष्मा, ११ विद्यार्थ्यांना दातासंबधी तक्रारी, १३ विद्यार्थ्यांना ॲनिमिया ह्या तक्रारी असल्याचे आढळले. यावर त्यांना आवश्यक ती औषधे देण्यात आली. तसेच तपासण्या दरम्यान मुलांशी संवाद साधतांना डॉक्टरांनी त्यांच्या अभ्यासात येणाऱ्या अडचणी शोधून काढल्या व किती विद्यार्थ्यांना हा त्रास आहे हे संबंधित शिक्षकांना समजावून सांगितले.

या शिबिरात पाचवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला. शिबिराच्या उद्घाटनावेळी डॉ. समीर दलवाई (बालरोग तज्ञ) आणि त्यांच्या डॉक्टरांच्या समूहाने सर्व तपासण्या केल्या. सुरुवातीला विद्यार्थी आणि पालक यांना एकत्र बसवून डॉ. दलवाई यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या दिनचर्येबद्दल चर्चा केली. मुले सकाळी न्याहारी करत नाहीत व त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर कसा व काय परिणाम होतो, बाहेरचं अन्न खाल्ल्यामुळे होणारे दुष्परिणाम, तर योग्य वेळी पौष्टिक खाणे व शरीरास आराम, म्हणजे हवी तशी झोप याचे नियोजन कसे करावे हे अगदी हसत्या खेळत्या वातावरणातून डॉ. समीर दलवाई यांनी मुलांना समजावून सांगितले. तसेच ह्या छोट्याशा चर्चेतून पालकांनासुद्धा कानमंत्र मिळाला. तसेच मुलांनी सकाळी शाळेत जाण्याआगोदर कमीतकमी १ तास आधी उठणे गरजेचे आहे. म्हणजे मुले सकाळी न्याहारी स्वतःहून मागतात. परंतु, जे खातील, ते पौष्टिक असावे याची काळजी घ्यावी. अभ्यासाची वेळसुद्धा मुलांना ठरवून दिली की त्यांना त्यांच्या खेळण्यासाठी पुरेसा वेळ मिळतो.

डॉ. समीर दलवाई व डॉ. दीप्ती मोडक यांनी इतर डॉक्टरांच्या सहाय्याने हे आरोग्य शिबिर यशस्वीपणे पार पाडले. या शिबिराला शाळेचे प्राध्यापक श्री. सुरेश धनावडे, वाघे हायस्कूल चे सर्व शिक्षक व प्रतिष्ठानचे कार्यक्रम व्यवस्थापक श्री. दत्ता बाळसराफ आणि वित्त व लेखा व्यवस्थापक श्री. महेश चव्हाण, मिनल सावंत, मनीषा खिल्लारे, महेश साळवी यांची उपस्थिती होती.

**महाराष्ट्र राज्याच्या युवा धोरणाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे गरजेचे...खा. सुप्रिया सुळे**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या नव महाराष्ट्र युवा अभियान विभागातर्फे आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त दि. १२ ऑगस्ट २०१७ रोजी आयोजित करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र राज्य युवा धोरण'या चर्चासत्रामध्ये खा. सुप्रिया सुळे बोलत होत्या. महाराष्ट्र राज्याचे युवा धोरण सन २०१२ साली बनविण्यात आले होते. त्याला ५ वर्षे होत आली, परंतु आजही त्याची अंमलबजावणी योग्य पद्धतीने होत नाही. दर दोन वर्षांनी युवा धोरणाचे पुनरावलोकन केले पाहिजे. यासंबंधी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, नव महाराष्ट्र युवा अभियानच्या माध्यमातून सदर युवा धोरणाच्या अंमलबजावणीतील त्रुटी शासनाच्या

निदर्शनास आणून दिल्या जातील असेही त्या म्हणाल्या.

या चर्चासत्रामध्ये महाराष्ट्र राज्य युवा धोरणाची वैशिष्ट्ये, शासनातर्फे आजपर्यंत राबविण्यात आलेले उपक्रम, अंमलबजावणीबद्दलचे पुनरावलोकन या विषयांवर सविस्तर मांडणी करण्यात आली. युवा धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये मोठी कमतरता राहिली आहे. गेल्या दोन वर्षांमध्ये युवा विकासासाठी नाममात्र निधीची तरतूद झाली आहे, ही निराशाजनक बाब आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या लक्षात घेता प्रत्येक युवामागे केवळ २० ते ३० रुपयांचा खर्च करण्यात आलेला आहे. धोरणामध्ये नमूद केलेले अनेक उपक्रम अजूनही कागदोपत्रीच अस्तित्वात आहेत. युवा धोरण बनविताना पाच वर्षांनी धोरणाचे पुनरावलोकन करण्याचे ठरलेले असताना त्यासंबंधी कोणतीही कार्यवाही होताना दिसत नाही.

या बाबी लक्षात घेऊन आणि युवा दिनाचे औचित्य साधून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई या संस्थेने पुढाकार घेण्याचे ठरविले आणि महाराष्ट्रातील विविध युवा संस्थांना सहभागी होण्याचे आवाहन केले होते. त्या आवाहनाला प्रतिसाद देत निर्मला निकेतन, सी.वाय.डी.ए. पुणे, अनुभव, मुंबई, युवा, कोरो मुंबई, सृष्टीज्ञान, उमंग, संगिनी, एम.आय. टी.एस.एम, आवाज, यासारख्या युवकांबरोबर काम करणाया संस्था तसेच विद्यार्थ्यांनी या चर्चासत्रामध्ये सहभाग घेतला. या चर्चासत्रामध्ये युवा धोरणाच्या विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या चर्चासत्रासाठी खा. सुप्रिया सुळे, मुंबई विद्यापीठातील राजीव गांधी केंद्राचे डॉ. चंद्रकांत पुरी, युवा विकास अभ्यासक मॅथ्यु मट्टम, प्रतिष्ठानचे कार्यक्रम व्यवस्थापक दत्ता बाळसराफ, दिनेश शिंदे, डॉ. नरेंद्र काळे, निलेश राऊत, निलेश पुराडकर, महेंद्र रोकडे, नितीन काळेल आदि उपस्थित होते. निलेश राऊत यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली तर भूषण राऊत यांनी आभार मानले.

**युवा स्वातंत्र्यज्योत रॅली :**

दिनांक. १४ ऑगस्ट २०१७ रोजी स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्र पुरुषांना अभिवादन करून तरुणांमध्ये स्वातंत्र्य दिनाविषयी आदराची जाणीव व जागृती निर्माण व्हावी, यासाठी दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी नव महाराष्ट्र युवा अभियानच्यावतीने युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीची सुरुवात श्री. विजय कसबे यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी सदर युवा स्वातंत्र्य ज्योत रॅलीचा उद्देश सहभागींसमोर मांडला. त्यानंतर प्रमुख पाहुणे विनीत जोगळेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. युवा पिढीच्या भविष्यात काय काय अपेक्षा आहेत, त्यांचे दायित्व काय आहे आणि असावे यावर विवेचन केले. त्यानंतर त्यांच्या हस्ते ज्योत प्रज्वलित करण्यात आली. 'स्वातंत्र्यदिन चिरायू होवो' अशा घोषणा देत प्रबोधनकार ठाकरे यांच्या पुतळ्याला अभिवादन करून रॅली मार्गस्थ झाली.

पुढे सेनापती बापट यांचा पुतळा, शिवाजी पार्क येथील शिवाजी महाराज यांचा पुतळा, सावरकर स्मारकातील स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा पुतळा यांना अभिवादन व पुष्पांजली अर्पण करून त्यांच्यातील महाराष्ट्राच्या जडणघडणीत योगदानास उजाळा दिला गेला.

चैत्यभूमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून सुरेखाताई पेडणेकर यांनी सहभागींना संबोधित केले. त्यानंतर श्री. सुरज भोईर यांनी गायलेल्या उत्स्फूर्त गीतांनी तसेच भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याचे जाहीर वाचन करून राष्ट्रगीत झाले. मनिषा खिल्लारे यांनी शेवटी पाहुण्यांचे व सहभागींचे आभार मानून रॅलीची सांगता केली.

सदर युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीकरिता सुरज भोईर, रमेश मोरे, कैलास खिल्लारे, अर्जुन बचुटे,सोहम, विनायक, इत्यादी सुमारे ७० जणांचा सहभाग लाभला.

**विंदा करंदीकरांची जन्मशताब्दी उत्साहात साजरी :**

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कविवर्य विंदा करंदीकर यांच्या जन्मशताब्दी दिनानिमित्त त्यांच्या साहित्याचे दर्शन घडविणारा कार्यक्रम पॉप्युलर प्रकाशन, दैनिक लोकसत्ता आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २४ ऑगस्ट २०१७ रोजी चव्हाण सेंटर येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात विंदा करंदीकर यांचे कुटुंबीय आनंद करंदीकर, उदय करंदीकर, जया काळे, पत्रकार अंबरिश मिश्र, कवी सौमित्र (किशोर कदम), प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष हेमंत टकले, दैनिक लोकसत्ताचे संपादक गिरीश कुबेर यांनी विंदाच्या गद्य-पद्य साहित्याचे खास शैलीत सादरीकरण केले. खोडकर मस्तीखोर छोटे होत छोट्यांच्या विश्वात धम्माल मज्जा करणारे विविध किस्से मान्यवरांनी सांगितले.

पॉप्युलर प्रकाशनचे ज्येष्ठ प्रकाशक रामदास भटकळ यांनी विंदांचे किस्से नमूद केले. विदांनी त्यांना बक्षीस स्वरूपात मिळालेली

सर्व रक्कम समाजाला वाहिली, याची आठवण भटकळ यांनी करून दिली. साहित्यकृतीचा जागर व्हावा, यासाठी या कार्यक्रमाचे माध्यम प्रायोजकत्व मोठ्या आनंदाने आम्ही स्वीकारले, असे लोकसत्ताचे संपादक गिरीश कुबेर यांनी सांगितले.

करंदीकरांच्या कन्या जया काळे यांनी 'लागेल जन्मावे पुन्हा नेण्या तुला घरी'...या कवितेच्या निर्मितीचा गमतीदार किस्सा ऐकविला. कवी सौमित्र यांनी विंदांच्या लघुनिबंधाचे वाचन केले. यापैकी 'पुरूष आणि पिशव्या' या लघुनिबंधात लग्नानंतर पुरूष कशा पध्दतीने मान खाली घालून पिशव्या घेऊन बाजारहाटला जातात याचे वर्णन सांगितले. विंदांचे कनिष्ठ पुत्र उदय करंदीकर यांनी बालकाव्यसंग्रहातील काही कविता सादर केल्या. तसेच आनंद करंदीकरांनीही विंदांच्या निवडक कवितांचे वाचन केले. या कार्यक्रमासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सरचिटणीस शरद काळे, कार्यक्रम संयोजक दत्ता बाळसराफ इत्यादी उपस्थित होते.

**लघुपट निर्मिती कार्यशाळा :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई नवमहाराष्ट्र युवा अभियान व प्रयोग, मालाड यांच्या संयुक्त विद्यमाने 'फिल्मिन्गो' आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सवाच्या निमित्ताने राज्यात नऊ ठिकाणी लघुपट निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. त्यापैकी पहिली कार्यशाळा रविवार दिनांक २४ सप्टेंबर २०१७ रोजी सकाळी ९ ते २ या वेळेत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथील सांस्कृतिक सभागृहात यशस्वीरित्या पार पडली. कार्यक्रमास प्रयोग मालाड संस्थेचे अध्यक्ष दिलीप म्हात्रे, प्रदीप देवरुखकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रसिद्ध समीक्षक , लेखक-दिग्दर्शक अशोक राणे, महेंद्र तेरेदेसाई यांनी उपस्थितांशी संवाद साधत मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत उत्सुक युवक व युवती असे ९४ सहभागी उपस्थित होते.

माणूस विशीमध्ये आला की, त्याला आपल्या भावना, विचार व्यक्त करावेसे वाटतात. हल्लीच्या युगामध्ये प्रत्येकाकडे मोबाईल आहे, त्यामुळे अगदी कुणीही मोबाईलच्या सहाय्याने शॉर्ट फिल्म बनवू शकतो. जगामध्ये अनेक देशांमध्ये 'मोबाईल फिल्म फेस्टिवल' सुरू होत आहेत. 'शॉर्ट फिल्म बनवण्यासाठी आपला विचार हा मनामध्ये ठाम असायला हवा, आपल्याला आपले काम दाखवायचे आहे', असे मार्गदर्शक अशोक राणे यांनी उपस्थितांना सांगितले.

आपले बजेट किती आहे त्यातून आपल्या शूटिंगची ठिकाणे निवडता येतात. त्यामुळे आपल्याला मनातील विचार आपल्याला चित्रपटाच्या माध्यमातून दाखवता येतात. अगदी दहापंधरा मिनिटांच्या कालावधीमध्ये लोकांवर प्रभाव पाडणारे हे फार उत्तम माध्यम असल्याचे त्यांनी सांगितले, असे महेंद्र तेरेदेसाई म्हणाले. कार्यक्रमामध्ये विविध शॉर्ट फिल्म्स दाखवून मार्गदर्शन करण्यात आले. अशोक राणे आणि महेंद्र तेरेदेसाई यांनी त्यांच्या आयुष्यातील काही मोजके अनुभवसुद्धा सांगितले.

या कार्यशाळेत 'लघुपट' म्हणजे नेमकं काय, लघुपट निर्मितीची इतर अंगे या प्रमुख विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच लघुपट म्हणजे पूर्ण लांबीच्या चित्रपटाचे लघुरूप नव्हे हे स्पष्ट केले गेले, देशविदेशातील लघुपट दाखवून तसेच व्याख्यानाद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. भारतात जागतिक दर्जाचे लघुपट निर्माण व्हावेत आणि लघुपटाविषयी लोकांपर्यंत माहिती पोहोचावी हा या कार्यशाळेचा प्रमुख हेतू होता.

**दिवंगत अरूण साधू यांना प्रतिष्ठानतर्फे आदरांजली :**

'ग्रंथाली' व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या 'रंगस्वर' सभागृहात दिवंगत अरुण साधू यांना आदरांजली वाहण्यासाठी 'जना-मनातले साधू' या कार्यक्रमाचे आयोजन दि. ३ ऑक्टोबर २०१७ रोजी करण्यात आले. आपल्या लेखणीने समाजातील उपेक्षित घटकांची वास्तवस्थिती साहित्यातून मांडणारे चतुरस्र प्रतिभेचे लेखक-पत्रकार अरुण साधू यांनी मराठी माणसांच्या मनात विशिष्ट स्थान निर्माण केले, अशी भावना प्रतिष्ठानचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केली.

डॉ. रवींद्र थत्ते, ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर, 'ग्रंथाली'चे दिनकर गांगल, लेखिका मीना गोखले, माजी मंत्री अरुण गुजराथी, ज्येष्ठ दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल, प्रतिष्ठानचे सरचिटणीस व अध्यक्ष शरद काळे, 'लोकसत्ता'चे संपादक गिरीश कुबेर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

राजकीय, सामाजिक प्रश्नांची आखणी करताना त्यामागील इतिहास व साहित्यप्रवाहाचा व्यासंगपूर्ण अभ्यास असणाऱ्यांमध्ये साधू यांचे नाव अग्रभागी होते. मराठी साहित्यात वैविध्यपूर्ण लेखन करणाऱ्या मोजक्या साहित्यिकांत साधू यांचा समावेश होतो, असे सांगून डॉ. पटेल यांनी

'सिंहासन' चित्रपटाच्या वेळेस अरूण साधू यांच्यासोबतच्या काही आठवणींना उजाळा दिला. प्रा. मीना गोखले म्हणाल्या, ''अरूण साधू यांच्या निवडक कथांचे संपादन करताना लेखक आणि माणूस म्हणून जाणून घेण्याची संधी मिळाली. त्यांचे लिखाण 'लोकल ते ग्लोबल' अशा स्वरूपाचे होते. त्यांना कवितेचीही विशेष आवड होती.''

''पत्रकारितेत सत्य किती सांगायचे यात मोठी आडकाठी असते. अशावेळी सत्याला कल्पनेच्या कोषात गुंडाळून मांडण्याचा कलात्मक मार्ग अरूण साधू यांनी पुढच्या पिढीला दाखविला,'' असे 'लोकसत्ता'चे संपादक गिरीश कुबेर म्हणाले.

''लढणाऱ्या व्यक्तींबद्दल साधू यांना अतिशय आदर व आस्था होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपल्या लेखनातून न्याय देता आला नाही अशी खंत त्यांना कायम वाटत होती. ती कमतरता त्यांनी डॉ. पटेलांच्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या चित्रपटाच्या निमित्ताने पूर्ण केली. कलेचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व जपणारा, कथा, कांदबरी, नाटक, एकांकिका या सहित्यप्रकारात चाकोरीबाहेरच्या वाटा चोखाळणारा अरुण साधू पुन्हा होणे नाही,'' अशा शब्दांत ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर यांनी साधू यांना श्रद्धांजली वाहिली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला 'असा साधू होणे नाही' ही साधू यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेणारी ध्वनिचित्रफीत दाखविण्यात आली. या कार्यक्रमास साधू यांचे कुटुंबियही उपस्थित होते. याप्रसंगी दिनकर गांगल, कुमार केतकर, जब्बार पटेल, गिरीश कुबेर, मीना गोखले, प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे, प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष अरुण गुजराथी , प्रतिष्ठानचे सरचिटणीस शरद काळे आणि कोषाध्यक्ष हेमंत टकले उपस्थित होते. तसेच साहित्य, पत्रकारिता, आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांची या सभेला उपस्थिती होती. यावेळी साधूंच्या 'सिंहासन', 'मुंबई दिनांक', 'झिपऱ्या' अशा एकाहून एक सरस कलाकृतींचा आवर्जून उल्लेख करण्यात आला. याप्रसंगी अरुण साधू यांच्या अनेक आठवणींना उजाळा दिला गेला.

**विज्ञानगंगा:**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने प्रत्येक महिन्याला 'विज्ञानगंगा' या नावाने वेगवेगळी वैज्ञानिक व्याख्याने प्रतिष्ठानमध्ये आयोजित करण्यात आली. त्यामध्ये खालील व्याख्यानांचा समावेश आहे :

**आधुनिक भारताची विज्ञान क्षेत्रातील प्रगती:**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'विज्ञानगंगा' चे सोळावे पुष्प शुक्रवार दिनांक १६ जून, २०१७ रोजी 'आधुनिक भारताची विज्ञान क्षेत्रातील प्रगती' या विषयावर गुंफले गेले. विशेष म्हणजे, कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. सुधीर पानसे यांनी सुरुवातीला सांगितले की, प्राचीन भारतीय वैज्ञानिक इतिहास सर्वांना आठवतो परंतु, हा आधुनिक भारतीय विज्ञानाचा इतिहास काय आहे, आपल्याला गुगल सर्चमध्येदेखील सापडत नाही. आपली संस्कृती ही ५,००० वर्षे जुनी आहे. आपल्याला अभिमान वाटावा अशा अनेक गोष्टी आपल्या प्राचीन संस्कृतीमध्ये आहे. विज्ञानासंबंधित सांगताना, सुरुवातीला विद्यापीठे कशी व कोठे सुरू झाली याबाबत त्यांनी सांगीतले. सर्वात आधी तीन विद्यापीठे सुरू झाली मुंबई, कलकत्ता व मद्रास (चेन्नई) ही पहिली तीन विद्यापीठे ब्रिटीशांनी निर्माण केली. त्यांच्याबद्दलची सखोल माहिती त्यांनी दिली. प्रफुलचंद्र रॉय आणि जगदीशचंद्र बोस यांच्या विज्ञानातील योगदानाबद्दल माहिती त्यांनी दिली. सर्वात आधी इलेक्ट्रोमॅग्नेटीक वेव्हस् मोजण्याचे यंत्र हे जगदीशचंद्र बोस यांनी भारतातच बनविले होते. जे प्रयोग युरोपमध्येही कधीही झाले नसतील असे प्रयोग जगदीशचंद्र बोस यांनी भारतात केले आहेत. अशाच प्रकारे मेघनाथ सहा, शांतीस्वरूप भटनागर, दामोदर कोसंबी, होमी भाभा यांसारख्या महान वैज्ञानिकांच्या संशोधनांबद्दल अतिशय चांगल्या प्रकारे माहिती सांगितली. आधुनिक भारताच्या विज्ञानातील प्रगतीसाठी हे कसे कारणीभूत आहेत, याची माहिती त्यांनी पटवून दिली.

**चिरतारुण्य :** शुक्रवार दिनांक २१ जुलै, २०१७ रोजी 'चिरतारुण्य' या विषयावरील भाषण पार पडले. डॉ. उल्हास कोलथुर यांनी दिलेल्या अमूल्य माहितीमुळे उपस्थितांमध्ये आपणही आपले तारुण्य कसे जपावे व त्यासाठी काय करता येईल याची उत्सुकता निर्माण झाली सुरुवातीला त्यांनी सांगितले की, 'प्रत्येक व्यक्ती मरेपर्यंत स्वस्थ राहून जगावी' हा त्यांच्या संशोधनामागचा हेतू आहे. चिरतारुण्य म्हणजेच 'Ever Youthfullness'. पुढे ते म्हणाले, 'ये जरुरी नहीं कि हम बहोत साल तक जीये मगर ये जरुरी है कि हम जब तक जिये अच्छी जिंदगी जिये।' आपण दिवसेंदिवस वयस्कर कसे होतो व त्यामागची काय कारणे आहेत

याबद्दल त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे मेंदू हा आपल्या शरीरातील सर्वात महत्वाचा अवयव असला तरीही यकृताचे कार्यही तितकेच महत्वाचे असते असे त्यांनी लोकांना पटवून दिले. कमी जेवण करणारी व्यक्ती ही दीर्घायुष्य जगते व जास्त जेवण करणारी व्यक्ती ही कमी जगते, त्याचप्रमाणे तिला जास्त आजारही जडतात. कमी खावे, परंतु पौष्टिक अन्न ग्रहण करावे. पूर्वीचे लोक जास्त काळ जगायचे, कारण ते डाळ, भात, दोन भाज्या, पोळी, सलाड, दूध, तूप अशा चांगल्या प्रकारचे अन्न ग्रहण करीत. परंतु, जेव्हापासून 'फॉरेन फूड' आपल्या भारतात आले आहे उदा. बर्गर, फ्राईझ, चायनीज, अति तेलकट पदार्थ तेव्हापासून आपले सरासरी जगण्याचे वय कमी झाले आहे. म्हणजेच आधी आपण ९०- १०० वर्षे जगायचो; तर आता ६०-६५ वर्षेच जगतो. तसेच हे सर्व निष्कर्ष बऱ्याच कीटकांवर व माकडांवर प्रयोग करून झालेले आहेत, असे सांगून त्यांनी त्याचे प्रात्यक्षिकही दाखविले.

बालवयात आईपासून दुरावणाऱ्या मुलांवर त्याचा परिणाम त्यांच्या वाढत्या वयात होतो व त्यांना शारीरिक व्याधींना सामोरे जावे लागते. 'कम खाओ और ज्यादा जिओ' असे त्यांनी आपल्या व्याख्यानातून उपस्थितांना पटवून दिले. व्याख्यानाच्या वेळी जसे ते प्रत्येक गोष्ट उलगडत जात होते, तसेतसे प्रेक्षक आश्चर्यचकित होत होते. त्यांनी दिलेल्या व्याख्यानाचा सर्व प्रेक्षकांना रोजच्या जीवनात नक्कीच उपयोग झाला असेल.

**जेनेटिक्स :**

शुक्रवार दिनांक १८ ऑगस्ट, २०१७ रोजी 'जेनेटिक्स' या विषयावरील भाषण पार पडले. आपल्या भाषणात त्यांनी सांगितले की, आपल्या शरीरामध्ये जीन्स कशाप्रकारे काम करतात, काही मानवांमध्ये जी ॲबनॉर्मिलीटी येते, ती कशामुळे येते व त्याचा अभ्यास करण्यासाठी आधी नॉर्मल माणसांचे जीन्स कसे असतात अथवा कसे तयार होतात त्याचा अभ्यास होणे आवश्यक असते. आपल्या डी. एन. ए. मध्ये थोडा जरी बदल झाला तरी त्याचा खूप मोठा परिणाम आपल्या शरीरावर होतो. वैज्ञानिक संशोधन करीत असताना शास्त्रज्ञांनी माशी या किटकाच्या डी. एन. ए. मध्ये बदल करून पाहिले. त्यांना असे आढळून आले की, डी. एन. ए. मधला एखादा एलिमेंट जरी आपण आपआपसात बदलला तरी शरीराची संपूर्ण रचना बदलते. जसे ती माशी जन्माला आल्यानंतर तिला डोक्याच्या ठिकाणी पाय आले होते. असेच अनेक बदल केले की, पायांच्या ठिकाणी हात अथवा डोळे पाठीवर येणे असे वेगवेगळे बदल झालेले आढळले. अशा संशोधनांवरून नवजात बाळाच्या डी. एन. ए. मध्ये बदल करून त्याची ॲबनॉर्मिलीटी आपण कशा प्रकारे दूर करण्यास मदत करू शकतो हे त्यांनी उपस्थितांना समजाविले. त्याचबरोबर या सगळया संशोधनांचा मानवाला होणारा उपयोगही त्यांनी समजावून सांगितला.

**व्हर्टिकल फार्मिंग :** शुक्रवार दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ रोजी 'व्हर्टिकल फार्मिंग' या विषयावरील भाषण पार पडले. भाषणाच्या सुरुवातीला त्यांनी सांगितले की, आजकाल शिक्षक होण्यासाठी खूप कमी विद्यार्थ्यांचे हात वर होतात. शेतकरी होण्यासाठी तर एकही हात वर होत नाही. फक्त डॉक्टर-इंजीनिअर्स होण्यासाठी हात वर होतात. एवढेच नाही, तर ॲग्रीकल्चर कॉलेजमध्ये त्यांनी विचारले असता एकही विद्यार्थी शेतकरी होण्यास तयार नव्हता. सर्व एम. पी. एस. सी. व यू. पी. एस. सी साठी तयारी करीत होते. पुढे आपल्या भाषणातून त्यांनी शेतकरी होण्याचे महत्व पटवून दिले त्याचप्रमाणे वेगवेगळया चित्रांद्वारे त्यांनी 'व्हर्टिकल फार्मिंग' कशी करावी व त्यापासून काय काय फायदे होतात, हे सविस्तरपणे सांगितले. आपण एखादे रोप किंवा एकतरी भाजी घरीच उगवली तरी तिचा उपयोग आपल्या देशाचा जी.डी.पी. वाढविण्यास होतो, असे त्यांनी उपस्थितांना समजाविले. लोकसंख्यावाढ एवढी झाली आहे की, 'व्हर्टिकल फार्मिंग' करणे आवश्यक झाले आहे. 'व्हर्टिकल फार्मिंग'चे विविध उपयोग त्यांनी उपस्थितांना समजावून सांगितले.

# अपंग हक्क विकास मंच

## कार्यवृत्त

संवाद व समन्वयाच्या भूमिकेतून महाराष्ट्रातील अपंग व्यक्तींच्या विविध समस्या सोडविण्यासाठी अपंग हक्क विकास मंचाची निर्मिती करण्यात आली. मंचाच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे आहेत. मंचाचे संयोजक म्हणून विजय कान्हेकर व दत्ता बाळसराफ तर समन्वयक म्हणून सुहास तेंडुलकर, अभिजीत राऊत तर संघटक म्हणून सुकेशनी मर्चंडे-शेवडे या काम पाहतात. या मंचामार्फत महाराष्ट्रातील अपंगांसाठी विविध जिल्ह्यांत मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिरांचे आयोजन केले जाते. सर्व प्रवर्गातील अपंगांना त्यांच्या आवश्यकतेनुसार मोजमाप घेऊन कृत्रिम अवयव व साधने मोफत उपलब्ध करून दिली जातात. तसेच मंचाच्या वतीने नियमित अपंगांच्या विविध विषयांवर, समस्यांवर नियमित चर्चा व कार्यशाळेचे आयोजन करून त्यांच्या समस्यांचे निरसन करण्यात येते. मार्गदर्शन व सल्ला दिला जातो.

**दिनांक ४ जून व ५ जून,२०१७ दिव्यांगांसाठी 'रायगड प्रदक्षिणा मोहिम' :** जागतिक पर्यावरण दिन व शिव राज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने यावंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपंग हक्क विकास मंच आणि श्री शिवछत्रपती अॅडव्हेंचर ऑर्गनायझेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अपंगांसाठी रायगड प्रदक्षिणा या मोहिमेचे आयोजन दिनांक ४ जून व ५ जून,२०१७ रोजी करण्यात आले होते. या मोहिमेत २५ अपंग व ५० सामान्य लोकांनी सहभाग घेतला. यात अपंग हक्क विकास मंचाचे कार्यकर्ते अनिल चाळके यांनी मोहिमेचे नेतृत्व केले. मोहिमेच्या यशस्वितेसाठी अनिल चाळके व सुकेशनी मर्चंडे-शेवडे यांनी परिश्रम घेतले.

**दिनांक २३ जून, २०१७ 'आत्ममग्नता अपंगत्वाविषयी जाणीव जागृती' एक दिवसीय कार्यशाळा :** सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपंग हक्क विकास मंच, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, यशदा- पुणे, महाराष्ट्र वित्त विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य-पुणे, परिवार, फोरम फॉर ऑटिझम आणि सोपान यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक २३ जून, २०१७ रोजी, मुख्य सभागृह, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, नरीमन पॉइंट येथे ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेचे उद्घाटन मा. मंत्री राजकुमारजी बडोले (मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य) यांनी केले. मा. ना. दिलीप कांबळे (राज्यमंत्री, सामाजिक न्याय), मा. खा. सुप्रिया सुळे, मा. नंदकुमार (शिक्षण सचिव), मा. दिनेश वाघमारे (सचिव सामाजिक न्याय), मा. नितीन पाटील (आयुक्त, अपंग कल्याण) आदी मान्यवर त्यवेळी उपस्थित होते.

ही एक दिवसीय कार्यशाळा 'ऑटिझम' या अपंगत्वाबद्दल जनजागृती आणि शैक्षणिक आणि सामाजिक समावेशकता या विषयाला केंद्रित आयोजित करण्यात आली होती. योग्य वेळी शीघ्र निदान आणि हस्तक्षेप केल्यास या प्रवर्गामधील मुलांची चांगली प्रगती होऊ शकते आणि ही मुले समाजाचा एक भाग म्हणून सन्मानाने जगू शकतात, यावर या विषयातील तज्ज्ञ व्यक्तींनी प्रकाश टाकला.

कार्यशाळेसाठी ऑटिझम असणाऱ्या मुलांचे पालक, मुंबई विभगातील सामान्य शाळेचे शिक्षक, विशेष शाळेचे शिक्षक, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, विषय तज्ज्ञ, प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. या कार्यशाळेसाठी एकूण १२०० लोकांची उपस्थिती होती.

सदरील कार्यशाळेची संकल्पना मा. नितीन पाटील (आयुक्त, अपंग कल्याण) यांची होती. मा. यशवंत मोरे (प्रादेशिक उपायुक्त, मुंबई) 'परिवार'चे कमांडर श्री. बिजुर, 'फोरम फॉर ऑटिझम'च्या बबीता राजा, 'सोपान'च्या डॉ. रुबिना लाल व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, अपंग हक्क विकास मंचचे संयोजक विजय कान्हेकर व चव्हाण प्रतिष्ठानचे कार्यकर्ते, यशदाचे कार्यकर्ते व कर्मचारी वृंद यांनी या कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी विशेष परिश्रम घेतले.

**दिनांक २३ जून, २०१७ 'दिशा सबलीकरणाची' एक दिवसीय कार्यशाळा** : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपंग हक्क विकास मंच, सहयोगिनी पालक संस्था, नवी मुंबई आणि हेलन केलर इन्स्टिट्युट ऑफ डेफ अॅन्ड ब्लाइंड यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २३ जून, २०१७,रोजी 'दिशा सबलीकरणाची' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन सांस्कृतिक सभागृह, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे करण्यात आले. अंधत्व आणि कर्णबधिरत्व असणाऱ्या मुलांसाठी व त्यांच्या पालकांसाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत एकूण १३० व्यक्तींनी सहभाग घेतला.

**दिनांक १० जुलै ते १३ जुलै,२०१७ – कृत्रिम अवयव व साधने वाटप करण्यासाठी नोंदणी व मोजमाप शिबिरांचे आयोजन** :

| दिनांक | तालुका | लाभार्थी |
|---|---|---|
| १० जुलै, २०१७ | दौंड | २५२ |
| | इंदापूर | २३४ |
| ११ जुलै, २०१७ | बारामती | ३०८ |
| | पुरंदर, (सासवड) | २७१ |
| १२ जुलै, २०१७ | खडकवासला | २६४ |
| | भोर | ४५४ |
| १३ जुलै, २०१७ | खडकवासला | ३३३ |
| | पौंड | २४४ |
| | **एकूण लाभार्थी** | **२३६०** |

**'राष्ट्रीय न्यास कायदा १९९९' अंतर्गत कायदेशीर पालकत्वासाठी महाराष्ट्रातील जिल्हयांमध्ये स्थानिक समिती गठित करण्यासाठी एक दिवसीय कार्यशाळा** : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपंग हक्क विकास मंच, नॅशनल ट्रस्ट, अपंग कल्याण आयुक्तालय, पुणे आणि जय वकील फाउंडेशन अॅन्ड रिसर्च सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक १२ ऑगस्ट, २०१७ रोजी सांस्कृतिक सभागृह, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेकरीता महाराष्ट्रातील सर्व जिल्हयांचे जिल्हाधिकारी, जिल्हा समाजकल्याण अधिकारी व त्यांचे कर्मचारी व राष्ट्रीय न्यास पंजीकृत संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या कार्यशाळेसाठी एकूण १४० व्यक्तींची उपस्थिती होती.

**६) डिजिटल श्रवणयंत्र वाटपासाठी कर्णबधिर मुलांसाठी व ज्येष्ठ नागरिकांसाठी कर्णसाच्यांची नोंदणी व मोजमाप शिबिर** : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई चा अपंग हक्क विकास मंच, स्टारकी फाउंडेशन, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, सक्सेरिया फाउंडेशन मुंबई, ठाकरसी ग्रुप मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ संचलित जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे जिल्हयातील विविध तालुक्यात कर्णबधिर मुलांसाठी व ज्येष्ठ नागरिकांसाठी कर्णसाच्यांसाठी नोंदणी व मोजमाप शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. त्याची सविस्तर माहिती पुढील तक्त्यामध्ये आहे.

| दिनांक | तालुका | लाभार्थी |
|---|---|---|
| ३० ऑगस्ट, २०१७ | दौंड | २५२ |
| ३१ ऑगस्ट, २०१७ | इंदापूर | २३४ |
| १ सप्टेंबर, २०१७ | बारामती | ३०८ |
| २ सप्टेंबर, २०१७ | पुरंदर, (सासवड) | २७१ |
| | **एकूण लाभार्थी** | **६८६** |

**कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर** : सामाजिक न्याय मंत्रालय भारत सरकार, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने सिंधुदुर्ग येथील अपंग संमिश्र पुनर्वसन केंद्र, येथे दिनांक १९ ऑगस्ट, २०१७ रोजी सिंधुदुर्ग जिल्हयातील विविध प्रवर्गातील अपंग व्यक्तींसाठी मोफत कृत्रिम अवयव/साधने वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी समाज कल्याण विभागाचे (वै.सा.का.) श्री. यतीन अहिरे, माऊली कर्णबधिर विद्यालयाच्या श्रीमती गायकवाड, संस्थेचे मुख्याध्यापक श्री. उकरिंडे, शिक्षक वर्ग, विद्यार्थी, दिव्यांगांचे पालक यांची उपस्थिती होती. या

शिबीरात एकूण २० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली असून गरजू लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले.

**कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर :** सामाजिक न्याय मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने औरंगाबाद येथे दिनांक २० ऑगस्ट,२०१७ रोजी औरंगाबाद जिल्हयातील विविध प्रवर्गातील अपंग व्यक्तिंसाठी मोफत कृत्रिम अवयव/साधने वाटप शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरासाठी मा. श्री. नितीन पाटील (आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र, पुणे), समाज कल्याण विभागाचे वैसाका श्री. मालसिंग पवार, मा. विजय कान्हेकर (सचिव, महात्मा गांधी सेवा संघ) शिक्षक वर्ग, विद्यार्थी, दिव्यांगांचे पालक यांची उपस्थिती होती. या शिबिरात एकूण ३८ अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली असून गरजू लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले.

**कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर :** सामाजिक न्याय मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २१ ऑगस्ट, २०१७ रोजी रायगड जिल्हयातील विविध प्रवर्गातील अपंग व्यक्तींसाठी मोफत कृत्रिम अवयव/साधने वाटप शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरासाठी शिक्षक वर्ग, विद्यार्थी, दिव्यांगांचे पालक यांची उपस्थिती होती. या शिबीरात एकूण २० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली असून गरजू लाभार्थींना साहित्याचे वाटप करण्यात आले.

**कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर :** सामाजिक न्याय मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ रोजी कोल्हापूर जिल्हयातील विविध प्रवर्गातील अपंग व्यक्तिंसाठी मोफत कृत्रिम अवयव/साधने वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरासाठी मा. प्रदीप भोगले, नंदकुमार फुले (समन्वयक डीडीआरसी, पुणे, मा. विजय कान्हेकर (सचिव, महात्मा गांधी सेवा संघ) शिक्षक वर्ग, विद्यार्थी, दिव्यांगांचे पालक यांची उपस्थिती होती. या शिबिरात एकूण २० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली असून गरजू लाभार्थींना साहित्याचे वाटप करण्यात आले.

**कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर :** सामाजिक न्याय मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ रोजी रत्नागिरी जिल्हयातील विविध प्रवर्गातील अपंग व्यक्तींसाठी मोफत कृत्रिम अवयव/साधने वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरासाठी मा.श्री. सुनिल सईद (जिल्हा समाज कल्याण अधिकारी), नंदकुमार फुले (समन्वयक डीडीआरसी, पुणे) श्रीमती सुरेखा जोशी, श्री. अभिजित खानविलकर, श्री. विलास कदम, शिक्षक वर्ग, विद्यार्थी, दिव्यांगांचे पालक यांची उपस्थिती होती. या शिबिरात एकूण २० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली. गरजू लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले.

**कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर :** सामाजिक न्याय मंत्रालय (भारत सरकार) नवी दिल्ली यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २६ ऑगस्ट, २०१७ रोजी पुणे जिल्हयातील विविध प्रवर्गातील अपंग व्यक्तिंसाठी मोफत कृत्रिम अवयव/साधने वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरासाठी मा.श्री. कोरंगटीवार (जिल्हा समाज कल्याण अधिकारी), मा. डॉ. शेळके, नंदकुमार फुले (समन्वयक डीडीआरसी, पुणे) मा. श्री. बी.एम. तायडे, मा. शिक्षक वर्ग, विद्यार्थी, दिव्यांगांचे पालक यांची उपस्थिती होती. या शिबीरात एकूण १८ अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली, गरजू लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले

**कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर :** सामाजिक न्याय मंत्रालय

भारत सरकार नवी दिल्ली यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २९ ऑगस्ट, २०१७ रोजी धुळे जिल्हयातील विविध प्रवर्गातील अपंग व्यक्तिंसाठी मोफत कृत्रिम अवयव / साधने वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरासाठी मा.श्री. पी. यु. पाटील (जिल्हा समाज कल्याण अधिकारी), शिक्षक वर्ग, विद्यार्थी, दिव्यांगांचे पालक यांची उपस्थिती होती. शिबिरात एकूण २३ अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली गरजू लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले.

**कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर :** सामाजिक न्याय एवम् मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद परभंणी यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २९ ऑगस्ट, २०१७ रोजी परभणी जिल्हयातील विविध प्रवर्गातील अपंग व्यक्तिंसाठी मोफत कृत्रिम अवयव/साधने वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरासाठी मा. श्रीमती भावनाताई नखाते (अध्यक्षा, जिल्हा परिषद, परभणी) मा.श्री. भोजने (जिल्हा समाज कल्याण अधिकारी), मा डॉ. मिलिंद कान्हेकर, मा. शशिकांत दोपांडे (सचिव, ग्रामीण भाजपा), मा. विजय कान्हेकर (सचिव, महात्मा गांधी सेवा संघ), मा. शिक्षक वर्ग, विद्यार्थी, दिव्यांगांचे पालक यांची उपस्थिती होती. या शिबिरात एकूण १६ अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली, गरजू लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले.

**कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर :** सामाजिक न्याय मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी अकोला जिल्हयातील विविध प्रवर्गातील अपंग व्यक्तिंसाठी मोफत कृत्रिम अवयव/साधने वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरासाठी मा.श्री. नरेंद्र दाभाडे (वै.सा.का.), मा. शिक्षक वर्ग, विद्यार्थी, दिव्यांगांचे पालक यांची उपस्थिती होती. या शिबिरात एकूण २४ अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली, गरजू लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले.

**हिंगोली :** सामाजिक न्याय मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी हिंगोली जिल्हयातील विविध प्रवर्गातील अपंग व्यक्तिंसाठी मोफत कृत्रिम अवयव/साधने वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरासाठी मा. श्री. अनिल पतंगे (उपाध्यक्ष, जिल्हा परिषद), मा. शेषराव कावरेकर (संचालक, राष्ट्रीय अपंग विकास महासंघ), शिक्षक वर्ग, विद्यार्थी, दिव्यांगांचे पालक यांची उपस्थिती होती. या शिबिरात एकूण १७ अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली असून गरजू लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले.

**नाशिक :** सामाजिक न्याय मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १४ सप्टेंबर, २०१७ रोजी नाशिक जिल्हयातील विविध प्रवर्गातील अपंग व्यक्तींसाठी मोफत कृत्रिम अवयव/साधने वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरासाठी मा.श्री. विनय पाटील (वै.सा.का.), मा. काकासाहेब भामरे (संचालक, निवासी अपंग कल्याण केंद्र) शिक्षक वर्ग, विद्यार्थी, दिव्यांगांचे पालक यांची उपस्थिती होती. या शिबिरात एकूण २३ अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली, गरजू लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले.

**लातूर :** सामाजिक न्याय एवम् मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १६ सप्टेंबर, २०१७ रोजी लातूर जिल्हयातील विविध प्रवर्गातील अपंग व्यक्तिंसाठी मोफत कृत्रिम अवयव/साधने वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरासाठी मा.श्री. कांबळे (वै.सा.का.), माबालुरे सर (सचिव, महाराणा प्रताप शिक्षण संस्था), मा

कदम सर, मा. शिक्षक वर्ग, विद्यार्थी, दिव्यांगांचे पालक यांची उपस्थिती होती. या शिबिरात एकूण २० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली, गरजू लाभार्थींना साहित्याचे वाटप करण्यात आले.

**सोलापूर :** सामाजिक न्याय मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १६ सप्टेंबर, २०१७ रोजी सोलापूर जिल्हयातील विविध प्रवर्गातील अपंग व्यक्तींसाठी मोफत कृत्रिम अवयव/साधने वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरासाठी मा. श्रीमती कांबळे (वै.सा.का.), नंदकुमार फुले (समन्वयक, डी.डी.आर.सी., पुणे) मा. शिक्षक वर्ग, विद्यार्थी, दिव्यांगांचे पालक यांची उपस्थिती होती. शिबिरात एकूण २० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली, गरजू लाभार्थींना साहित्याचे वाटप करण्यात आले.

**बीड :** सामाजिक न्याय मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद बीड यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ रोजी बीड जिल्हयातील विविध प्रवर्गातील अपंग व्यक्तिंसाठी मोफत कृत्रिम अवयव/साधने वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरासाठी मा.श्री. गोरे (समाजकल्याण अधिकारी), मा. दिलीप देशमुख (सचिव, आयुर्मांगलम निवासी, मुकबधिर विद्यालय) मा. अलोक कुलकर्णी (मुख्याध्यापक), शिक्षक वर्ग, विद्यार्थी, दिव्यांगांचे पालक यांची उपस्थिती होती. या शिबीरात एकूण २२ अपंग लाभार्थींची नोंदणी व तपासणी करण्यात आली. गरजू लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले.

**अंध व्यक्तींसाठी चर्चासत्र :** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपंग हक्क विकास मंच आणि ब्लाइंड ग्रॅज्युएट फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने दर महिन्याच्या चौथ्या शनिवारी अंध प्रवर्गासाठी चर्चासत्राचा उपक्रम राबवला जातो. या सत्रात अंधांना विविध क्षेत्रातील मान्यवर बोलावून त्यांच्या संबंधित विषयावर मार्गदर्शनपर चर्चा केली जाते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शिक्षणातील झालेले बदल, नोकरीत, सामान्य जीवनात येणारे अडथळे अशा विषयांवर चर्चा केली जाते. यामुळे या प्रवर्गातील अपंगांना त्यांचे आयुष्य कसे सोप्या पध्दतीने जगता येऊ शकेल, याबद्दल विशेष मार्गदर्शन मिळते आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यास मदतही होते. या चर्चासत्राच्या आयोजनासाठी सौ. सुकेशनी मर्चंडे-शेवडे विशेष परिश्रम घेतात.

## नव्या पिढीकडून अपेक्षा

मला वाटते, विशाल आणि विधायक विचारांची स्वप्ने साकार करावयाची, प्रत्यक्ष कृतीने दर्शवायची, तर त्यासाठी आणखी काही आत्मसात करावे लागत असावे. ज्यांनी ही स्वप्ने साकार केली, प्रत्यक्ष कृती केली, त्यांनी आपले विचार मेंदूत अडकवून ठेवले नाहीत. ते रक्तात भिनविले. म्हणूनच त्यांच्याकडून विधायक कृती घडली असली पाहिजे. क्रांतिकारकांनी इतिहास घडविला, तो त्यांचे रक्त तापलेले होते, असे आपण म्हणतो. याचा खरा अर्थ, त्या तरुणांनी देशाच्या स्वातंत्र्याचे विचार रक्तात भिनविले होते, असाच केला पाहिजे. देश सर्वार्थाने सुखी बनविण्याचा विचार स्वातंत्र्योत्तर नव्या पिढीने असा रक्तात भिनविला, तर नव्या पिढीकडून विधायक कार्य घडू शकेल, यावर माझा विश्वास आहे.

– मा. यशवंतराव चव्हाण

# शिक्षण विकास मंच

## कार्यवृत्त

महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण योगदान देण्याचे काम २००८ पासून शिक्षण विकास मंचाने केले आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे शिक्षण विषयक कार्यक्रम शिक्षण विकास मंचामार्फत आयोजित केले जातात. शिक्षण विकास मंचाच्या निमंत्रक मा. खा. सुप्रिया सुळे या आहेत. डॉ. वसंत काळपांडे मुख्य संयोजक आणि बसंती रॉय या विशेष सल्लागार म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. दत्ता बाळसराफ हे संयोजक आहेत. नजमा काझी, शुभदा चौकर, सुरेश पाटील हे सदस्य आहेत. तर समन्वयक म्हणून माधव सूर्यवंशी, मीनल सावंत काम पाहतात. शिवाय विविध कार्यक्रमानुरूप महाराष्ट्रातील शिक्षण तज्ज्ञ, प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक यांचे वेळोवळी सहकार्य मिळत असते.

शिक्षण विकास मंच दरवर्षी 'शिक्षण' या विषयाशी संबंधित विषयावर राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करत असते. प्राथमिक आणि माध्यमिक शाळांचा दर्जा वाढविण्यासाठी मुख्याध्यापक, शिक्षक यांना वेळोवळी गरजेनुसार मार्गदर्शन करत असते. शिक्षकांच्या साहित्य गुणांना वाव देण्यासाठी शिक्षक साहित्य संमेलनाची सुरुवातही शिक्षण विकास मंचाने केली आहे. शिक्षण विषयाशी संबंधित अशा शैक्षणिक ग्रंथांना शिक्षण विकास मंचाकडून पुरस्कार दिले जातात.

शिक्षण विकास मंचाकडून एप्रिल २०११ पासून शिक्षण कट्ट्याची सुरुवात करण्यात आली आहे. शिक्षणक्षेत्राशी संबंधित मंडळी एखादा विषय ठरवून त्या विषयावर गप्पा मारण्यासाठी कट्ट्यावर एकत्र येतात. यात मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षण तज्ज्ञ, शैक्षणिक पत्रकार, पालक, संस्थाचालक यांचा सहभाग लक्षणीय असतो.

साधारणपणे दोन महिन्यातून एकदा हा कट्टा राज्याच्या विविध शहरात घेतला जातो. शैक्षणिक क्षेत्रात शिक्षण कट्ट्याने आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. शिक्षण कट्ट्यावर आलेल्या विविध विषयांची 'कट्टा शिक्षण' ही पुस्तिकाही प्रकाशित झाली आहे.

शिक्षण विकास मंचाने २००८ पासून शिक्षण क्षेत्रात अनेक होतकरू तरुण ग्रामीण शिक्षकांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले, त्यांची महाराष्ट्राला ओळख करून दिली.

**शिक्षण हक्क कायदा आणि गुणवत्ता विषयी मार्गदर्शन :**

शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान ,मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिक्षणकट्टा' या उपक्रमांर्तगत नियमितपणे विविध विषयांचे आयोजन केले जाते. यावेळी शिक्षण हक्क कायदा आणि गुणवत्ता या महत्वाच्या विषयावर दि. १७ जुलै २०१७ रोजी शिक्षणकट्टयावर शिक्षक व पालक, यांची चव्हाण सेंटर मध्ये सकारात्मक चर्चा झाली. सुरुवातीला श्रीमती बसंती रॉय यांनी उपस्थित पालक, शिक्षक आणि पत्रकारांना कार्यक्रमाचे स्वरुप समजावून सांगितले आणि 'शिक्षण हक्क कायदा आणि गुणवत्ता' याबाबत मार्गदर्शन केले. सध्या पहिली ते आठवी पर्यंत मुलांना अधिनियम निष्पती केंद्रिय शाळांना लागू करण्यात आली आहे. म्हणजेच काही ठराविक गोष्टी मुलांना आल्याच पाहिजेत असे शासनाकडून बंधनकारक करण्यात आले आहे. हा नियम सध्या तेलांगना राज्यात लागू करण्यात आला आहे. यावर उपस्थितांची मते संयोजक डॉ. वसंत काळपांडे जाणून घेतली. उपस्थित शिक्षकांची समस्या जाणून घेऊन काळपांडे यांनी मार्गदर्शन केले.

**शिक्षण हक्क कायदा आणि गुणवत्ता, १५ जुलै २०१७ :**

शिक्षणप्रेमीनी शिक्षणाविषयक काही औपचारिक तर काही अनौपचारिक पद्धतीने चर्चा करण्याचे ठिकाण म्हणजे ''शिक्षणकट्टा'' हे होय. गेली दहा वर्षे हा कट्टा मुंबईसह महाराष्ट्रात विभागीय स्तरावर सुरू आहे. १५ जुलै २०१७ रोजी घेण्यात आलेला शिक्षण कट्ट्याचा विषय ''शिक्षण हक्क कायदा आणि गुणवत्ता'' हा होता. शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी २००९ पासून सुरू झाली. सक्तीचा आणि मोफत शिक्षणाचा हा कायदा सुरू झाल्यानंतर शिक्षण क्षेत्रात याचे काय परिणाम झाले आहेत याची चर्चा व्हावी. खऱ्या अर्थाने गुणवत्ता वाढली आहे का; याचा शोध घ्यावा म्हणून शिक्षणकट्टयावर या विषयाची चर्चा आयोजित करण्यात आली होती.

शिक्षण हक्क कायद्यातील एका तरतुदीनुसार कोणत्याही मुलांना त्याच वर्गात ठेवता येणार नाही; अर्थातच तो मुलगा पास होणारा. ना–पास धोरणास अटकाव करणारा हा कायदा आहे. ठरावीक परीक्षा घेण्याऐवजी सातत्यपूर्ण मूल्यमापन व्हावे म्हणून सातत्यपूर्ण मूल्यमापन हे धोरण अवलंबण्यात आले. सरसकट सर्व मुले ही वरच्या वर्गात जाऊ लागली. मात्र त्या वर्गात त्यांना आवश्यक त्या क्षमता वयानुरूप मिळू लागल्या का? हा महत्त्वाचा भाग दुर्लक्षित होऊ लागला आहे. परिणामी शिक्षणाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. अशी चर्चा त्यावेळी कट्ट्यावर उपस्थित असलेल्या शिक्षकांनी, अभ्यासकांनी केली.

कट्ट्यावरील चर्चेच्या सुरुवातीस या कायद्याची पार्श्वभूमी खएड शिक्षण संस्थेच्या मुख्याध्यापिका सुचेता भवाळकर यांनी सांगितले. प्रास्ताविक शिक्षणकट्ट्याच्या संयोजक श्रीमती बसंती रॉय यांनी केले. तर समारोपात ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. वसंत काळपांडे यांनी आर टी ई च्या अंमलबजावणीतील उणीवा सांगीतल्या. या कट्ट्यासाठी कल्याण, डोंबिवली, ठाणे, मुंबई परिसरातील शिक्षण, पत्रकार, पालक उपस्थित होते. उपस्थितांचे आभार शिक्षण विकास मंचाचे समन्वयक माधव सूर्यवंशी यांनी मानले.

## महाराष्ट्र

महाराष्ट्राच्या ठायी असणाऱ्या अनुकूलता बहुपदरी, बहुआयामी आहेत. शिक्षित–प्रशिक्षित आणि कुशल असं मनुष्यबळ, वाहतूक आणि दळणवळण–संपर्काचं पूर्णपणे कार्यक्षम असं जाळं, विपुल नैसर्गिक संपदा आणि आधुनिक, उदार, विश्वात्मक मानसिकता ही त्या अनुकूलतांची वानगीदाखल काही उदाहरणं. प्रगतीपथावर वाटचाल करत असताना, छाप उमटवण्याजोगी कामगिरी करून देशातील प्रमुख औद्योगिक राज्य म्हणून महाराष्ट्राचा उदय होऊ शकला, तो या अनुकूलता बळावरच.

– मा. शरद पवार

# वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान

## कार्यवृत्त

जागतिक तापमानवाढीमुळे होणाऱ्या हवामानातील बदलांचा सामना करण्याची क्षमता निर्माण करणे ही या शतकातील अत्यंत आवश्यक गोष्ट बनली आहे. विशेषत: शेती–माती–हवा–पाऊस–पाणी–जैवविविधता–ऊर्जा यासंदर्भात बदलत्या हवामानाशी जुळवून घेणाऱ्या किंवा त्यात टिकून राहणाऱ्या उपाययोजना पुढे आणणे आणि त्यांची अंमलबजावणी करण्याचे आव्हान आपल्यासमोर आहे. वसुंधरा अभियानमार्फत हे आव्हान पेलणारी भावी पिढी घडविण्याचा प्रयत्न शालेय पातळीवर केला जात आहे. गेली पाच वर्षे मुंबई आणि पुण्यातील शाळांमधून आजवर हजारो मुलांबरोबर यासंदर्भात विविध अभिनव उपक्रम राबविण्यात आले आहेत. याच उपक्रमांतील पुढील पाऊल म्हणजे मुलांचे हवामान अध्ययन केंद्र होय. हवामान बदलाचा परिणाम महाराष्ट्राचे पर्जन्यमान, शेती, माती, ऊर्जा, कचरा निर्मुलन आणि जैवविविधता यासंदर्भात ठळकपणे लक्षात येत आहे. गाव असो की शहर! सर्वांनाच कमी–अधिक प्रमाणात हवामान बदलाचा फटका बसत आहे. हे लक्षात घेऊन मुंबई, पुणे, ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यातील विविध शाळांमधील मुलांबरोबर स्थानिक पातळीवर साध्या–सोप्या पद्धतीने पाऊस मोजणे, तापमान मोजणे, मातीची व पाण्याची गुणवत्ता ओळखणे, वनस्पती व प्राण्यांच्या वाढीचा अभ्यास करणे, ऊर्जेचे पर्यायी स्रोत स्वीकारणे असे उपक्रम घेण्यात आले आहेत. या उपक्रमांच्या अंमलबजावणीतून स्थानिक पातळीवरील मुलांचे हवामान अध्ययन केंद्र आकारास येईल. यामार्फत, प्रकल्पात सहभागी मुलांमध्ये हवामानविषयक शास्त्रीय अध्ययन, माहिती संकलन, माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरणाचे कौशल्यसुद्धा विकसित होईल. त्यासाठी पर्जन्यमापक, तापमापक, हवेचा दाबमापक, होकायंत्र, आर्द्रतामापक अशा विविध शास्त्रीय उपकरणांचा वापर करण्यात आला. सदर प्रशिक्षणाच्या आधारे विद्यार्थी हवामानातील विविध घडामोडींचा अभ्यास करीत आहेत. यामध्ये पाऊस मोजणे, हवेचा दाब मोजणे, हवेतील आर्द्रता मोजणे, तापमान मोजणे, मातीची गुणवत्ता ओळखणे, वनस्पती व प्राण्यांच्या वाढीचा अभ्यास करणे अशा उपक्रमांमध्ये विद्यार्थी सहभागी आहेत. त्यांनी केलेल्या अभ्यासाच्या आणि निरीक्षणाच्या सविस्तर नोंदी ठेवण्यात येत आहेत. वर्षाअखेर या सर्व नोंदींच्या आधारे त्या त्या भागातील या उपक्रमांच्या अंमलबजावणीत वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियानचे संयोजक श्री. दत्ता बाळसराफ यांचे नियमित मार्गदर्शन मिळत आहे. प्रत्यक्ष कार्यक्रम आयोजनात श्रीमती संगीता खरात, प्रियंका दामले, कुणाल अणेराव, सुमित पवार यांचा सक्रीय सहभाग आहे.

### अर्थकारण

**इथून पुढच्या काळात ग्राहक हाच बाजार पेढेवर सत्ता गाजवेल. अर्थव्यवस्थेत उत्पादकांचं प्रमाण मर्यादितच असेल. मर्यादित लोकांनी सत्ता गाजविण्याचे दिवस आता संपले आहेत, हे लक्षात घ्या. ग्राहकवर्ग मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. तो वाढतच जाणार आहे. त्यामुळे आपल्या उत्पादनांचा दर्जा, किंमत, टिकाऊपणा, उपयुक्तता मुल्य, याबाबत उत्पादकांना तडजोड करता येणार नाही. ग्राहकाला पंसत पडेल, तेच तो घेईल. तो ज्या किंमतीला चीजवस्तू घ्यायला तयार असेल त्या किंमतीच्या जवळपास येण्याचे प्रयत्न उत्पादकांना करावे लागतील.**

**– मा. शरद पवार**

# कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम

## कार्यवृत्त

समाजातील गोरगरीब, दीनदुबळे व मागास वर्गाच्या लोकांना त्यांच्या आर्थिक अपात्रतेमुळे किंवा मागासलेपणामुळे अन्याय सहन करण्याची पाळी येऊ नये यासाठी उपाय योजावेत अशा प्रकारचे मार्गदर्शन आपल्या संविधानामध्ये करण्यात आले आहे. या तरतुदीला अनुसरून भारतीय संसदेने १९८७ मध्ये विधी सेवा प्राधिकरण अधिनियम पारित केला आहे. त्या अधिनियमानुसार संपूर्ण देशामध्ये गरीब व तळागाळातील लोकांना मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला पुरविला जातो. सन १९८७ च्या विधी सेवा प्राधिकरण अधिनियमामध्ये अंतर्भूत असलेली मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजना राबविण्याचे काम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमार्फत केले जाते.

या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रतिष्ठानने ''यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम'' या विभागाची निर्मिती केली आहे. या विभागामध्ये अंदाजे ३७ वकील व सामाजिक कार्यकर्ते काम करीत असून ते आपली सेवा या योजनेसाठी देत आहेत. कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरमचे सदस्य- सचिव म्हणून श्री. मा. म. बा. पवार आहेत. त्यांच्या माध्यमातून श्रीमती शोभा लोंढे कामकाजाला मदतनीस म्हणून काम पाहतात.

- **फोरम मार्फत सर्वसाधारणपणे खालील प्रकारचे काम चालतेः**

१. समाजातील गोर-गरीब तळागाळातील लोकांना कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता मोफत तोंडी सल्ला देणे.

२. प्रसंगी गुंतागुंतीच्या प्रश्नांसंबंधी सखोल अभ्यास करून गरजू लोकांना कायदेविषयक सल्ला देणे.

३. गरजेनुसार पत्रव्यवहाराद्वारे गरजूंना कायदेविषयक सल्ला देणे.

४. पक्षकारांच्या तंट्यामध्ये सामोपचाराने आपसात तडजोड घडवून आणणे.

५. विधी विषयामध्ये संशोधन करून प्रचलित कायद्यांमध्ये सुधारणा सुचविणे किंवा नवीन कायद्याचे प्रारूप तयार करून वैधानिक प्रस्ताव राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला पाठविणे.

६. विधी विषयामध्ये संशोधन करून प्रचलित कायद्यानुसार बनविण्यात आलेल्या नियमांमध्ये सुधारणा सुचविणे किंवा नवीन नियमांचे प्रारूप तयार करून वैधानिक प्रस्ताव राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला पाठविणे.

७. सर्वसामान्य लोकांना वेळोवेळी कायद्यांची विशेष माहिती करून देण्यासाठी तज्ज्ञांची विशेष व्याख्याने आयोजित करणे.

८. सामान्य लोकांना कायद्यांची माहिती करून देण्यासाठी वरचेवर विधी साक्षरता (Legal Awareness) कार्यशाळेचे आयोजन करणे.

९. विधी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी मूट कोर्ट स्पर्धा, निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करणे तसेच अशा विद्यार्थ्यांसाठी वकिलांची व्यावसायिक नीतिमत्ता या विषयावर परिसंवादाचे आयोजन करणे.

१०. संबंधित न्यायालयाच्या सहकार्याने व त्यांच्या संयुक्त विद्यमाने त्या न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या प्रकरणामध्ये तडजोड घडवून आणण्यासाठी लोकन्यायालय किंवा लोक अदालतचे आयोजन करणे.

११. न्यायालयामध्ये मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर होण्यासाठी प्रयत्न करणे.

- **फोरमच्या बैठका :**

कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजनेच्या अंमलबजावणीबाबत विचार करून धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी, झालेल्या कार्यक्रमांचा आढावा घेण्यासाठी, पुढील कार्यक्रमाची आखणी करण्यासाठी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी दरमहा दुसऱ्या शुक्रवारी फोरमच्या मासिक बैठका घेतल्या जातात.

या बैठकांना फोरमचे जास्तीत जास्त सदस्य उपस्थित राहतात. त्यानुसार गेल्या १ जून २०१७ ते ३० सप्टेंबर २०१७ या चार महिन्यामध्ये फोरमच्या ४ मासिक बैठका झाल्या. या चार बैठकामध्ये एकूण अंदाजे ६९ विषयांसंबंधी चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. या बैठकांना एकूण ४९ सदस्य उपस्थितीत होते. त्याप्रमाणे प्रत्येक बैठकीला सरासरी १५ सदस्य उपस्थित होते. या बैठकीमध्ये ॲड. डॉ. निलेश पावस्कर, ॲड. भूपेश सामंत व ॲड. मधुकर उगले या मा. सदस्यांनी अध्यक्ष म्हणून काम पाहिले.

- **विभागांची एकत्रित बैठक :**

८ ऑक्टोबर २०१७ मध्ये ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा भरविण्यासंबंधी विचार करण्यासाठी प्रतिष्ठानच्या सर्व विभागाच्या प्रतिनिधींची बैठक मा. सरचिटणीस श्री. शरद काळे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक १९ जुलै २०१७ रोजी बोर्ड रूममध्ये संपन्न झाली. बैठकीला १४ प्रतिनिधी उपस्थित होते. अंदाजे ३९ बाबीसंबंधी विचार होऊन निर्णय घेण्यात आले.

- **ज्येष्ठ नागरिक संघाच्या प्रतिनिधींची बैठक :**

८ ऑक्टोबर २०१७ मध्ये आयोजिण्यात येणाऱ्या ज्येष्ठ नागरिक आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यासंबंधी विचार करण्यासाठी कुलाबा ते माहिम व चुनाभट्टी या क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या ज्येष्ठ नागरिक संघाच्या प्रतिनिधींची बैठक व फेस्कॉमच्या प्रतिनिधींची एक बैठक बुधवार दिनांक २६ जुलै २०१७ रोजी दुपारी ३-३० वाजता संवाद ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र वुलन मिल महापालिका शाळा, यशवंत नाट्य गृहाच्या शेजारी (पुढे) माटुंगा, मुंबई ४०० ०१६ येथे संपन्न झाली. या बैठकीला प्रतिष्ठानच्या वतीने सर्वश्री श्री. संजय बनसोडे व सुषमा साळुंखे उपस्थित होते. तसेच बैठकीला ज्येष्ठ नागरिक संस्थेचे अंदाजे ५० प्रतिनिधी उपस्थित होते. अंदाजे ३९ बाबींसंबंधी विचार होऊन निर्णय घेण्यात आले.

- **कायदेविषयक सल्ला केंद्र :**

गोरगरीब व गरजू लोकांना कायदेविषयक तोंडी सल्ला देण्यासाठी दर शुक्रवारी सायंकाळी ५.३० च्या नंतर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या दुसऱ्या मजल्यावरील ग्रंथालयामध्ये कायदेविषयक मोफत सल्ला केंद्र चालविले जाते. या बैठकांमध्ये एकूण २३ लोकांना (महिला व पुरुष) तोंडी सल्ला देण्यात आला. सल्ल्याचे विषय अंदाजे विवाह, घटस्फोट, हुंडा, पोटगी, वारसा हक्क, भागिदारी, कामगार कायदा, माहितीचा अधिकार, सेवा नियम, सहकारी कायदा, पंजीकरण, मुद्रांक, फौजदारी, कौटुंबिक अत्याचार, ग्राहक संरक्षण, भाडे नियंत्रण, मोफा कायदा, गृहनिर्माण इत्यादी विषयासंबंधी होते. आपली प्रकरणे न्यायालयामध्ये चालविण्यासाठी वकिलाची मोफत सेवा मागणाऱ्या लोकांना शासनाचे संबंधित विधी सेवा प्राधिकरणाकडे पाठविण्यात आले. या केंद्राचे काम सर्वश्री. श्री. भूपेश सामंत, श्रीमती प्रितिंदर सिंग व ॲड. मधुकर उगले इत्यादी वकिलांनी पाहिले.

- **मोफत समुपदेशन व तडजोड केंद्रः**

दर मंगळवारी सायंकाळी ५.०० ते सायं. ७.०० या वेळांत समुपदेशन व समेट केंद्राचे आयोजन केले जाते. दोन वादग्रस्त पक्षकांराना एकत्र आणून त्यांच्यामध्ये तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न या केंद्रामध्ये केला जातो. या कामाला गती देण्यासाठी विशेष प्रयत्न चालू आहेत.

- **आपल्या कायद्याची माहिती करून घ्या**

या व्याख्यानमालेअंतर्गत दरमहा किंवा तीन महिन्यातून एकदा कायदे पंडितांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते. सध्या इमारतीचा पुनर्विकास व माहितीचा अधिकार आणि सायबर कायदा या कायद्यावर व्याख्याने आयोजित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

- **'वकिलांची व्यावसायिक नीतीमत्ता' या विषयावर चर्चासत्र**

विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबविले जातात. त्यापैकी वकिलांच्या व्यावसायिक नीतीमत्ता या विषयाबाबत नवीन होतकरू वकिलांना जाणीव करून देण्यासाठी चर्चासत्राचे आयोजन केले जाते. विधी शाखेतील विद्यार्थ्यांना याचा चांगला उपयोग होतो. सध्या अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

- **विधी साक्षरता कार्यशाळा**

लोकांना सामाजिक किंवा त्यांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असलेल्या कायद्याची माहिती करून देण्यासाठी विविध प्रकारच्या विधी साक्षरता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. त्यासाठी समाजाच्या वेगवेगळ्या घटकांसाठी वेगवेगळे प्रकल्प तयार करण्यात आले आहेत. उदाहरणार्थ- पौगंडावस्थेतील मुले व मुली, महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, सहकारी गृह निर्माण संस्थेचे सदस्य, सार्वजनिक न्यासाचे विश्वस्त, सार्वजनिक संस्थेचे सदस्य आणि सर्वसामान्य जनता इत्यादी घटकांसाठी विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. गेल्या सहा महिन्यांमध्ये अशा प्रकारच्या अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम व मैत्री संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २० ऑगस्ट २०१७ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत न्यू इंग्लिश स्कूल, वसई सहकारी बँकेसमोर व चिमाजी अप्पा मैदानाजवळ, वसई (पश्चिम), वसई येथे एक दिवसीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत सामाजिक कार्यकर्ते महिला, पुरुष, युवक व युवती इत्यादी एकूण ९४ जण उपस्थित होते. त्यांच्या दैनदिन जीवनाशी निगडित कायद्याची माहिती मराठी व हिंदी भाषणाचे माध्यमातून देण्यात आली. न्यू इंग्लिश स्कूलचे मा. माणिक दोतोंडे यांनी उद्घाटन केले. मैत्री संस्थेचे अध्यक्ष मा. सुरज भोईर हे उपस्थित होते.

- **विधी साक्षरता कार्यशाळे मध्ये शिकविलेले कायदे :**

विधी कार्यशाळेमध्ये अंदाजे ५० ते ६० कायद्यांसंबंधी माहिती करून देण्यात आली. त्यामध्ये प्रामुख्याने पुढील कायद्यांचा समावेश होतो :
१) भारतीय संविधान. २) विधी सेवा प्राधिकरण अधिनियम १९८७. ३) हुंडाबंदी अधिनियम १९६१. ४) भारतीय दंड संहिता १८६०. ५) ग्राहक संरक्षण कायदा. १९८६ ६) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३. ७) हिंदू वारसा हक्क कायदा १९५६ व इच्छापत्र कायदा.८) गुंतवणूकीसंबंधीचे नियम. ९) कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा २००५. १०) माहितीचा अधिकार कायदा २००५. ११ हिंदू विवाह कायदा १९५५. १२) मुस्लीम कायदा. १३) पोटगीसंबंधीचे कायदे. १४) महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकाबाबात (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३. १५) हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम १९५६. १६) हिंदू दत्तक व पोटगी अधिनियम १९५६. १७) संपत्ती हस्तांतरण अधिनियम १८८२१८) विशेष विवाह कायदा १९५४. १९) बाल विवाह बंदी अधिनियम २००७. २०) महाराष्ट्र विवाह मंडळ नियमन व विवाह नोंदणी अधिनियम १९९८. २१) न्यायालयाची बहुस्तरीय व्यवस्था (तालुका न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंतची माहिती). २२) स्त्रियांचे असभ्य प्रतिरुपण (प्रतिबंध) अधिनियम १९८६. २३) विकलांग व्यक्तीसाठी (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ The persons with Disabilities (Equal opportunities, Protection of Rights and Full Participation) Act, १९९५. २४) स्वमग्न असलेल्या, मस्तिष्कघात झालेल्या, मतिमंद व बहुविध विकलांगता असलेल्या व्यक्तींच्या कल्याणाकरिता राष्ट्रीय न्यास अधिनियम १९९९(The National Trust for Welfare of Persons with Autism Cerebral Palsy, Mental Retardation and Multiple Disabilities Act, १९९९). २५) अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम १९५६ (The Immoral Traffic Prevention Act, १९५६ ).
२६) राष्ट्रप्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम १९७१. २७) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४. २८) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम १९८७. २९) महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंध अधिनियम १९९९. ३०) महाराष्ट्र विद्यापीठाच्या, मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९८२.
३१) मुंबई विद्यापीठाचे अध्यादेश क्रमांक २२० (अनुचित प्रथा प्रतिबंध) ३२) मुस्लीम स्त्रिया (घटस्फोटानंतर अधिकार संरक्षण) अधिनियम १९८६. ३३) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निमूर्लन आणि पुर्नविकास) अधिनियम १९७१. ३४) भारतीय वारसा हक्क कायदा १९२५.
३५) महाराष्ट्र सहाकारी संस्था अधिनियम १९६०. ३६) मुंबई मुद्रांक कायदा १९५८. ३७) गृहनिर्माण संस्थांचे विनियम. ३८) अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९. ३९) मुस्लिम व्यक्ती विषयक विधी (शरियत) प्रयुक्ती १९३७. ४०) नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५. ४१) भारतीय मुद्रांक कायदा १८९९. ४२) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८. ४३) प्रसूती विषयक लाभ अधिनियम १९६१. ४४) सोसायटी नोंदणी अधिनियम१८६०. ४५) अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५. ४६) मोटार वाहन अधिनियम १९८८. ४७) जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९. ४८) मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३. ४९) महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम १९९९. ५०) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६.५१) माता–पिता व ज्येष्ठ नागरिक यांची पोटगी व कल्याण अधिनियम २००७. ५२) मुंबई पोलीस अधिनियम १९५०. ५३) जादूटोणा विरोधी कायदा २०१३. ५४) हिंदू मायनॉरिटी ॲन्ड गार्डीयनशिप ॲक्ट १९५६.
५५) गार्डीयनशिप ॲन्ड वॉर्डस ॲक्ट. ५६) कामाच्या ठिकाणी महिलांना लैगिक छळ (प्रतिबंध, बंदी, तक्रार व निवारण) अधिनियम २०१३.
५७) The Sexual Harassment of Women at Work Place (Prevention, Prohibition and Redressal ) Act १४ of २०१३

**खालील वक्त्यांनी विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन केले.**

| | |
|---|---|
| १ | श्री. म. बा. पवार |
| २ | श्री. प्रमोद ढोकळे |
| ३ | ॲड. डॉ. निलेश पावस्कर |
| ४ | ॲड .हेमंत केंजारळकर |
| ५ | ॲड अजय केतकर |
| ६ | ॲड भूपेश सामंत |
| ७ | ॲड डॉ. जे. बी. पाटील |
| ८ | श्रीमती शिवानी शेलार |
| ९ | प्रा. नारायण राजाध्यक्ष |
| १० | ॲड. प्रकाश देशमुख |
| ११ | श्री. दिलीप तळेकर |
| १२ | श्रीमती सुशिला मुंडे |

# सृजन

## कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या रंगस्वर 'सृजन' विभागामार्फत शालेय विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास आणि विविध कलांची तोंडओळख करुन त्यांचे विद्यार्थी जीवन समृद्ध व्हावे या करिता 'सृजन' हा उपक्रम चालविण्यात येतो. सर्जनशीलतेचा आविष्कार विद्यार्थ्यांसोबत घडवून त्यांच्यामधील सुप्तकलागुणांना वाव देण्याचा हा प्रयत्न आहे.

सृजनची संकल्पना आणि संयोजन मा. सौ. सुप्रियाताई सुळे यांची असून सुप्रसिद्ध चित्रकार श्री. डग्लस जॉन आणि सुलेखनकार श्री. शुभानंद जोग सन्माननीय सल्लागार म्हणून काम पाहतात. श्री. विद्याधर खंडे या कार्यशाळेचे समन्वयक म्हणून काम करतात.

**सृजन २०१७**

| अनु. क्र. | दिनांक | विषय | संसाधन व्यक्ती |
|---|---|---|---|
| १. | जुलै २०१७ | हवामान मापन | सौ. संगिता खरात, सृष्टीज्ञान पर्यावरण संस्था |
| २. | ६ ऑगस्ट २०१७ | मातीकाम | श्री. देवदत्त ममले, मूर्तीकार |
| ३. | ३ सप्टेंबर २०१७ | खेळाद्वारे मुल्यशिक्षण | श्री. सुनिल कदम |
| ४. | १ ऑक्टोबर २०१७ | वाचन | प्राचार्य श्री. सतीश चिंदरकर, संस्थापक अनुयोग विद्यालय, मुंबई |
| ५. | ५ नोव्हेंबर २०१७ | विज्ञान खेळणी | श्री. अभय यावलकर संचालक, विज्ञान शिक्षण आणि ऊर्जा संशोधन संस्था |

# महाराष्ट्र महिला व्यासपीठ

## कार्यवृत्त

महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या वतीने महिलांची शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक विविध दृष्टीने सक्षमता वाढावी यासाठी विविध उपक्रम, विविध कार्यशाळा आणि इतर कार्यक्रम यांच्या माध्यमातून कृतीशील प्रयत्न केले जातात. संयोजिका रेखा नार्वेकर, कार्यकारी संयोजिका ममता कानडे महिला व्यासपीठाचे काम पाहतात. त्यांना संजना पवार यांचे सहकार्य असते.

महिलांना उपयुक्त प्रशिक्षण देणे हा महिला व्यासपीठाचा सतत प्रयत्न असतो. जेणेकरून प्राविण्य मिळवून त्या आपले स्वतःचे अर्थाजन करू शकतात. महिलांच्या मागणीनुसार दिनांक २० जुलै २०१७ रोजी विविध प्रकारचे केक व त्यावरील विविध आयसिंग याचे प्रशिक्षण आयोजित केले गेले सतरा महिलांनी या कार्यशाळेचा लाभ घेतला. अत्यंत किमान फी मध्ये हे प्रशिक्षण दिले गेले, सहा प्रकारचे केक व त्यावरील आयसिंग शिकविण्यात आले. हे प्रशिक्षिण म्हणजे नुसते प्रात्याक्षिक नव्हते, तर महिलांनी, स्वतः आपापल्या केकवर आयसिंग केले व प्रशिक्षणाचा आनंद घेतला. त्यांना त्या केकची चवही घेता आली व घरी नेता आले. रेणुका मोरे यांचे या प्रशिक्षणाला मार्गदर्शन लाभले.

सध्याच्या धकाधकीच्या जीवनात लोकांच्या खाण्याच्या म्हणजेच आहाराच्या सवयी बदलल्या आहेत. जंक फूड व फास्टफूडमुळे स्वतः च्या आरोग्याकडे व आहाराकडे दुर्लक्ष झाले आहे, त्याचे दुष्परिणाम फार त्रासदायक होतात. तेव्हा आपल्या आहाराविषयी सतर्क राहाणे फार गरजेचे आहे. चौकस आहारात सॅलडचे फार महत्त्व आहे, हे लक्षात घेऊन दिनांक ४ ऑगस्ट २०१७ रोजी दुपारी ३ ते ५ या वेळेत सुप्रसिद्ध शेफ तुषार देशमुख यांचा ''आई आणि स्वयंपाकघर'' हा मनोगत, गप्पा व प्रश्नोत्तरे व पदार्थांची पाककृती असा चौरस कार्यक्रम आयोजित केला गेला. या कार्यक्रमांतर्गत वेगवेगळ्या ''पौष्टिक व सॅलड्स'' ची प्रात्याक्षिके दाखवण्यात आली व पाककृतीही देण्यात आली ६५ महिलांनी या प्रात्याक्षिकाचा लाभ घेतला. शेफ तुषार देशमुख यांनी गप्पागोष्टीमधून आपली स्वयंपाकाची आवड व त्यानुसार त्यांनी आपल्या आवडीचे रूपांतर व्यवसायात कसे केले याविषयी सांगितले. हा कार्यक्रम चांगलाच रंगत गेला.

अशा अनेक विविध कार्यक्रम व प्रशिक्षणाबरोबर एक उपयुक्त असे प्रशिक्षण घेतले जाते, ते म्हणजे 'सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापक प्रशिक्षण'.

मुंबई मध्ये २० ते ४० हजार सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. या सर्व संस्थाचे काम चांगले होण्यासाठी शासनाचे कायदे किंवा उपविधी लोकांना माहित असणे आवश्यक आहे, हे लक्षात घेऊन महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे जून २०१० सालापासून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई मध्ये ''सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापक प्रशिक्षण'' दिले जाते. या कार्यशाळेला मा. प्रभाकर चुरी, मा. देवयानी गोरे, अॅड प्रमोद कुमार, मा. विजय सामंत, व सहकारी क्षेत्रातील इतर मान्यवरांचे मार्गदर्शन मिळते. या कार्यशाळेचे फायदे म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्थेत पूर्णवेळ/अर्धवेळ नोकरी मिळू शकते. तसेच हे प्रशिक्षणार्थी सल्लागार म्हणूनही चांगले काम करू शकतात, व आपल्या स्वतःच्या राहत्या सोसायटीत मॅनेजिंग कमिटीत चांगले काम करू शकतात. तसेच सामाजिक ज्ञान/भान याची जाणीव होते. आतापर्यंत २० ते अगदी ७० वर्षाच्या व ५०० च्यावर प्रशिक्षणार्थिनी हे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे. त्यांना परीक्षा घेऊन प्रमाणपत्र देण्यात येते.

वर नमूद केलेली सर्व प्रशिक्षणे अत्यंत माफक फीमध्ये 'ना नफा ना तोटा' या तत्वावर सुरू आहेत. त्यासाठी बाहेर खूप पैसे मोजावे लागतात. या सर्व प्रशिक्षणात आम्ही प्रशिक्षणार्थिंची संख्या मर्यादित ठेवली आहे. जेणेकरून मार्गदर्शकास प्रत्येकाकडे लक्ष देता येईल. पुढील तक्ता पाहता ही गोष्ट लक्षात येईल की उगाच माफक फीच्या नावाखाली भरपूर प्रशिक्षणार्थी घेऊन आम्ही आमची कार्यशाळा यशस्वी करीत नाही, तर सहभागी झालेल्या प्रत्येक व्यक्तीस शिकविलेली कला आली पाहिजे सराव करून ती व्यक्ती त्या त्या कला आत्मसात करू शकते.

आमची उद्दिष्ट सरळ, सोपी व समाजाचे भले व्हावे या दृष्टीकोनातूनच आहेत. आम्ही सतत लोकांना काय उपयुक्त देऊ शकतो हाच विचार करत असतो. खूप मोठ्या प्रमाणात नाही, पण ज्या समाजात आपण वावरतो व ज्यांच्याकडून आम्हालाही खूप काही शिकायला मिळतं, त्या समाजाचे देणे परत करणे, हा आमचा खारीचा नाही पण मुंगीचा वाटा नक्की आहे. आजही आमच्या प्रत्येक प्रशिक्षणार्थीकडून आम्हाला आमच्या कामाची मिळालेली दाद व भविष्यासाठीच्या शुभेच्छा हेच आमचे उद्दिष्ट सफल करते. हाच विचार घेऊन आम्ही भविष्यात ही स्त्रियासाठी व समाजासाठी खूप काही करत रहाणार आहोत.

# यशवंतराव चव्हाण ग्रंथालय, मुंबई

## कार्यवृत्त

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या वेळी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी राज्यकारभारासंबंधी मूलभूत धोरण सूचित करणारी काही सूत्रं अमलात आणली. त्यात मराठी भाषा व साहित्य यांच्या अभिवृद्धीला महत्त्व देण्यात आलं. त्यानुसार महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयांच्या वाढीसाठीही प्रोत्साहन देण्यात आलं. त्यातूनच पुढे सार्वजनिक चळवळीच्या रेट्यामुळे सार्वजनिक ग्रंथालयांबाबत सुसूत्रता आणण्यासाठी १९६७ ला कायदा संमत करण्यात आला. या कायद्याप्रमाणे पाचशे ते पाच हजार लोकसंख्या असणाऱ्या कोणत्याही गावात एका सार्वजनिक ग्रंथालयास मान्यता देण्यात येते. दहा हजारांच्या वर लोकसंख्या असणाऱ्या गावामध्ये दोन ग्रंथालयं, पंचवीस हजारांच्या वर तीन ग्रंथालयं, पन्नास हजार ते एक लाखापर्यंतच्या लोकसंख्येच्या गावात चार ग्रंथालयं, अशी लोकसंख्येच्या निकषांवर ग्रंथालयांना मान्यता आली होती.

ग्रंथालय ही एक सामाजिक संस्था आहे. सर्व प्रकारच्या वाचकांच्या, संशोधकांच्या विविध गरजा लक्षात घेऊन त्यांना उपयुक्त असणारं साहित्य व साधनं मिळवून ती उपलब्ध करून देणं व या सर्वांसाठी एक सक्षम दुवा बनण्यासाठी ग्रंथालये महत्त्वाची भूमिका बजावते. ग्रंथालयाचे राष्ट्र विकासातील महत्व सिद्ध करून लोकांना ग्रंथालयाकडे आदर्श, सृजनात्मक, सुसंस्कृत समाजाचा आधारस्तंभ म्हणून पाहायला लावणे हा उद्देश आहे. ग्रंथालयातील अत्यावशक, नवीन आणि उपयुक्त विषयावर संशोधन करून त्याचे राष्ट्र विकासाच्या समृद्ध वाटचालीतील महत्व सांगून ग्रंथालयाचा राष्ट्र विकासातील सहभाग वाढवणे हे ग्रंथालयांचे उद्दिष्ट आहे.

यशवंतराव चव्हाण ग्रंथालय हे संदर्भ ग्रंथालय आहे. ग्रंथलयात येणारे सभासद हे संशोधक, MPSC, UPSC अशा स्पर्धा परीक्षा देण्याच्या तयारीकरिता येतात. तसेच ग्रंथपेमी मा. यशवंतराव चव्हाण यांची पुस्तके विक्रीकरिता ठेवण्यात आली आहेत. ग्रंथालयाने काही महत्त्वाच्या विषयाची वृत्तपत्रीय कात्रणे वाचकांना हाताळता यावी याकरिता व्यवस्थित बांधणी करुन ग्रंथालयामध्ये संदर्भाकरिता ठेवण्यात आली आहेत. विद्यार्थी, संशोधक यांच्याकरिता अद्ययावत माहितीकरिता नियतकालिकांची बांधणी करुन संदर्भाकरिता ठेवली आहेत. ग्रंथालयात विविध नियतकालिके, समाजशास्त्र, शेती, इतिहास, कायदा, संस्कृती इ. विषयांवरील पुस्तके, आत्मचरित्रे, धर्मकोश, विश्वकोष, गॅझेटियर, ॲटलास, इअरबुक, डिक्शनरी, निरनिराळ्या कायद्याचे ग्रंथ उपलब्ध आहेत. वेळोवेळी ग्रंथालयाला अनुसरुन नवीन पुस्तके खरेदी करण्यात येतात.

सार्वजनिक ग्रंथालय, विशेष ग्रंथालय (वैद्यकीय ग्रंथालय, अभियांत्रिकी ग्रंथालय इ.), शैक्षणिक ग्रंथालय (शालेय ग्रंथालय, महाविद्यालयीन ग्रंथालय, विद्यापीठ ग्रंथालय), ग्रंथालय व संशोधन केंद्र, ग्रंथालय व प्रलेखन केंद्र, संदर्भ ग्रंथालय, ग्रंथालय संसाधन केंद्र तसेच ग्रंथालयीन नेटवर्क (CLIBNET (Calcutta Library Network), DELNET (Developing Library Network), MLIBNET (Madras Library Network), MYLIBNET (Mysore Library Network, ERNET (Education and Research Network), INFLIBNET (Information and Library Network) अश्या विविध प्रकारचे ग्रंथालय आपल्या ग्रंथालयीन सेवा देऊन राष्ट्र विकासाला सहकार्य करतात.

कोणतीही व्यक्ती, समाज वा राष्ट्राच्या जडणघडणीत ग्रंथ आणि ग्रंथालयाचं महत्त्व अनन्यसाधारण असं आहे. बौद्धिक विकासाचं शक्तीकेंद्र आणि सामाजिक विकासाचं उर्जाकेंद्र म्हणून ग्रंथालयाची आवश्यकता असते. राज्यातील ग्रामीण आणि शहरी विभागातील जनतेला सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि सर्व क्षेत्रातील विविध बाबींची आणि विविध विषयांची परिपूर्ण माहिती मिळावी यासाठी ग्रंथालय कार्य करते .

तसेच संशोधक किंवा विद्यार्थ्यांच्या भावी जीवनात मानाचे आणि योग्य स्थान मिळावे म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास व्हावा. विद्यार्थ्यांमध्ये असलेली वाङ:मयीन आणि कलात्मक गुणाची वाढ करण्याच्या उद्देशाने ग्रंथालयाचे महत्त्व आहे.

आपण एका चौकस आणि नावीन्यपूर्ण–ज्ञान देणाऱ्या समाजात जगत

आहोत. आपल्याला जागतिक आणि राष्ट्रीय स्तरावर संशोधन आणि विश्लेषणात्मक विचार,कौशल्य आणि वृत्ती विकसित करण्यात ग्रंथालय महत्वाची भूमिका बजावून राष्ट्राच्या शैक्षणिक विकासाचा मानदंड ठरतात.

संशोधनाचे चक्र ग्रंथलयातून सुरू होते. ज्ञानाच्या सर्व शाखांमध्ये संशोधन आणि विकास होत असतो. त्यामुळे विज्ञान ,अर्थशास्त्र व राज्यशास्त्र अशा क्षेत्रातील संशोधनासाठी स्वतंत्र संस्था आणि ग्रंथालय यांची आवश्यकता निर्माण झाल्याने संशोधन ग्रंथालय स्थापन होऊ लागली. उच्च दर्जाचे संशोधन व्हावयास पाहिजे असेल तर सुसज्ज आणि समृद्ध ग्रंथालय हवे. ग्रंथालय वाचन साहित्यासोबतच संशोधनासाठी लागणाऱ्या अनेक सोयी– सुविधा पुरवते. संशोधन ही सर्जनशीलता असते आणि ही सर्जनशीलता ज्ञानातून निर्माण होते. ज्ञाननिर्मिती, संग्रह आणि प्रसार प्रचार करणारे भांडार म्हणून यशवंतराव चव्हाण ग्रंथालय महत्त्वाचे आहे.

**ग्रंथालयाद्वारे देण्यात येणाऱ्या सेवा :–**

अ) वर्गीकरण (Classification) : या मध्ये पुस्तकांचे विषयानुसार वर्गीकरण केले आहे व त्यांना DDC २३ rd नुसार Class No. (वर्गांक) देऊन विषयानुसार मांडणी केली आहे, यामुळे ग्रंथालयातील पुस्तके कुठे ठेवली आहे ते शोधण्यास विद्यार्थ्यांना/संशोधकांना मदत होते. तसेच त्यांचा वेळ वाचतो.

आ) संगणकीय तालिकीकरण (Cataloguing): ग्रंथालय संगणकीकरण आज काळाची गरज बनलेली आहे. प्रत्येक क्षेत्रात संगणकाचा वापर झपाट्याने वाढत आहे. ग्रंथालयातील सर्व प्रक्रिया म्हणजेच देवघेव, ग्रंथ नोंदी, साठा पडताळणी महत्वाची कामे आदी हस्तलिखित स्वरुपात केली जात, आता सदर कामाची जागा संगणकाने घेतली असल्याने ग्रंथालयाचे संगणकीकरण करण्यात आले आहे. ग्रंथालय संगणकीकरण म्हणजेच ग्रंथालयातील प्रक्रिया (देवघेव,ग्रंथ नोंद, बारकोडिंग) संगणकाद्वारे किवा ग्रंथालय आज्ञावलीद्वारे करतात. ग्रंथालय संगणकीकरणासाठी सर्व प्रथम ग्रंथालय आज्ञावली असणे अतिशय महत्वाचे आहे, याकरिता ग्रंथालयात SLIM सॉफ्टवेअर घेतले आहे. यामध्ये पुस्तकांच्या नोंदी (Entry) पुस्काचे नाव, लेखक/लेखिका, प्रकाशन व प्रकाशनाचे ठिकाण, प्रकाशनाचे वर्ष, वर्गांक ही सर्व माहिती देऊन केली जाते. त्याचप्रमाणे SLIM सॉफ्टवेअरमध्ये एक परिपूर्ण ग्रंथालयास उपयुक्त असे महत्त्वपूर्ण मोड्युल्स आहेत. ते खालील प्रमाणे :

- ग्रंथ देवघेव (Book Issue-Return)
- सभासद नोंदी (Member Registration)
- नियतकालिके नोंदी (Serials)
- बारकोडींग (Barcoding)
- ओळखपत्र (Identity Cards)
- साठा पडताळणी (Stock Verification)
- वार्षिक अंदाजपत्रक (Budget)
- न्यूज क्लिपिंग (News Clippings)
- ओपॅक (OPC)

असे महत्वाचे संपूर्ण व मुद्दे या SLIM सॉफ्टवेअर मध्ये आपणास उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

**क) वृत्तपत्र कात्रण सेवा :** संशोधक किवा विद्यार्थांना योग्य वेळी योग्य माहिती कमी वेळात देता यावी याकरिता ग्रंथालयात विशेष प्रकारे माहिती संघटीत करून ठेवली आहे. ग्रंथालयात वर्तमानपत्रातील महत्त्वाच्या घडामोडींची कात्रणे करून त्यांच्या फाईल तयार करण्यात आल्या आहेत. तसेच झेरॉक्स काढून त्यांना व्यवस्थितरित्या बाईंडिंग करण्यात आल्या आहेत त्यांची यादी खालील दिलेल्या प्रमाणे :

१. १८५७ चा इतिहास
२. हिरक महोत्सव महाराष्ट्र, २००७
३. हिंदुस्तान टाइम्स इन मुंबई,२००७ : मुंबई मेट्रो, मुंबई एअरपोर्ट, मुंबई सिटी ट्रान्सफॉरमेशन प्रोजेक्ट
४. मुंबईत रेल्वेवरील अतिरेकी हल्ला, ११ जुलै २००६
५. मुंबई राज्यात पावसाचा धुमाकूळ ,२६ जुलै २००५
६. २६ नोव्हेंबर २००८ चा मुंबईवरील दहशतवादी हल्ला
७. अयोध्येत राममंदिर उभारणी बाबतीत निकाल, २०१०
८. साहित्य संमेलन २००३–२०१०
९. पुरस्कार (२००२–२००६) : साहित्य अकादमी पुरस्कार, भारत रत्न, नोबेल, ज्ञानपीठ. महाराष्ट्र भूषण
१०. पुरस्कार ( २००६–२००९) : नोबेल, महात्मा फुले समता पुरस्कार, पद्मश्री, उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार
११. पुरस्कार (२००९–२०१२) : आल्फ्रेड नोबेल, झी गौरव, जीवन गौरव, भारतरत्न, कला गौरव, कालातिलक, महाराष्ट्र भूषण, आदर्शशिक्षक, गोदागौरव

क) E- resources – ग्रंथालयास 'डिजिटल लायब्ररी' ची जोड

असल्यामुळे विद्यार्थ्यांना/संशोधकांना घरबसल्या माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. वाचकाला आवश्यक असणारी माहिती तात्काळ उपलब्ध करून देण्यासाठी काही महत्त्वाच्या E- resources च्या माध्यमातून सेवा देण्यात येते.

**1. ERIC (Education Resources Information Centre)**

https://eric.ed.gov/

The Education Resources Information Center (ERIC) is an online digital library of education research and information. ERIC is sponsored by the Institute of Education Sciences of the United States Department of Education. The mission of ERIC is to provide a comprehensive, easy-to-use, searchable, Internet-based bibliographic and full-text database of education research and information for educators, researchers, and the general public. Education research and information are essential to improving teaching, learning, and educational decision-making.

**2. DOJ (Directory of Open access Journals)**

https://doaj.org/

DOJ is a community-curated online directory that indexes and provides access to high quality, open access, peer-reviewed journals.

**3. Gutenberg**

https://www.gutenberg.org/

Project Gutenberg (PG) is a volunteer effort to digitize and archive cultural works, to encourage the creation and distribution of eBooks. It was founded in 1971 by Michael S. Hart and is the oldest digital library. Most of the items in its collection are the full texts of public domain books of 3 October 2015, Project Gutenberg reached 50,000 items in its collection.

**4. Internet Archive**

https://archive.org

The Internet archive is a San Francisco based non-profit digital library with the stated mission of universal access to all knowledge. It provides free public access to collections of digitized materials, including websites, software applications/games, music, movies/videos, moving images, and nearly three million public-domain books of October 2016, its collection topped 15 petabytes.

**5. Infolibrarian**

http://www.infolibrarian.com/digital.html

Infolibrarian provide useful information to Library and Information Science LIS professionals in 2000. The site also made it to the list of useful resources of United Nations, UNESCO, and Subject Directories etc.

**ग्रंथालयाचे नियम:**

यशवंतराव चव्हाण ग्रंथालयाचे सभासद होण्याकरिता नमुना अर्ज तयार केला आहे. या अर्जामध्ये स्वत:च्या हस्ताक्षरात परिपूर्ण माहिती भरुन त्यासोबत पुढील प्रमाणे वर्गणी भरणे :

१. सर्वसाधारण सभासद : सर्वसाधारण सभादाकरिता रु. ५००/– वार्षिक वर्गणी तसेच रु. ५००/– अनामत रक्कम (१९९६).

२. विद्यार्थी सभासद : महाविद्यालयीन/उच्चशिक्षण/संशोधन विद्यार्थ्याकरिता वार्षिक रु.५०/– नाममात्र वर्गणी व अनामत रक्कम रु. १००/–

३. यशवंतराव चव्हाण ग्रंथालयामध्ये संदर्भाकरिता काही विद्यार्थी एक दिवस ते एक आठवडा या कालावधीकरिता ग्रंथालयाचा लाभ घेतात. या विद्यार्थ्याकडून रु. ५०/– फक्त एका आठवडयाकरिता फी आकारण्यात येते. त्यांच्याकडून फक्त एका कार्डवर त्यांची वैयक्तिक माहिती भरुन घेता येते.

४. माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी शिक्षण घेणारे विद्यार्थी संगणकविषयक पुस्तकांचा लाभ घेतात. त्याकरिता वेगळी फी आकारत नाही.

**इ–१) संयुक्त संस्था सभासदत्व** (Corporate Membership): कार्पोरेट या शब्दाच्या व्याख्येत बसणारी संस्था या सभासदत्वासाठी पात्र असेल, एकावेळची वर्गणी रु. ५०,०००/– पाच वर्षासाठी.

**अनामत रक्कम :** सर्वसाधारणपणे अनामत रक्कम घेण्यात येणार नाही. परंतु एखाद्या दुर्मिळ व किंमती पुस्तकासाठी प्रतिष्ठान निश्चित करेल तेवढी रक्कम घेण्यात येईल.

**एका वेळी देण्यात येणारी पुस्तके :** एका वेळी जास्तीत जास्त १० पुस्तके देता येतील.

**इ-२) संस्था सभासदत्व** : यासाठी शिक्षण व संशोधन संस्था व सांस्कृतिक संस्था पात्र राहतील. परंतु शिक्षण व संशोधन संस्था ही युजीसी, आय. सी.एस.एस.आर किंवा आय.सी.एचआर. यांच्याकडून मान्यता प्राप्त झालेली असावी. सांस्कृतिक संस्था ही महाराष्ट्र शासन केंद्रशासन किंवा मान्यता प्राप्त अधिघोषित विद्यापीठ यांनी मान्यता दिलेली असावी.

**संस्था सभासदत्वासाठी :** प्रवेश फी रु. १,०००/- ना परतावा.
**वार्षिक वर्गणी :** रु. ५,०००/-
**दिर्घ कालावधीसाठी संस्था सभासद :** एकावेळी ५ वर्षासाठी वर्गणी रु.२०,०००/-
**एका वेळी देण्यात येणारी पुस्तके :** एकावेळी जास्तीत जास्त १० पुस्तके देण्यात येतील. इ-१ व इ-२ येथील सभासदस्यत्व हे संबंधित संस्थेच्या प्रमुखास देण्यात येईल. त्यांना ग्रंथालयाचे ओळखपत्र देण्यात येईल. संस्थेच्या प्रमुखास आवश्यक वाटल्यास ते त्यांच्या एक किंवा दोन कर्मचाऱ्यांना त्यांच्यावतीने पुस्तके घेण्यास/परत करण्यास नामनिर्देशित करु शकतील. नामनिर्देशन अधिकृत पत्राने करावे लागेल. मात्र, पुस्तके अबाधितपणे वेळेवर परत करणे व ग्रंथालयाच्या नियमांचे पालन करणे यांची जबाबदारी संस्था प्रमुखांची असेल. वरील सभासदत्व देण्याचा किंवा कारण न देता नाकारण्याचा पूर्ण अधिकार प्रतिष्ठानला राहील.

६) सर्वसाधारण सभासद : सभासदाला एका वेळी एक पुस्तक/ग्रंथ देण्यात येईल. ते आठ किंवा पंधरा दिवसात परत करणे आवश्यक आहे. तसेच संदर्भग्रंथाचा उपयोग ग्रंथालयातच करता येईल. संदर्भ ग्रंथ घरी नेता येणार नाही. पुस्तकांची किंमत भरलेल्या अनामत रक्कमेपेक्षा जास्त असेल तेव्हा अधिक अनामत रक्कम किंवा त्या पुस्तकांच्या किंमतीएवढी अनामत रक्कम भरुन पुस्तक घरी नेता येईल.

७) महाविद्यालयीन व उच्चशिक्षण घेणारे विद्यार्थी/संशोधन यांना ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके ग्रंथालयात बसून वाचण्यासाठी/संदर्भासाठी देण्यात येतात. घरी/ग्रंथालयाबाहेर नेण्याकरिता देण्यात येणार नाही.

८) ग्रंथालयाच्या वेळा व सुट्टया : सकाळी ९.०० ते संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत ग्रंथालय वाचकाकरिता तसेच पुस्तके परत करणे/ नवीन घेणे यासाठी उघडे राहील. दुसरा व चौथा शनिवार, सर्व रविवार आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी ग्रंथालय चालू राहीत.

९) सभासदाचे कार्ड हरविल्यास त्यांना पुस्तक/ग्रंथ देण्यात येणार नाही. सभासदत्व नियमित ठेवण्याकरिता, सभासदाने स्वत:च्या हस्ताक्षरात साध्या कागदावर अर्ज करुन ग्रंथालयास सादर करावा. त्यानंतर कार्डाची दुसरी प्रत देण्याचा विचार केला जाईल.

१०) सभासदांकडून ग्रंथ हरविल्यास त्यांनी १५ दिवसात त्यांनी नवीन खरेदी करुन द्यावा लागेल किंवा त्या ग्रंथाची अद्ययावत रक्कम मूल्याइतकी रक्कम अनामत रक्कमेमधून वळती करण्यात येईल व गरज पडल्यास अधिकची रक्कम सभासदास भरावी लागेल. अनामत रक्कमेतून रक्कम भरणे अनिवार्य राहील.

११) सभासद ग्रंथालयामध्ये शांतता राखावी आपआपल्यामध्ये किंवा ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांबरोबर चर्चा करणे टाळावे, धुम्रपान, थुंकणे, झोपणे याकरिता मनाई राहील. ग्रंथालयात मोबाईल फोन बंद ठेवावे.

१२) ग्रंथालयातून बाहेर पडताना सभासदास दिलेल्या ग्रंथाचा वर्गांक, दाखलअंक ग्रंथालयाच्या गेटवर तपासला जाईल.

१३) सभासदास ग्रंथालयाचे सभासद रहावयाचे नसल्यास त्यांनी तसा लेखी अर्ज द्यावा, त्यासोबत कार्ड परत करावे. त्यावर निर्णय घेऊन इतर येणे नसल्यास अनामत रक्कम बिनव्याजी वजा करण्यात येईल.

# माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी

## कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी कडून जून ते सप्टेंबर २०१७ दरम्यान पुढील विविध प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले.

**सी–डॅक कोर्सेस :**

- सी–डॅक (Centre for Development of Advanced Computing) तर्फे PG-DAC कोर्सची बॅच फेब्रुवारी २०१७ मध्ये सुरू झाली होती. या बॅचचा समारोप दिनांक २९ जुलै २०१७ ला करण्यात आला. या बॅचमध्ये ९९ विद्यार्थी सहभागी होते.
- वरील बॅचच्या विद्यार्थ्यांना कॉमन प्लेसमेंट प्रोग्राम ३ ऑगस्ट २०१७ पासून सुरू झाला. विद्यार्थ्यांना कॉमन प्लेसमेंट प्रोग्राममध्ये उत्तम कामगिरी करता यावी याकरिता काही खास वक्ते Logixal, Ebix आणि Avenues या कंपनीमधून आले होते. यांनी दिलेल्या छोट्या मोठ्या टिप्पणीचा विद्यार्थ्यांना चांगला उपयोग होत आहे.
- PG-DAC ऑगस्ट २०१७ च्या बॅचची C-CAT (C-DAC Common Admission Test) दि. १८ व २५ जूनला घेण्यात आली. प्रबोधिनीमध्ये २४० विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.
- PG-DAC ऑगस्ट २०१७ ची बॅच दि. १७ ऑगस्टला सुरू झाली. त्यात आजवर ८५ ॲडमिशन झाल्या.
- PG-DAC ऑगस्ट २०१७ च्या विद्यार्थ्यांनी प्लेसमेंट प्रोग्राममध्ये उत्तम प्रतिसाद द्यावा, याकरिता खास मुलाखत वर्ग घेण्यात येत आहेत.
- PG-DAC कोर्समध्ये ॲडमिशन मिळविण्याकरिता C-CAT परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असते. ही परीक्षा उत्तमरित्या उत्तीर्ण होता यावी म्हणून PreDAC कोर्स चालविण्यात येतो. या कोर्सची बॅच आता माहिती तंत्रज्ञान विभागामध्ये सुरू आहे.
- मल्टीमिडीया क्रिएशन कोर्सला शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसोबत कार्यालयीन कर्मचाऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

**MKCL कोर्सेस :**

- प्रतिष्ठानतर्फे चालविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादीत (MKCL)च्या MS-CIT व KLiC Certificate कोर्सेसना विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद आहे.
- उन्हाळी सुट्टीमध्ये ॲडमिशन घेतलेल्या विद्यार्थ्यांनी MSBTE कडून घेण्यात येणाऱ्या परीक्षांना उपस्थिती दर्शविली व उत्तम यश मिळविले.

**मोफत कार्यशाळा :**

- दहावी व बारावीच्या परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मोफत सल्ला, व्याख्यान आयोजित केले होते. सेंट जोसेफ स्कूल, वाघे हायस्कूल, बी.एम.सी. माध्यमिक हायस्कूल, सिद्धार्थ कॉलेज, एलफिन्स्टन कॉलेज ह्या शाळा व महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांनी व्याख्यानाला उपस्थिती दर्शवली.
- २८ जुलै २०१७ रोजी दहावी, बारावी त्याचप्रमाणे पदवीधर विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र रोजगार तर्फे व्याख्यान आयोजित केले होते.
- प्रबोधिनीकडून या C++ विषयावर मोफत कार्यशाळा सेंट जोसेफ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांसाठी दि. ५ ऑगस्ट २०१७ रोजी आयोजित केली होती.

**शिक्षकांचा गौरव**

- शिक्षक दिनाचे औचित्य साधून सेंट जोसेफ स्कूल, कुलाबा व बाई बी. एस. बेंगाली गर्ल्स हायस्कूल चर्चगेट ह्या शिक्षण संस्थांच्या शिक्षकांचा AIT कडून गौरव करण्यात आला.
- गरजू आणि अपंग विद्यार्थ्यांना माफक दरामध्ये शिक्षण उपलब्ध करून देण्याची संधी AIT ने दिली. अनेक कोर्सेस मध्ये अशा प्रकारच्या विद्यार्थ्यांना पडताळणी नंतर माफक दरात प्रवेश देण्यात येतो. AIT (YCP) तर्फे लष्कर आणि पोलीसखात्यातील व्यक्ती आणि त्यांचे कुटुंबीय यांसाठी मोफत सवलत दिली जाते. इच्छुक आणि शैक्षणिक पात्रता असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हप्त्याने फी भरण्याची सुविधा देण्यात येते.

# विभागीय केंद्र, कऱ्हाड

## कार्यवृत्त

**स्व. सौ. वेणूताई चव्हाण यांची ३४ वी पुण्यतिथी (१ जून २०१७) :**

स्व. सौ. वेणूताई यशवंतराव चव्हाण यांची ३४ वी पुण्यतिथी सौ. वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कराड व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र, कराड यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आली. सकाळी आठ वाजता सौ. वेणूताई चव्हाण स्मारक ट्रस्टमधील स्व. यशवंतरावजी यांच्या पुतळ्यास मा. आमदार बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. सायंकाळी ६ वाजता बालगंधर्व रसिक मंडळ पुणे प्रस्तुत स्वरबहार नाट्यसंगीत व भक्ती संगीताची सुरेल सुरेख व श्रवणीय बैठक सौ. वेणूताई चव्हाण स्मारक सभागृहात संपन्न झाली. कराडातील अनेक संगीतप्रेमी बंधू भगिनी या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित होते. माननीय आमदार व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सन्माननीय सदस्य, सह्याद्री कारखान्याचे संचालक व नागरिक बंधूभगिनींनी या 'स्वरबहार' कार्यक्रमाचा आस्वाद घेतला. 'स्वरबहार' या कार्यक्रमाचे नियोजन सन्माननीय शरदचंद्रजी पवारसाहेब यांनी केले.

**आदरणीय स्व. पी. डी. पाटील साहेब यांची जयंती (१ जुलै २०१७) :**

आम्हा सर्वांचे प्रेरणास्थान वंदनीय स्व. पी.डी पाटीलसाहेब यांची जयंती यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान-विभागीय केंद्र कराड येथे भावपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. श्री. शिवाजी हायस्कूल जवळच्या स्व. पी.डी. पाटील यांच्या समाधीवर पुष्पांजली अर्पण करण्यात आली. कराड शहर व परिसरातील अनेक मान्यवर तसेच आमदार बाळासाहेब पाटील व सह्याद्री कारखान्याचे मान्यवर संचालक या प्रसंगी आवर्जून उपस्थित होते. साहेबांचे हे जन्मशताब्दी वर्ष असल्याने मोठ्या प्रमाणात नागरीक उपस्थित होते. त्यांच्या स्मृतीस शतशः प्रणाम!

**स्वातंत्र्य दिन १५ ऑगस्ट २०१७ :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-विभागीय केंद्र कराड व सौ वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट कराड या दोन्ही ठिकाणी आदरणीय आमदार बाळासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमासाठी दोन्ही संस्थांचे सर्व कर्मचारी आवर्जून उपस्थित होते. स्व. यशवंतरावजी चव्हाण तथा स्व. सौ. वेणूताई चव्हाण यांच्या स्मारकातील पुतळ्यास मान्यवरांनी पुष्पहार अर्पण केले. ''स्वांतत्र्यदिन १५ ऑगस्ट'' कार्यक्रम फार उत्साहाने साजरा करण्यात आला.

**तीर्थस्वरूप स्व. विठामाता चव्हाण पुण्यतिथी (१८ ऑगस्ट २०१७) :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-विभागीय केंद्र कराड व स्व. सौ वेणूताई स्मारक प.चॅ. ट्रस्ट कराड मधील कर्मचारी यांनी साहेबांचे जन्मग्राम 'देवराष्ट्रे' येथील ती. विठामाताच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केले. स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या जन्मगावचे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान केंद्र, साहेबांचे जन्मघर येथील यशवंतराव चव्हाण, स्व. सौ. वेणूताई चव्हाण, स्व. ती. विठामाता यांच्या तैलचित्रास पुष्पहार व पुष्पांजली अर्पण करण्यात आली. 'देवराष्ट्रे' मधील मान्यवर यावेळी आवर्जून उपस्थित होते.

# विभागीय केंद्र, पुणे

## कार्यवृत्त

**वारकरी अल्पोहार कार्यक्रम (जून २०१७) :**

दरवर्षी प्रमाणे वारकऱ्यांसाठी अल्पोपाहार, चष्मे, गॉगल वाटप व औषध वाटप याचा कार्यक्रम, प्रतिष्ठान व रंगीलदास सुरतवाला ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १९ जून २०१७ रोजी पहाटे ५.०० वाजल्यापासून दुपार पर्यंत घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी संयोजक म्हणून मा. अजित निंबाळकर, मा. शांतीलाल सुरतवाला, मा. अंकुश काकडे यांनी काम पाहिले. मा. सुरतवाला यांचे कार्यकर्ते जगमोहन सुरतवाला, प्रल्हाद तापकीर, सुनिल खताळ, शशिकांत सिन्नरकर, जाधव मामा, रुकूभाई शेख, राकेश कळमाणी, राजा परदेशी इत्यादी अनेक कार्यकर्त्यांनी सक्रीय सहभाग घेतला.

**जी.एस.टी. चर्चासत्र :**

जी.एस.टी. विषयक माहिती देण्यासाठी दि. १०ऑगस्ट २०१७ रोजी पत्रकार भवन येथे विशेष चर्चासत्र मुख्यालयाकडून आयोजित करण्यात आले होते. मुख्य प्रवक्ते म्हणून उपआयुक्त पुणे विभाग, प्रसाद झावरे पाटील आणि वृषाली लोढा यांनी माहिती सादर केली. प्रास्ताविक श्री. काकडे यांनी केले तर दत्ता बाळसराफ यांनी आभार मानले. श्री. रवी सरनाईक यांनी किरकोळ विक्रेत्यांच्या जी.एस.टी विषयक अडचणी बाबत प्रश्न उपस्थित केले, त्यांना समर्पक उत्तरे देण्यात आली.

**कृषी व सहकार व्यासपीठ पुणे : शेतीसाठी ड्रोन सेन्सिंग तंत्रज्ञान**

दि. १७ जून २०१७ रोजी दुपारी ३.०० ते ५.३० या वेळात कर्नाटक शासनाच्या वनविभागाने नियुक्तीनंतर वनविभागातील उपद्रवी वनस्पती (झाडे-झाडोरा) ज्या अन्य उपयुक्त वनांचे वाढीस अडथळा उत्पन्न करतात, त्यांचे ड्रोन तंत्रज्ञानाने झाडवाईज सेन्सस तयार करून अशा लाखो झाडांची मोठ्या क्षेत्रावरील माहिती ज्या अमेय गोडे यांनी शासनास सादर केली, त्यांचे व्याख्यान आयोजिले होते. उपद्रवी वनस्पती/झाडे नष्ट करून, म्हणजेच उखडून त्यापासून उपयुक्त वस्तू फर्निचर, कोळसा बनविण्याचे प्रशिक्षण स्थानिक आदिवासींना देण्यात आले. त्याची माहिती सभेत देण्यात आली. हेच फोटोमेट्रीचे तंत्रज्ञान ड्रोन वापरुन पिकाची वर्गवारी, उत्पादन, मातीतीतल आर्द्रता, भूस्खलनाचे आगाऊ अंदाज कसे देता येतात याचाही आपल्या व्याख्यानात श्री. गोडे यांनी ऊहापोह केला. त्यानंतर प्रश्नोत्तरे होऊन आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रम संपला.

**सहकार कायदा कलम ७९अे आदेशाबाबत पाठपुरावा.**

खुले सभासदत्व हा एक प्रकारे सहकाराचा पाया असून त्यानुसार ज्या नागरिकांना सहकारी संस्थांची सेवा घ्यावयाची आहे, त्या संस्थेस सदर सेवा देण्यात प्रशासकीय व शासकीय काही अडचण नसल्यास सदर नागरिकास सभासद करून घेऊन जरूर त्या सेवा उपलब्ध केल्या पाहिजेत. काही संस्थांमध्ये जातपात, धर्म, पंथ, शाकाहारी, मांसाहारी इत्यादींचे आधारावर छूत-अछूत पद्धतीने सभासदत्व नाकारले जाते. त्याला छुपा राजाश्रयही पूर्वीपासून मिळत आहे. या अन्यायाविरुद्ध मुंबईतील विनी को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी, आर्चलीन को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी, मारीनेट बिल्डींग को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी, यांचे निवडक सभासदांनी, शासन व कोर्टामार्फत अन्याय निवारणार्थ प्रयत्न चालू ठेवले आहेत. त्यांना प्रतिष्ठानतर्फे कायदेशीर सल्ला व सहकार्य देण्यात येत आहे. तसेच त्यांच्या प्रकरणांचा पाठपुरावा मा.सहकार आयुक्त कार्यालयाकडे सहकार कायदा कलम ७९अेच्या आदेशाबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

**कार्यकर्ता संमेलन**

दिनांक ९ जुलै २०१७ रोजी सेवानिवृत्त; पण सार्वजनिक काम करू इच्छिणाऱ्यांचे संमेलन श्री. सतीश देशमुख (अध्यक्ष, फोरम फॉर इंटलेक्च्युअल) यांच्या सहकार्याने विशाल सह्याद्री सदन सभागृहात आयोजित केले होते. त्यामध्ये डॉ बुधाजीराव मुळीक यांचे ''इन्कम रिस्क मॅनेजमेंट इन ॲग्रीकल्चर'' या विषयावर, डॉ. कुमार सप्तर्षी यांचे ''आंदोलनाचे शास्त्र आणि शस्त्र'', डॉ. मुकुंदराव गायकवाड यांचे ''शेतकऱ्यांची उत्पादकता शेतीमाल पणन'' इत्यादीबाबत व अरविंद कृषी विद्यापीठाचे कार्य, कॉम्रेड शांता रानडे यांचे ''शेतीतील महिलांचे

योगदान व त्यांचे प्रश्न'' आणि श्रीमती कल्पनाताई साळुंखे (अध्यक्ष, पाणी पंचायत) यांचे ''महाराष्ट्राच्या जलसंपत्तीचे न्याय्य वाटप'' या विषयांवर व्याख्यान झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. सतीश देशमुख यांनी केले. श्री. भिडे यांनी आभार प्रदर्शन केल्यानंतर कार्यक्रम संपला.

**राज्यमंत्री (सहकार) कायदा समिती सभा :**

राज्यमंत्री महोदय (सहकार) यांच्या अध्यक्षतेखाली सहकार कायदा दुरुस्ती समिती स्थापन करण्यात आली आहे. तिची पुणे विभागीय स्तरावरील बैठक 'साखर संकुलांमध्ये' मध्ये दि. २२/७/२०१७ रोजी भरली होती. समितीच्या सभेला प्रतिष्ठानचे संयोजक (कृषी व सहकार व्यासपीठ) यांना निमंत्रित केले होते. सदर सभेत अध्यक्ष महाराष्ट्र राज्य नागरी सहकारी बँक फेडरेशन व समिती सदस्य यांनी श्री. भिडे यांनीच चर्चेस सुरुवात करावी अशी विनंती केली. त्याला अनुसरून प्रतिष्ठानने ज्या सूचना सहकार कायदा दुरुस्तीबाबत केल्या होत्या, त्याचा गोषवारा सभेत सादर करण्यात आला व पत्र क्र.यचप्र/कृवस दि. १७/७/२०१७ ची सहपत्रासह प्रत सभा अध्यक्षांना सादर केली.

**डॉ. शेटे यांचे व्याख्यान :**

दिनांक ५ ऑगस्ट २०१७ रोजी ''महाराष्ट्राची सद्यःस्थिती आणि उपाय'' यावर नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ बँक मॅनेजमेंटचे माजी प्राध्यापक डॉ. एन.बी.शेटे यांचे व्याख्यान प्रतिष्ठानच्या कार्यालयात आयोजित करण्यात आले. व्याख्यानानंतर प्रश्नोत्तरांच्या कार्यक्रमानंतर श्री. भिडे यांनी आभार मानले.

**एन.पी.ए वर जालीम उपाय कायदा :**

केंद्र शासनाने फायनांशिअल रेझोल्युशन अ‍ॅन्ड डिपॉझिट इंश्युअरन्स् बिल २०१७ संसदेमध्ये मांडल्यावर ते संयुक्त समितीपुढे विचारार्थ पाठविण्यात आले. समितीने त्यावर सूचना व अभिप्राय मागविले होते. त्यास अनुसरून प्रतिष्ठानने एक चर्चासत्र आयोजित केले होते. त्या अनुषंगाने दि. २५/९/२०१७ रोजी कार्यालयात चर्चा झाली. त्यावर प्रतिष्ठानने तयार केलेली एक टिपणी व सहपत्रे (डॉ. थोरात माजी चेअरमन नाबार्ड यांचा लेख) दी डायरेक्ट (सी.बी.आय अ‍ॅन्ड जेसी) खोली क्र ३३९ तिसरा मजला, लोकसभा सचिवालय यांना श्री. काकडे यांच्या सहीने दि. २७/९/२०१७ रोजी सादर करण्यात आली.

**पारितोषिक वितरण समारंभ :**

दि १६ सप्टेंबर २०१७ रोजी डॉ. वसंतदादा पाटील विद्यानिकेतन प्रशाला या ठिकाणी, 'डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम' या विषयावरील प्रश्नमंजुषा स्पर्धा, निबंध स्पर्धा, इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांमध्ये पहिले तीन क्रमांक तसेच क्रमांक ४ ते ७ उत्तेजनार्थ आणि उरलेल्या शाळातील विद्यार्थ्यांसाठी उत्तेजनार्थ बक्षीसे वाटण्यात आली. बक्षीस समारंभ मा.निंबाळकर, मा.संदिप कदम, व मा.काकडे यांचे हस्ते पार पडला. या स्पर्धामध्ये एकूण २ हजार ५४२ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. त्याचप्रमाणे या विद्यार्थ्यांना भिडे परिवाराकडून सहभागाबाबत रंगीत प्रशस्तीपत्रके प्रदान करणत आली.

**रिझर्व बँक अधिकारी व्याख्यान :**

केंद्र शासनाने बँकींग रेग्युलेशन अ‍ॅक्ट मध्ये कलम ३५अेअे व ३५ अेबी या सुधारणा करून बँकांच्या थकित कर्जाबाबत इन्सॉलव्हन्सी व बँकिग अ‍ॅक्टच्या तरतुदींचा वापर करून मोठ्या थकित रकमा वसुलीसाठी कर्जदाराविरुद्ध कारवाईचे अधिकार रिझर्व बँकेस दिले आहेत. या बाबत रिझर्व बँकेचे (कॉलेज ऑफ अ‍ॅग्रीकल्चर बँकिगचे) प्राध्यापक डॉ. मोहन यांचे विद्वत्तापूर्ण व्याख्यान दिनांक २२/९/२०१७ रोजी प्रतिष्ठानच्या कार्यालयात आयोजित करण्यात आले. व्याख्यानानंतर अ‍ॅडव्होकेट वर्तक यांनी आभार मानले.

# विभागीय केंद्र, नागपूर

## कार्यवृत्त

**निसर्गाच्या कविता : सोमवार दि. ५ जून २०१७ :**

५ जून हा जागतिक पर्यावरण दिवस! या दिवसाचे औचित्य साधून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र नागपूर, वनराई, विदर्भ गौरव प्रतिष्ठान, आधार संस्था व राम गणेश गडकरी स्मृति प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने निसर्गाशी संवाद साधता यावा म्हणून 'निसर्गाच्या कविता' या कार्यक्रमाचे आयोजन सोमवार दि. ५ जून रोजी सायं. ६.०० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे करण्यात आले.

याप्रसंगी मनीषा अतुल, प्रसन्न शेंबेकर, सुमिता कोंडबत्तुनवार, पवन नालट, अनुजा देशपांडे, तुषार जोशी, तिर्थराज कापगते, मंगला रामापूरे व संघमित्रा खंडारे इ. मान्यवर कवी सहभागी झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. शुभदा फडणवीस यांनी केले.

**'एका योगियाची कहाणी' बुधवार दि. २१ जून २०१७ :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र नागपूर, विदर्भ गौरव प्रतिष्ठान नागपूर आणि जनार्दनस्वामी योगाभ्यासी मंडळ नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'विश्व योगदिनाच्या' निमित्ताने प. पू. जनार्दनस्वामी यांच्या जीवन चरित्रावर आधारित 'एका योगियाची कहाणी' या दीर्घांकाचा नाट्यप्रयोग बुधवार दि. २१ जून, २०१७ रोजी सायं. ७.०० वाजता श्री साई सभागृह, राष्ट्रभाषा संकुल शंकरनगर चौक, नागपूर येथे आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी मा. सौ. नंदाताई जिचकार (महापौर, नागपूर महानगरपालिका), मा.डॉ. गिरीश गांधी (अध्यक्ष यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नागपूर) प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जनादर्नस्वामी योगाभ्यासी मंडळाचे कार्यवाह मा. श्री. रामभाऊ खांडवे होते.

**भय आणि वास्तव शनिवार दि. ८ जुलै २०१७ :**

जम्मू काश्मिर सरकारच्या वतीने काही पत्रकारांना तिथले वास्तव समजून घेण्यासाठी निमंत्रित करण्यात आले होते. यात तरूण भारतचे मुख्य संपादक श्री. गजानन निमदेव, दै. भास्करचे संपादक श्री. मणिकांत सोनी आणि दै. सकाळचे श्री. किशोर जामकर सहभागी होते.

या पार्श्वभूमीवर सर्वश्री गजानन निमदेव व मणिकांत सोनी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र नागपूर व विदर्भ गौरव प्रतिष्ठान, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हा कार्यक्रम शनिवार दि. ८ जुलै, २०१७ रोजी सायंकाळी ६.०० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे संपन्न झाला.. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ गौरव प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा.श्री. दत्ताभाऊ मेघे होते.

**श्री. रमेश अंभईकर यांचा अमृत महोत्सवी सत्कार, दि.१६ जुलै २०१७ :**

नागपूर-विदर्भाच्या नाट्यक्षेत्रातील ज्येष्ठ रंगकर्मी व प्रतिभासंपन्न नाट्यदिग्दर्शक श्री. रमेश अंभईकर ह्यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्ताने त्यांच्या आजवरच्या नाट्यकर्तृत्वाचा यथायोग्य गौरव करण्यासाठी रविवार दि. १६ जुलै २०१७ रोजी सकाळी १० वाजता श्री साई सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे श्री रमेश अंभईकर सत्कार समिती, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र नागपूर व विदर्भ गौरव प्रतिष्ठान नागपूरच्या संयुक्त विद्यमाने सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती मा.श्री. विकास सिरपूरकर ह्यांचे शुभहस्ते आणि वनराईचे विश्वस्त मा.डॉ. गिरीश गांधी ह्यांचे अध्यक्षतेखाली श्री. रमेश अंभईकर ह्यांचा जाहीर सत्कार आयोजित करण्यात आला. ज्येष्ठ कथाकार मा. श्रीमती आशाताई बगे व लोकप्रिय नाट्य-चित्र अभिनेते मा.डॉ. गिरीश ओक आणि महाराष्ट्र इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष मा.डॉ.वाय.एस.देशपांडे ह्यांची त्यावेळी विशेष उपस्थिती होती.

**'खरंच आपली मुलं शिकतात का?' व्याख्यान दि. २९ जुलै २०१७ :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने शनिवार दि. २९ जुलै, २०१७ सायं. ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह राष्ट्रभाषा संकुल शंकरनगर चौक नागपूर येथे 'खरंच आपली

मुलं शिकतात का?' या विषयावर शिक्षण क्षेत्रात भरीव योगदान देणारे श्री. हेरंब कुलकर्णी यांच्याशी समग्र चर्चा आणि गंभीर विचारमंथनाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी अध्यक्षस्थानी होते.

**'मैत्रीऋणा' : रविवार दि. ६ ऑगस्ट, २०१७ :**

जागतिक मैत्रीदिनानिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र नागपूर व आधार संस्था नागपूरच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. ६ ऑगस्ट २०१७ रोजी सायंकाळी ६.०० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह राष्ट्रभाषा संकुल शंकरनगर चौक नागपूर येथे 'मैत्रीऋणा' या डॉ. अरूणा ढेरे यांच्या समग्र साहित्यसंपदेवर आधारित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून मा. अरूणा ढेरे व प्रमुख अतिथी म्हणून मा. आशाताई बगे उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरचे अध्यक्ष मा.डॉ. गिरीश गांधी होते. याप्रसंगी शुभदा फडणवीस, माधवी भट, पराग घोंगे यांनी वाङ्मयकृतीचे अभिवाचन केले.

**क्रांतीदिन : बुधवार दि. ९ ऑगस्ट, २०१७ :**

९ ऑगस्ट हा क्रांतीदिन! इंग्रजांच्या गुलामगिरीविरोधात महात्मा गांधी यांनी रणशिंग फुंकले आणि भारत छोडोचा नारा दिला. ९ ऑगस्टला संपूर्ण भारतात एकाचवेळी क्रांतीची मशाल पेटली. भारताच्या स्वातंत्र्यासाठी अनेक ज्ञात-अज्ञात क्रांतिकारकांनी आपल्या प्राणांची आहुती स्वातंत्र्य यज्ञात दिली. त्या साऱ्याच क्रांतिकारकांचे स्मरण करण्याचा दिवस म्हणजे ९ ऑगस्ट! यानिमित्ताने क्रांतिकारकांना आदरांजली वाहण्यासाठी विदर्भ गौरव प्रतिष्ठान, नागपूर व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि. ९ ऑगस्ट, २०१७ रोजी सायं ५.३० वाजता श्री साई सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे 'स्फुल्लिंग क्रांतीचे' हा देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.. याप्रसंगी माजी खासदार मा.श्री. दत्ताभाऊ मेघे प्रामुख्याने उपस्थित होते.

**कवयित्री विजया मारोतकर यांचा सत्कार सोहळा : रविवार दि. १३ ऑगस्ट, २०१७ :**

शिक्षक साहित्य संघ शाखा नागपूर व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने साहित्य क्षेत्रातील कारकिर्दीने अनेक सन्मानाच्या पुरस्कारांनी सेवानिवृत्तीच्या क्षणांना उजळून टाकल्याबद्दल कवियत्री विजया मारोतकर यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन रविवार दि. १३ ऑगस्ट, २०१७ रोजी सकाळी १०.०० वाजता करण्यात आले.

हा सत्कार समारंभ मा.आ.श्री. अनिल सोले यांच्या शुभहस्ते व मा.आ.श्री. ना. गो. गाणार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी शिक्षक साहित्य संघ महाराष्ट्र राज्य, संस्थापक अध्यक्ष मा. श्री. जयदीप सोनखासकर हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरचे अध्यक्ष मा.डॉ. गिरीश गांधी होते.

**'श्रावण-श्रृंगार': व्याख्यान- रविवार दि. १३ ऑगस्ट, २०१७ :**

श्रावण महिना अनेक व्रतवैकल्ये आणि सणांनी सजलेला महिना आहे. श्रावणाचे धार्मिक महत्त्व आहे. पण या काळातच निसर्गही हिरवाकंच होतो. श्रावण महिन्याचे एकूणच धार्मिक आणि पारंपरिक महत्त्व तसेच श्रावणाचा मानवी मनावर होणारा परिणाम याचा ऊहापोह करण्यासाठी विदर्भ गौरव प्रतिष्ठान नागपूर व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'श्रावण-श्रृंगार' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

हा कार्यक्रम रविवार दि. २३ ऑगस्ट, २०१७ रोजी सायं. ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे आयोजित करण्यात आला.. याप्रसंगी कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, कराडचे कुलपती मा.डॉ. वेदप्रकाश मिश्रा हे प्रमुख वक्ते म्हणून होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.डॉ. गिरीश गांधी होते.

**''डॉ. सुलभा हेर्लेकर स्मृती पुरस्कार वितरण सोहळा''- शुक्रवार, १८ ऑगस्ट, २०१७ :**

विदर्भातील ज्येष्ठ कवयित्री डॉ. सुलभा हेर्लेकर यांच्या कविता मराठी काव्यक्षेत्रात स्वतःचे अढळ स्थान राखून आहेत. त्यांनी नव्या दमाच्या अनेक कवींना प्रोत्साहन देऊन घडविले म्हणूनच त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने एका नवोदित कवीला दरवर्षी डॉ. सुलभा हेर्लेकर स्मृती पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. या वर्षीचा पुरस्कार अमरावती येथील नवोदित कवी पवन नालट यांना देऊन गौरविण्यात आले.

हा पुरस्कार वितरण सोहळा शुक्रवार, १८ ऑगस्ट, २०१७ सायं. ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे महाकवी श्री. सुधाकर गायधनी यांच्या शुभहस्ते व प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

**'समाजस्वास्थ्य': शनिवार दि. १६, सप्टेंबर, २०१७ :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र नागपूर, राम गणेश गडकरी प्रतिष्ठान नागपूर व विदर्भ गौरव प्रतिष्ठान नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नाटकघर पुणे निर्मित, श्री. अजित दळवी लिखित व श्री. अतुल पेठे दिग्दर्शित ''समाजस्वास्थ्य'' या नाट्यप्रयोगाचे आयोजन शनिवार दि. १६ सप्टेंबर, २०१७ रोजी श्री साई सभागृह, राष्ट्रभाषा संकुल शंकरनगर चौक, नागपूर येथे करण्यात आले.

याप्रसंगी मा.श्री. रणजितबाबू देशमुख, मा.श्री. दत्ताजी मेघे व मा. डॉ. गिरीश गांधी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

**'व्याख्यान': बुधवार दि. २० सप्टेंबर २०१७ :**

स्व. इंदिरा गांधी ह्यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने बुधवार दि. २० सप्टेंबर २०१७ रोजी सायं. ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह राष्ट्रभाषा संकुल शंकरनगर चौक नागपूर येथे देशातील वरिष्ठ पत्रकार, चिंतक व अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे चिटणीस श्री. पंकज शर्मा यांचे 'इंदिरा गांधी' : 'जनतांत्रिक दायीत्व बोध का प्रतीक' या विषयावरील व्याख्यान आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी संसद सदस्य मा. श्री. गेव्ह आवारी होते.

**अरूण साधू यांना श्रद्धांजली : बुधवार दि. २७ सप्टेंबर २०१७ :**

ज्येष्ठ साहित्यिक आणि पत्रकार अरूण साधू यांचे दि. २५ सप्टेंबर, २०१७ रोजी निधन झाले. २००७ साली नागपूर येथे संपन्न झालेल्या ८० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने बुधवार दि. २७ सप्टेंबर, २०१७ रोजी सायं. ६.०० वाजता शंकरराव देव संवाद कक्ष (कॉन्फरन्स हॉल) राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

लोकमतचे संपादक व सुप्रसिद्ध विचारवंत मा.श्री. सुरेश द्वादशीवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या श्रद्धांजली कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक मा.डॉ. यशवंत मनोहर, सौ आशाताई बगे व विदर्भ साहित्य संघाचे उपाध्यक्ष मा.श्री. वामनराव तेलंग यांनी श्रध्दांजलीपर भाषणे केली.

## सत्तेचे राजकारण

मला वाटते की, राजकारण आणि राजकीय नेतृत्त्व हा लोकव्यवहार आहे. त्यात सत्ता मिळविण्यासाठी स्पर्धा ही चालणार आहे. प्रभावी पुढारी आपल्या विचारसरणीचे, आपल्या कार्यक्रमाचा आग्रह धरणारे गट करणार, हेही आता उघड आहे. सत्ता मिळविणे किंवा तिची अभिलाषा धरणे म्हणजे काहीतरी पाप आहे, असे मानणारे लोक राजकारण करू तरी पाप आहे, असे मानणारे लोक अडचणीत सापडला, की दुसरा गट पुढे येणार. सत्तासंक्रमण हे आता असेच होत राहणार. म्हणून 'गटबाजीचे राजकारण' इत्यादी शब्द छद्मी अर्थाने आपण वापरतो, ते आता सोडून द्यावे लागेल. जगात सर्वत्र असेच चालले आहे. भारतातही त्याला अपवाद आढळणार नाही. अर्थात वैयक्तिक हेव्यादाव्यांसाठी उभारलेले गट निंद्य व त्याज्यच समजावे लागतील.

– मा. यशवंतराव चव्हाण



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई–विभागीय केंद्र औरंगाबादच्या अध्यक्षपदी अंकुशराव कदम यांची नियुक्ती झाल्याबद्दल विशेष सत्कार करताना प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्ष खा. सुप्रिया सुळे, सोबत आ. भाऊसाहेब पाटील चिकटगांवकर, आ. विक्रम काळे, ज्येष्ठ कृषीतज्ञ विजयअण्णा बोराडे, प्राचार्य प्रतापराव बोराडे, डॉ. अपर्णा कक्कड, विजय कान्हेकर, केंद्राचे सचिव नीलेश राऊत, सदस्य डॉ. रेखा शेळके दिसत आहेत.




यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र औरंगाबाद व विकास अध्ययन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरणाची आवश्यकता या विषयावर परिसंवाद. कार्यक्रमाच्या वेळी रेणूका कड यांचा अभ्यास अहवालाचे प्रकाशन करण्यात आले. या वेळी (डावीकडून) सुबोध जाधव, सुहास तेंडूलकर, विकास अध्ययन केंद्राचे सुरेश शेळके, दिप्ती राऊत, निरजा भटनागर, रेणूका कड, वृषाली किन्हाळकर व नीलेश राऊत.



माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी



शिक्षण विकास मंच आयोजित 'शिक्षणकट्टा' या उपक्रमांर्तगत 'शिक्षण हक्क कायदा आणि गुणवत्ता' या विषयावरील चर्चासत्र




विभागीय केंद्र ठाणे : शिक्षक दिनाच्या निमित्ताने जेष्ठ सनदी अधिकारी मा. निला सत्यनारायण यांच्या हस्ते उल्लेखनिय कार्य केलेल्या शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.




ठाणे : ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून आयोजित कार्यक्रम




अपंग हक्क विकासमंच आयोजित 'आत्ममग्रता जीवनजागृती' कार्यशाळेचे आयोजन



अपंग हक्क विकास मंच आणि जयवकील फौंडेशन आणि रिसर्च सेंटर मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा पातळीवर मतिमंदत्व आणि त्यांचे पालकत्व कायदेशीररित्या घोषित करण्याबाबत जाणीव जागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण मुंबई, केंद्र- अंबाजोगाई च्या नुतन कार्यालयाचे उद्घाटन संसदरत्न खा. सुप्रियाताई सुळे यांच्या उपस्थितीमध्ये झाले. अंबाजोगाई चे अध्यक्ष डॉ द्वारकादास लोहिया, कार्याध्यक्षा डॉ. दिपाताई क्षीरसागर, सचिव डॉ नरेंद्र काळे, कोषाध्यक्ष अभिजीत जोंधळे, सदस्या मा.आ. उषाताई दराडे, मा. आ. पृथ्वीराज साठे, अनिकेत लोहिया आदी उपस्थित होते.




ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कविवर्य विंदा करंदीकर यांच्या जन्मशताब्दी दिनानिमित्त त्यांच्या साहित्याचे दर्शन घडविणारा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे पार पडला.






'विज्ञानगंगा'- कार्यक्रमांतर्गत डॉ. शरद पां. काळे यांनी 'व्हर्टिकल फार्मिंग' या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले.



नवमहाराष्ट्र युवा अभियान विभागाच्यावतीने आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त 'महाराष्ट्र राज्य युवा धोरण–अंमलबजावणीबद्दलचे पुनरावलोकन' या विषयांवरील चर्चासत्र



दिवंगत अरूण साधू यांना आदरांजली वाहण्यासाठी 'जना–मनातले साधू' या कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना मा. शरदचंद्रजी पवार






कृषी दिनानिमित्त सोनई, ता. नेवासा येथे आयोजित शेतकरी मेळावा व चर्चासत्रात मार्गदर्शन करताना डॉ. मुकुंदराव गायकवाड, कुलपती अरविंद कृषी विद्यापीठ नागपूर तसेच उपस्थित मान्यवर, शेतकरी बांधव व कृषी पदवीधर उपस्थित होते.



कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम आयोजित
'विधी साक्षरता कार्यशाळा'



कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम आयोजित
'विधी साक्षरता कार्यशाळा'



स्वातंत्र्य दिनानिमित्त मुंबईच्या वतीने
युवा स्वातंत्र्य ज्योत रॅली काढण्यात आली.



युवा स्वातंत्र्य ज्योत रॅली- अंबाजोगाई



माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी ट्रेडिशनल डे



युवा संवाद यात्रा, अंबाजोगाई



कोंकण विभागीय केंद्र कार्यालयात १ जूलै, वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेला अभिवादन करताना मा. अजित पवार, मा. सुनिल तटकरे, मा. भास्करराव जाधव, राजाभाऊ लिमये व सदस्य



कृषि दिनानिमित्त गावने, ता. लांजा येथे वृक्ष लागवड करताना अशोक तातुकडे, जयवंत विचारे आणि ग्रामस्थ





सृजन कार्यशाळा – मुंबई





स्व. वेणूताई चव्हाण यांची ३४ वी पुण्यतिथी



महाराष्ट्र महिला व्यासपीठ आयोजित केक
आणि आयसिंग प्रशिक्षण



'पौष्टिक सॅलेड प्रशिक्षण' कार्यक्रम




विभागीय केंद्र नाशिकच्या वतीने फिल्मिन्गो आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सवाच्या निमित्ताने लघुपट निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.



स्वातंत्र्य दिनानिमित्त विभागीय केंद्र नाशिकच्या वतीने युवा स्वातंत्र्य ज्योत फेरी.




'काश्मिर : भय आणि वास्तव!' या व्याख्यानाप्रसंगी मनोगत व्यक्त करताना डॉ. गिरीश गांधी व व्यासपीठावरील मान्यवर




'एका योगियाची कहाणी' या दिर्घांकांच्या नाट्यप्रयोगाप्रसंगी निमंत्रित मान्यवर.





विभागीय केंद्र सोलापूर आयोजित लघुपट निर्मिती कार्यशाळा



हवामान मापन उपकरण, संच कसा वापरावा याचे प्रशिक्षण



कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, तलासरी-आदिवासी विद्यार्थीनींबरोबर हवामान बदल या समस्येवर स्लाईड शो.




मंगरूळ, ता. औसा, जि. लातूर, येथे औसा तालुका खो-खो स्पर्धेत विभागीय केंद्राचा आर्थिक मदतीसह सहभाग. त्यावेळी विभागीय सचिव मा. श्री. हरिभाऊ जवळगे व अन्य मान्यवर सहभागी मुलां-मुलींसोबत.



राजर्षी शाहू महाराज यांना त्यांच्या १४३व्या जयंतीनिमित्त व्याख्यानाच्या अगोदर अभिवादन करण्यात आले, त्याप्रसंगी विभागीय अध्यक्ष मा. खा. डॉ. जनार्दन वाघमारे, सचिव हरिभाऊ जवळगे, संचालक ॲड. मनोहरराव गोमारे आणि मान्यवर






विज्ञानगंगा - 'आधुनिक भारताची विज्ञान क्षेत्रातील प्रगती' या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. सुधीर पानसे

करियरसाठी... नवीन MS-CIT

नवीन
**MS-CIT**
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स

MKCL
॥ ज्ञानदीप लावू जगी ॥



१ कोटीहून अधिक जिज्ञासूंना कंप्यूटरचे 'स्मार्ट युझर्स' बनविणारा कोर्स MS-CIT!

नव्या **MS-CIT** मध्ये शिका, २०० डिजिटल स्किल्स!

21st Century 'Job Skills'
21st Century 'Study Skills'
21st Century 'Life Skills'
21st Century 'Citizenship Skills'
Computer 'Typing Skills'

**MS-Office 2013, Windows 7, Internet, Google Tools आणि Mobile Apps. चे केस स्टडीज्च्या माध्यमातून प्रॅक्टिकल प्रशिक्षण.**

२१ व्या शतकात वावरण्याचा आत्मविश्वास

**MS-CIT + SUCCESS**
कंप्यूटर स्किल्स, इंग्रजी संवाद आणि सॉफ्ट स्किल्स

नजीकच्या केंद्रासाठी संपर्क
JUST DIAL 88888 88888

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान
जन. जगन्नाथ भोसले मार्ग, मंत्रालयाजवळ,
नरीमन पॉईंट, मुंबई - ४०००२१.
दूरध्वनी : ०२२-२२८१७९७५/२२०४३६१७
भ्रमणध्वनी : ९७६९२५६३४३

# विभागीय केंद्र, नाशिक

## कार्यवृत्त

**स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला युवा स्वातंत्र्यता ज्योत फेरी : दि. १४ ऑगस्ट २०१७ :**

भारताच्या ७१ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त नवमहाराष्ट्र युवा अभियान नाशिकच्या वतीने युवा स्वातंत्र्य ज्योत फेरी दिनांक १४ ऑगस्ट २०१७ रोजी सायंकाळी ७.०० ते रात्री ८.३० दरम्यान आयोजित करण्यात आली होती. हातात मशाली पेटवून शहीद चौक गंगापूर रोड, येथील शहीद स्मारकाला अभिवादन करून फेरीची सुरुवात करण्यात आली. सदर फेरी हुतात्मा चौक गंगापूर रोड –विद्या विकास सर्कल, जुना गंगापूर नाका, केटीएचएम महाविद्यालय, अशोक स्तंभ, मेयर सिग्नल हुतात्मा स्मारक येथे समाप्त करण्यात आली. याप्रसंगी फेरीमध्ये शहरातील नागरिक व विविध संस्थाचे प्रतिनिधी व महाविद्यालयातील विद्यार्थी यांच्या ३०० युवक युवतींनी सहभाग नोंदवला.

यावेळी युवक युवतींच्या हातातील विविध समाज प्रबोधनात्मक संदेश उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होते, तर भारत मातेच्या वेशभूषेतील घोडा बग्गी वर बसलेली छोटी चिमुरडी सर्वांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरली.

भारताच्या ७१ व्या स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या वतीने आयोजित केलेल्या या उपक्रमाचे सर्वच स्तरातून स्वागत झाले.

स्वातंत्र्यानंतर आपण काय गमावले याच्यावर चर्चा करत बसण्यापेक्षा आपण भविष्यात काय करू शकतो, याचा वास्तववादी विचार करण्याची गरज आहे, अते मत कार्याध्यक्षांनी व्यक्त केले. युवा स्वातंत्र्य ज्योत फेरीच्या समारोपप्रसंगी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नाशिक अभ्यासिकेतील तरुणांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन देशभक्तीपर गीते सादर करुन कार्यक्रमात रंग भरला आणि कार्यक्रमाचा समारोप झाला.

**लघुपट निर्मिती कार्यशाळेचे आयोजन : दि. २७–०९–२०१७ :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई–विभागीय क्रेंद्र नाशिक यांच्या वतीने 'फिल्मिन्गो आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सवा'च्या निमित्ताने लघुपट निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळेचे उद्घाटन विभागीय केंद्र नाशिकचे कार्याध्यक्ष यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या कार्यशाळेत प्रसिद्ध दिग्दर्शक, समीक्षक अशोक राणे व दिग्दर्शक शिव कदम यांचे उपस्थितांना मार्गदर्शन लाभले.

भारतात जागतिक दर्जाचे लघुपट निर्माण व्हावेत आणि ते 'फिल्मिन्गो इंटरनॅशनल शॉर्ट फिल्म फेस्टिवल'द्वारे जगप्रसिद्ध 'कान्स इंटरनॅशनल फिल्म फेस्टीवल'च्या व्यासपीठावरून जगभर जावेत हा या कार्यशाळेच्या आयोजनामागील मुख्य हेतू होता. लघुपट म्हणजे पूर्ण लांबीच्या चित्रपटाचे लघुरूप नव्हे! तर तेही एक स्वतंत्र दालन आहे, हे स्पष्ट करणारी ही एक कार्यशाळा होती. लघुकथा आणि कादंबरी तसेच एकांकिका आणि नाटक हा जसा भेद आहे, त्याचप्रमाने चित्रपट व लघुपट यामध्ये भेद आहे. ते प्रत्यक्ष देश विदेशातील लघुपट दाखवून व व्याख्यानाद्वारे उपस्थितांना समजावून सांगितले गेले.

लघुपट म्हणजे नेमके काय? पटकथा लेखन, छायाचित्रण आणि संकलन, लघुपट निर्मितीची इतर अंगे, लघुपट–त्यांचे आणि आपले या प्रमुख विषयांवर कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात आले, कार्यक्रमास नाशिककरांनी मोठ्या उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.

# विभागीय केंद्र, कोकण

## कार्यवृत्त

**पर्यावरण दिन : जून २०१७ :**

पर्यावरणाला अपाय ठरणाऱ्या अनेक घटकांचा उपद्रव निर्णायकपणे थांबविण्यासाठी गाव ते देश पातळीवर शासनस्तरावर विविध प्रयत्न सुरू आहेत. या सर्वांमध्ये प्लास्टिक कचरा हा सर्वाधिक अडचणीचा मुद्दा आहे. त्यातून पर्यावरणाला धोका पोहोचतो. या विषयाकडे समाजातील सर्व घटकांचे लक्ष वेधून लोकशिक्षण घडावे म्हणून कोकण विभागीय केंद्र जिल्हा रत्नागिरी, रोटरी क्लब रत्नागिरी व पर्यावरण संस्था रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण दिनानिमित्त सोमवार दि. ५ जून २०१७ रोजी सकाळी ८ ते ९.३० या कालावधीत भाट्ये येथे प्लास्टिक कचरा संकलित करण्यात आला. यावेळी पर्यावरण संस्थेचे प्रतिनिधी श्री. घाटे, फिशरीज कॉलेजचे प्राध्यापक डॉ. चौधरी व विद्यार्थी, पर्यावरण संस्थेचे आधारस्तंभ व कोकण विभागीय समितीचे उपाध्यक्ष मा. डॉ. श्रीरंग कद्रेकर, अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये, सदस्य श्री. चंद्रमोहन देसाई, जिल्हाध्यक्ष श्री. कृ. आ. पाटील, सदस्या श्रीमती दिलनाज शेख, किशोर पाटकर व इतर मान्यवर उपस्थित होते.

**गुणवंत विद्यार्थी सत्कार : जून २०१७ :**

शैक्षणिक प्रवासातील महत्त्वाची पायरी मानली जाणाऱ्या १० वी तील १०० टक्के गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ कोकण विभागीय केंद्र - जिल्हा रत्नागिरीचे वतीने दि. २६ जून २०१७ रोजी टिळक आळी येथील विभागीय केंद्राचे कार्यालयात आयोजित करण्यात आला होता. यावेळी कोकण विभागीय समितीचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये, उपाध्यक्ष मा. डॉ. श्रीरंग कद्रेकर, जिल्हाध्यक्ष श्री. कृ. आ. पाटील, विभागीय समिती सदस्य श्री. चंद्रमोहन देसाई, जिल्हा समिती सदस्य श्री. शहाजीराव खानविलकर, श्रीम. प्राची शिंदे, किशोर पाटकर, युयुत्सू आर्ते आदी मान्यवर उपस्थित होते. जिल्हाध्यक्ष कृ. आ. पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

चि. अथर्व भिडे याचे १०० टक्के गुणांसह राज्यात प्रथम आल्याबद्दल तसेच स्वानंद नेने, मृदुला देवस्थळी, हेमांगी दांडेकर, मुग्धा पोखरणकर, तनुजा मोर्ये यांनी दहावीमध्ये १०० टक्के गुण मिळविल्याबद्दल मान्यवरांचे हस्ते 'यशवंत स्मृतिसुगंध' हे पुस्तक, सर्टीफिकेट, पेन व गुलाबपुष्प देऊन अभिनंदन करण्यात आले.

अथर्व भिडे व मृदुला देवस्थळी यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. अथर्व भिडे याने संशोधक होण्याची इच्छा व्यक्त केली. त्यादृष्टीने पुढील शिक्षण घेणार असल्याचे सांगितले. मृदुला देवस्थळी हिने पुढील क्षेत्र काबीज करताना तुमच्या सदिच्छांचे भान राखू, असे सांगितले.

डॉ. कद्रेकर यांनी विद्यार्थ्यांना संदेश देताना सांगितले, की तुमच्यातील गुणवत्ता अशीच कायम ठेवा. तुमची ही भरारी कौतुकास्पद आहे. त्याचे निश्चयाने संवर्धन करा. शाळा, आईवडील, मित्रवर्ग यांच्या अपेक्षांची पूर्तता करा, श्री. राजाभाऊ लिमये यांनी मुलांना 'तुम्ही शैक्षणिक बुध्दिमत्ता, गुणवत्तेच्या बळावर आपले, आपल्या संस्थेचे नाव उज्वल केले आहे. आपल्या या उज्वल यशामध्ये आपल्या कुटुंबाचे, शिक्षण संस्थेचे आणि त्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे प्रबोधन करणाऱ्या गुरूजनांचेही योगदान मोठे आहे आणि म्हणून उज्वल यशात जो आपला सन्मान होत आहे, गौरव होत आहे त्यात त्यांचाही वाटा आहे याचे भान सर्वानीच ठेवावयास हवे' असे सांगून त्यांच्या भावी शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देताना आपण दहावीत जसे यश संपादन केले आहे तसेच पुढील शिक्षणाकडे वळताना आपल्या मनाने, आपल्या आवडीने जी पद संपादन करावयाची असतील त्याकडे वळा, असेही विचार व्यक्त केले. उपस्थित अन्य मान्यवरांनीही मुलांना शुभेच्छा दिल्या.

**कृषी दिन कार्यक्रम : जुलै २०१७ :**

अ) कोकण विभागीय केंद्र- रत्नागिरी व पंचायत समिती, राजापूर यांच्या संयुक्त विद्यमाने पंचायत समिती कृषीभवन राजापूर येथे कृषी दिनाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी पंचायत समिती राजापूरचे सभापती मा. श्री. सुभाष गुरव, उपसभापती मा. सौ. अश्विनी शिवणेकर,

गटविकास अधिकारी श्री. एस. बी. माने, पंचायत समिती, सदस्य श्री. अभिजीत तेली, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान जिल्हा समिती अध्यक्ष श्री. कृ. आ. पाटील, सदस्य श्री. शहाजीराव खानविलकर आदी मान्यवर व शेतकरी उपस्थित होते. पंचायत समिती सभापती मा. श्री. सुभाष गुरव यांच्या हस्ते स्व. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून परिसरात सागाचे रोप लावून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने शेतकऱ्यांना साग रोपांचे वाटप करण्यात आले. जिल्हा समिती अध्यक्ष श्री. कृ. आ. पाटील यांनी शेतकऱ्यांच्या प्रत्येक कुटुंबाने शेतात श्रमप्रतिष्ठा जोपासण्याची आवश्यकता सांगून जगाच्या तुलनेत भारताचा निसर्ग समृद्ध सोनेरी आहे. स्वातंत्र्याच्या वेळी ५२ टक्के लोक शेतीवर मेहनत करीत असत आज १७ टक्केच लोक शेतात राबतात. वनमंत्री ना. मुनगट्टीवार यांच्या ४ कोटी वृक्षलागवड कार्यक्रमाला पाठिंबा दिला असून कोकणात नारळाबरोबर चिवा (बांबू) कल्पवृक्ष असल्याचे सांगितले.

शेतीला जोड धंद्याची योग्य साथ उभी केली तर कोकण समृद्ध कसा होईल हे गटविकास अधिकारी एस. बी. माने यांनी तपशीलवार सांगितले. नियमितपणे, शेतात उत्स्फूर्तपणे राबणारे व प्रत्येक झाडाशी संपर्क ठेवणारे तरुण लोकप्रतिनिधी राजापूर पंचायत समिती सदस्य श्री. अभिजित तेली व्यासपीठावरून बोलताना म्हणाले, मी शेतीचा व शेतीत मेहनत करणारा भोक्ता आहे. मुंबईतील पंधरा हजारापेक्षा शेतीतील पाच हजार रू. मला समाधान देतात. झाडांच्या सहवासात मला आनंद मिळतो. झाडाजवळ गेलो की ती माझ्याशी बोलतात असे वाटते. मी एम.कॉम. असून माझी आई शिक्षिका आहे. माझी आई तिच्यापुढील विद्यार्थ्यांची आदर्श आहे तर मी शेतीनिष्ठ तरूण पिढीचा आदर्श व्हावे असे मला वाटते.

व्याख्याते अनिल कावतकर यांनी आपल्या अभ्यासपूर्ण व्याख्यानातून कै. वसंतराव नाईकांनी राज्याचे मुख्यमंत्री असताना अन्नान्न दशा बदलण्यासाठी हरितक्रांती घडवली. त्यासाठी केवळ व्यवस्था पणाला न लावता स्वतः चा प्राणही पणाला लावला होता, असे मंथन केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, जिल्हा समिती रत्नागिरीचे सदस्य तथा ओणी हायस्कूलचे माजी मुख्याध्यापक मा. श्री. शहाजीराव खानविलकर यांनी कार्यक्रमाचे उत्तमरित्या आयोजन केले. कार्यक्रमाला बहुसंख्य शेतकऱ्यांची उपस्थिती लाभली.

ब) महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री मा. श्री. अजितदादा पवार व मा. श्री. सुनिल तटकरे यांनी दि. १ जुलै २०१७ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, कोकण विभागीय केंद्राला सदिच्छा भेट दिली. हरितक्रांतीचे प्रणेते स्व. वसंत राव नाईक यांची जयंती 'कृषी दिन' म्हणून साजरी केली जाते. कृषी दिनाचे औचित्य साधून दि. १ जुलै कृषि दिनानिमित्त मा. श्री. अजितदादा पवार यांचे हस्ते स्व. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी विभागीय समिती अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये, जिल्हा समिती सदस्य मा.डॉ. अनिल जोशी, श्रीम. प्राची शिंदे, श्री. अविनाश काळे व इतर मान्यवर उपस्थित होते.

क) यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र कोकण– जिल्हा पालघर व ग्रामीण शिक्षण संस्था उमरोळी यांच्या संयुक्त विद्यमाने पडघे येथील तु. ल. पाटील आश्रमशाळेच्या आवारात नारळ, आंबा, जांभूळ रोपांची लागवड करण्यात आली. यावेळी विभागीय समिती पालघरचे सदस्य, श्री. प्रल्हाद कदम, संस्थेचे अध्यक्ष अनिल तरे, दामिनी राऊत, शशिकांत गावड, प्रमिला पाटील, मुख्याध्यापक शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

श्री. प्रल्हाद कदम यांनी स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना सांगून प्रतिष्ठानच्यावतीने घेण्यात येणाऱ्या सर्व स्पर्धांमध्ये सहभाग घेण्याविषयी आवाहन केले.

फिनोलेक्स इंडिया रनपार, रत्नागिरीचेवतीने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, कोकण विभागीय केंद्राला दि. १२ जुलै २०१७ रोजी ७०० रोपे मोफत देण्यात आली. या रोपापैकी ५०० रोपे राजापूर तालुक्याला व २०० रोपे लांजा तालुक्याला देण्यात आली.

दि. १६ जुलै २०१७ रोजी रत्नागिरी कृषि प्रक्रिया सहकारी संस्था मर्या. गवाणे येथे २०० रोपांची लागवड करण्यात आली. यावेळी कारखाना परिसरामध्ये जांभूळ, बदाम, गुलमोहर, सुरू, अशोक, सोनचाफा इ. प्रकारच्या २०० रोपांची लागवड करण्यात आली. कारखान्यातील प्रत्येक कामगाराने एक झाड लावून त्याची योग्य वाढ होईपर्यंत निगा राखण्याची ग्वाही दिली. फिनोलेक्स कंपनीचे माजी जनसंपर्क अधिकारी मा. श्री.

अशोक तातुगडे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष जयवंत विचारे, उपाध्यक्ष अशोक बोरकर, संचालक सुरेंद्र खानविलकर, सचिव निलेश पवार, व्यवस्थापिका सानिका जेधे, संतोष बेर्डे, संगिता जोशी, सुवर्णा साळवी, लांजा रत्नागिरी काजू क्लस्टरचे संचालक अनिल जाधव यांसह अन्य कर्मचारी उपस्थित होते.

प्रतिक सेवा मंडळ, पालघर संचलित कर्णबधिर शाळेत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई कोकण विभागीय केंद्राचे वतीने दि. २ जुलै २०१७ रोजी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी विभागीय समिती पालघरचे सदस्य श्री. प्रल्हाद कदम, श्री. अनिल ताहाराबादकर, श्री. पी. एम. पाटील व संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

**शिक्षक दिन कार्यक्रम : सप्टेंबर २०१७ :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, कोकण विभागीय केंद्र – रत्नागिरी व लायनेस क्लब, रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने ५ सप्टेंबर 'शिक्षक दिना' चे औचित्य साधून दि. ११ सप्टेंबर २०१७ रोजी 'शिक्षक दिन' कार्यक्रम महालक्ष्मी माध्यमिक विद्यालय, खेडशी, ता.जि. रत्नागिरी येथे सकाळी १०.०० वा संपन्न झाला.

समाजामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अंगणवाडी, प्राथमिक, माध्यमिक व संगणक क्षेत्रातील निवडक चार शिक्षकांचा यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला कोकण विभागीय समितीचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये, उपाध्यक्ष मा.डॉ. श्रीरंग कद्रेकर, कोकण विभागीय समिती सदस्य श्री. चंद्रमोहन देसाई, श्रीमती जानकी बेलोसे, रत्नागिरी जिल्हाध्यक्ष श्री.कृ.आ.पाटील, सदस्या सौ. युगंधरा राजेशिर्के, श्री. विवेक सावंत, श्री. शहाजीराव खानविलकर, लायनेस क्लब, रत्नागिरी च्या अध्यक्षा तथा जिल्हा समिती सदस्या श्रीमती प्राची शिंदे, वक्ते श्री. युयुत्सू आर्ते, श्री. किशोर पाटकर, श्री. विनायक हातखंबकर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या शुभहस्ते प्रतिमापूजन व दीपपूजनाने करण्यात आली. सौ. वैजयंती पाटील यांनी ईशस्तवन केले. उपस्थित मान्यवरांचे पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

जिल्हाध्यक्ष मा.श्री. कृ. आ. पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यामध्ये त्यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्यावतीने कोकण विभागात होत असलेल्या कार्यक्रमांची माहिती दिली.

समाजामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अंगणवाडी सेविका सौ. स्मिता गजानन बने (सह्याद्री नगर, नाचणे), प्राथमिक विभागातून श्री. सुरेंद्र जयवंत हातिसकर (केंद्रशाळा, निवेंडी), माध्यमिक स्तरावर श्री. बळवंत ज्ञानू देशमुख (सावित्रीबाई फुले महिला विद्यालय, देवरूख) व संगणक क्षेत्रातील एम.के.सी.एल. रत्नागिरी जिल्हा अध्यक्ष श्री. संतोष कोलते या निवडक चार शिक्षकांचा यावेळी विशेष पुरस्कार देवून सत्कार करण्यात आला. शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, पुष्प, ग्रंथभेट –ज्ञानेश्वरी, यशवंत स्मृतिसुगंध असे पुरस्काराचे स्वरूप होते.

पुरस्कारप्राप्त शिक्षकांपैकी श्री. बळवंत देशमुख व श्री. संतोष कोलते यांनी मनोगतामध्ये प्रतिष्ठानचे आभार मानले. व्याख्याते श्री. युयुत्सू आर्ते यांनी साने गुरूजींसारखा एक शिक्षक न्यायासाठी, स्वातंत्र्यासाठी देश पेटवू शकतो हे शिक्षकांनी नजरेसमोर ठेवावे. पुरस्कार मिळाला म्हणून न थांबता अधिक उत्साहाने भावी पिढी चांगली घडावी यादृष्टीने विद्यार्थ्यांना शिकवावे असे प्रतिपादन केले. कोकण विभागाचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये यांनी पुरस्कारप्राप्त शिक्षकांचे अभिनंदन करून यापुढेही असेच कार्य करीत रहा, असे सांगितले. विद्यार्थ्यांनी केवळ इंजिनीअर, डॉक्टर या क्षेत्राकडेच न वळता इतरही क्षेत्रांमध्ये प्रावीण्य मिळवावे. कोणतेही क्षेत्र निवडा व त्यात झोकून काम करा. परमेश्वर आपल्या कामाची नोंद घेत असतो, असे विभागीय समितीचे उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर यांनी सांगितले.

कार्यक्रमाला कोकण विभागीय समितीचे सदस्य श्री. चंद्रमोहन देसाई, श्रीमती जानकी बेलोसे, रत्नागिरी जिल्हाध्यक्ष श्री. कृ. आ. पाटील, सदस्या सौ. युगंधरा राजेशिर्के, श्री. विवेक सावंत, श्री. शहाजीराव खानविलकर, लायनेस क्लब, रत्नागिरीच्या अध्यक्षा तथा जिल्हा समिती सदस्या श्रीमती प्राची शिंदे, सुईदा बाग, स्वाती सोनार, वक्ते श्री. युयुत्सू आर्ते, श्री. किशोर पाटकर, श्री. विनायक हातखंबकर, श्री. सुभाष पाटील, श्रीमती मीना रेडीज आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री.कृ. आ. पाटील यांनी केले तर सूत्रसंचालन श्री. चंद्रमोहन देसाई यांनी केले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्यावतीने महालक्ष्मी माध्यमिक विद्यालय, खेडशी शाळेला यशवंतराव चव्हाण यांच्या 'सह्याद्रीचा सुपुत्र' या पुस्तकाच्या ५० प्रती भेट म्हणून देण्यात

आल्या. कार्यक्रमाला बहुसंख्य शिक्षक उपस्थित होते.

**ज्येष्ठ नागरिक दिन कार्यक्रम : ऑक्टोबर २०१६ :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, कोकण विभागीय केंद्र व ज्येष्ठ नागरिक संघ देवरूख यांच्या संयुक्त विद्यमाने १ ऑक्टोबर 'ज्येष्ठ नागरिक दिन' कार्यक्रम नक्षत्र मंगल कार्यालय, देवरूख येथे सायंकाळी ४ वाजता संपन्न झाला. यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई कोकण विभागीय केंद्र जिल्हा समिती रत्नागिरीचे अध्यक्ष मा.श्री.कृ. आ.पाटील, माजी जिल्हाधिकाक्षा सौ. युगंधरा राजेशिर्के, ज्येष्ठ नागरिक संघ देवरूखचे अध्यक्ष श्री. प्रकाश घस्ते, उपाध्यक्ष श्री. शरद भोंगरे, देवरूखचे सबइन्स्पेक्टर श्री. पाटील, श्री. युयुत्सू आर्ते, श्री. प्रमोद हर्डीकर व बहुसंख्येने ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

देवरूख येथील ज्येष्ठ नागरिक संघ ज्येष्ठासांठी वर्षभर विविध कार्यक्रम राबवित असतात. हा संघ तालुक्यामध्ये होणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये सहभागी होत असतो. संघाच्या यशस्वी वाटचालीबद्दल यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्यावतीने संघाचे अध्यक्ष श्री. प्रकाश घस्ते व उपाध्यक्ष श्री. शरद भोंगरे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला व संघाला शुभेच्छा देण्यात आल्या.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती जिल्हाध्यक्ष श्री. कृ. आ. पाटील यांनी यावेळी दिली.

## वाङ्मयाचे सामर्थ्य

भक्ती आणि बुद्धी हे महाराष्ट्राच्या सामर्थ्याचे दोन पंख आहेत. आजच्या गतिमान व प्रगतिमान जगात अनेक समस्या आहेत. आमच्या देशात सुप्त सामर्थ्य फार मोठी आहेत; पण अडचणीही तेवढ्याच आहेत. या अडचणी दूर करण्यात आणि माणसामाणसांतील सहकार्य व स्नेह वाढविण्यात आपण लेखकांनी हातभार लावला पाहिजे. वाङ्मय सहेतुक असावे की नाही, त्यात बोध असावा की नाही या वादात मी पडत नाही. पण एवढे मात्र म्हणेन, वाङ्मयाने माणसाचा हृदयविस्तार झाला पाहिजे.

– मा. यशवंतराव चव्हाण

# विभागीय केंद्र, औरंगाबाद

## कार्यवृत्त

**चित्रपट चावडीत 'लेथ जोशी', मराठी चित्रपटाचे प्रदर्शन : शनिवार, दि. ८ जुलै २०१७ :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र औरंगाबाद, एमजीएम जनसंवाद व वृत्तविद्या महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने व 'आयटक'च्या सहकार्याने चित्रपट चावडी उपक्रमात शनिवार, दि. ८ जुलै २०१७ रोजी सायं. ५.३० वाजता रुक्मिणी सभागृह, एमजीएम परिसर, औरंगाबाद येथे मंगेश जोशी दिग्दर्शित मराठी चित्रपट 'लेथ जोशी' दाखविण्यात आला.

पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात 'संत तुकाराम सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय मराठी चित्रपट पुरस्कार' पटकावून 'लेथ जोशी' चित्रपट चर्चेत आला. मंगेश जोशी दिग्दर्शित या चित्रपटात बदलत्या काळाचा वेध घेतला आहे. यांत्रिकीकरणात संपलेल्या तंत्राची कथा विजय जोशी या श्रमिकाच्या माध्यमातून उलगडते. यांत्रिकीकरण स्वीकारल्यानंतर बाद झालेल्या मशीनसोबतच जोशीचे कौशल्यासुद्धा बाद ठरते. लेथ मशीन विकत घेऊन काम करण्याचे प्रयत्न अयशस्वी ठरतात. अखेरीस बाजूला पडलेला जोशी प्रेक्षकांना अंतर्मुख करतो, चित्रपटात चित्तरंजन गिरी, अश्विनी गिरी, सेवा चौहान आणि ओम भूतकर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. कारखान्यात लेथ यंत्र बाद होऊन यांत्रिकीकरण आले. ३५ वर्षे लेथवर काम करणाऱ्या विजय जोशीचा रोजगार जातो. पुन्हा मशीन घेऊन काम करण्याची त्याची उमेद कायम असते. मात्र, बदलत्या काळात भंगारात जमा झालेल्या मशीनसोबतच त्याचे कौशल्यासुद्धा जमा होते. एका कामगाराची शोकांतिका प्रभावीपणे दाखविणारा 'लेथ जोशी' चित्रपट रसिकांना अंतर्मुख करणारा ठरला.

चित्रपट प्रदर्शनानंतर दिग्दर्शक मंगेश जोशी आणि सिनेमॅटोग्राफर सत्यजित शोभा श्रीराम यांनी प्रेक्षकांशी संवाद साधला. 'यांत्रिकीकरणात झपाट्याने बदलत असलेली परिस्थिती चित्रपटात टिपली आहे. या विषयाला अनेक कंगोरे आहेत, मात्र चित्रपटाच्या वेळेची मर्यादा लक्षात घेता फक्त वस्तुस्थिती सांगितली', असे जोशी म्हणाले. ते पुढे म्हणाले, 'हा व्यावसायिक चित्रपट नाही. मार्केटिंगसाठी बजेट नसल्यामुळे लोकांपर्यंत स्वतःच घेऊन चाललो आहे.' या चित्रपटाच्या छायांकनासाठी सत्यजित शोभा श्रीराम यांना 'पीफ' मध्ये 'सर्वोत्कृष्ट छायांकना'चा पुरस्कार मिळाला आहे. यावेळी चित्रपटातील कलाकारांसाठी प्रोत्साहन निधीही जमा करण्यात आला.

एमजीएमचे विश्वस्त अंकुशराव कदम यांनी मंगेश जोशी व सत्यजित श्रीराम यांचा सत्कार केला. यावेळी कामगार नेते डॉ. भालचंद्र कांगो, प्रा. जयदेव डोळे, निलेश राऊत आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सुबोध जाधव, त्रिशुल कुलकर्णी, श्रीकांत देशपांडे, मंगेश निरंतर, निखिल भालेराव, महेश अचिंतलवार यांनी सहकार्य केले. चित्रपटाला रसिकांनी गर्दी केली होती.

**'शेतकऱ्यांची आंदोलनं आत्ताच का?'**
**या विषयावर सुनिल तांबे यांचे व्याख्यान : बुधवार, दि. १२ जुलै २०१७ :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, केंद्र औरंगाबाद व एमजीएम जनसंवाद व वृत्तपत्र महाविद्यालयाच्या वतीने बुधवार, दि. १२ जुलै २०१७ रोजी सुनिल तांबे यांचे 'शेतकऱ्यांची आंदोलने आत्ताच का?' या विषयावर विशेष व्याख्यान आईनस्टाईन सभागृह, एमजीएम परिसर औरंगाबाद येथे झाले. या कार्यक्रमास एमजीएमचे सचिव मा. अंकुशराव कदम, जयदेव डोळे, सुभाष लोमटे, निलेश राऊत, प्राचार्य डॉ. रेखा शेळके, अण्णा खंदारे, श्री. पालिमकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

'देशात १९८८ ते २०१७ या काळात दहशतवादी हल्ल्यात मृत्यू झालेल्यांची संख्या ही ४४ हजार ३०७ आहे. याच तुलनेत एकट्या २०१५ या वर्षात देशात दीड लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. भाव, मार्केट, ट्रेड हे शेतकऱ्यांच्या धोरणाविरुद्ध जात असल्यामुळे आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे. दहशतवादाप्रमाणे देशात शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या हाही मुद्दा महत्त्वाचा बनला आहे,' असे प्रतिपादन शेती प्रश्नाचे अभ्यासक सुनिल तांबे यांनी केले.

श्री. तांबे म्हणाले, '२०१४ च्या दुष्काळानंतर शेतीमालाचे भाव कमी झाले. त्यानंतर नोटबंदीचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसला. रोखीने होणारे व्यवहार बंद झाल्यामुळे शेतमालाचा भाव घसरला. यानंतर तुरीचे विक्रमी उत्पन्न मिळाल्यानंतर निर्यात खुली केली नाही अन् आयातीला बंदी घातली नसल्यामुळे गोंधळ निर्माण झाला. सरकारतर्फे शेतीविषयीचे

धोरण योग्य नसल्यामुळे भाव मिळत नाही. परिणामी आत्महत्या वाढत आहेत. पंजाबमध्ये ९८ टक्के सिंचन असूनही तेथील शेतकरी आत्महत्या करू लागला आहे. शेतीमध्ये जसजसे आधुनिक तंत्रज्ञान येऊ लागले, तसतसे शेतकऱ्यांचे शेतीचे नियंत्रण कमी होत आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे भविष्यात शेतकरी विनाशेती होणार आहेत. नॅशनल सॅम्पल सर्व्हेच्या अहवालानुसार शेतकऱ्यांची वार्षिक मिळकत ७७ हजार ११२ रुपये आहे. या उत्पन्नात दुप्पट वाढ करण्यासाठी अजून २० वर्षे लागणार आहेत. शेतीचा वाढीचा दर साडेतीन ते चार टक्के. हा दर १०.४५ टक्के झाल्यावर हे उत्पन्न दुप्पट होईल. यासाठी सिंचनावर तीन लाख कोटी रुपये खर्च करावे लागतील. देशातील ६० टक्के जमीन कोरडवाहू आहे. भाव, मार्केट, ट्रेड लक्षात घेऊन, धोरणात्मकदृष्ट्या शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवत सामूहिक शेती वाढविणे गरजेचे आहे.'

झारखंड, आसाम, बिहार ही राज्ये गरीब आहेत. तेथे शेतकरी आत्महत्या होत नाहीत. कारण ते गरजेपुरतेच पिकवतात व जगतात. पंजाबमध्ये ९९ टक्के सिंचन व्यवस्था आहे. तरी शेतीमालाला बाजारभाव नसल्याने शेतकरी आत्महत्या होत आहेत. महाराष्ट्रात हीच स्थिती आहे. बियाणे, खते, पेरणी, कीटकनाशके, काढणी, विक्री करेपर्यंत पैसे मोजावे लागतात. त्या तुलनेत मिळकत नाही. अनेक वर्षांपासून हा प्रश्न दुर्लक्षित असून शेतकरी आंदोलने हा त्याचाच परिपाक आहे, असे तांबे म्हणाले.

ही स्थिती बदलण्यासाठी शेतकऱ्यांनी एकत्र येणे गरजेचे आहे. सामूहिक शेतीच्या माध्यमातून लागवड ते विक्री व्यवस्थापन केले तर नुकसान टाळून जास्त फायदा मिळवणे शक्य आहे. त्यामुळे सामूहिक शेतीला प्राधान्य द्यावे, नवनवीन तंत्रज्ञान अंगीकारवे, शेतीपूरक प्रक्रिया उद्योगांकडे वळावे, असे आवाहन तांबे यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नीलेश राऊत यांनी तर दीपक पवार यांनी आभार मानले.

**'जीएसटीः एक अनुत्तरीत प्रश्न' या विषयावर व्याख्यान : शनिवार, दि. ५ ऑगस्ट २०१७ :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र औरंगाबाद व एमजीएम जनसंवाद व वृत्तपत्र संवाद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'जीएसटीः काही अनुत्तरीत प्रश्न' या विषयावर शनिवार, दि. ५ ऑगस्ट २०१७ रोजी स. १०.३० वा. आईनस्टाईन सभागृह, जेएनईसी महाविद्यालय, एमजीएम परिसर, औरंगाबाद येथे विशेष व्याख्यान संपन्न झाले. व्याख्यानाकरिता वक्ते म्हणून मुंबईतील प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ तथा सी. ए. अजित जोशी यांना निमंत्रित केले होते.

यावेळी एमजीएमचे विश्वस्त प्राचार्य प्रतापराव बोराडे, सुहास तेंडुलकर, रेखा शेळके, निलेश राऊत, रेणुका कड, सुबोध जाधव यांच्यासह उद्योजक, व्यापारी, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीकांत देशपांडे यांनी केले, आभार गणेश घुले यांनी मानले.

''वस्तू व सेवाकर (जीएसटी) कायद्याइतका ढिसाळ व नियोजनशून्य कायदा यापूर्वी देशात कधीही लागू करण्यात आला नाही. सामान्य जनता व उद्योजकांना जाचक ठरणाऱ्या या कायद्याला 'स्वातंत्र्यानंतरची दुसरी पहाट' म्हणणे अतिशयोक्ती ठरेल,'' अशी परखड टीका सी.ए. अजित जोशी यांनी यावेळी व्यक्त केली. ते पुढे म्हणाले, ''भारतासारख्या विशाल देशामध्ये नवा बदल करण्यापूर्वी काटेकोर नियोजन गरजेचे असताना तडकाफडकी निर्णय घेऊन सरकारने देशाच्या अर्थव्यवस्थेलाच हादरा दिला. जीएसटी लागू करण्यापूर्वी फक्त सव्वा महिना आधीपासून सरकारने माहिती देणे सुरू केले. अगदी शेवटच्या दिवसापर्यंत किंबहुना आजही पूर्ण चित्र स्पष्ट नाही. मुळात सरकारला इतकी घिसाडघाई करण्याची गरजच काय?'' नव्या करप्रणालीतील विसंगती व दोष दाखवून देत हा कायदा लघु व मध्यम उद्योजकांसाठी कसा मारक आहे, हे त्यांनी उलगडून सांगितले. ते म्हणाले, 'जीएसटी' मध्ये करमुक्त व करपात्र उत्पन्नांमध्ये फरक केला जात नसल्यामुळे २० लाखांची मर्यादा कुचकामी ठरेल. 'रिव्हर्स चार्ज मेकॅनिझम' सारख्या (आरसीएम) तरतुदींमुळे खेळत्या भांडवलास खीळ बसेल. शिवाय महिन्यातून तीन व वर्षभरातून ३७ प्राप्तीकर विवरण पत्रे भरण्याची सक्ती, अशा अनेक बाबींमुळे नुकसान केवळ छोट्या उद्योजकांचे होणार आहे. वस्त्रोद्योगाची वाताहत याचे ठळक उदाहरण आहे. देशामध्ये दिवसभरात ३४० कोटी विक्री बिले तयार होतात. एवढा सगळा डेटा हाताळण्यासाठी तांत्रिक बाजू भक्कम नाही. जीएसटीचे सॉफ्टवेअर व सर्व्हर विकसित करण्यात खासगी कंपन्यांचा सहभाग, ही चिंतेची बाब असल्याचे ते म्हणाले.

भारतात जीएसटी कायदा लागू केला तेव्हा नोटबंदीमुळे वित्तीय संकट देशात होते, लघुउद्योग बंद पडल्याने लाखोंच्या संख्येने लोक बरोजगार झाले होते. तेव्हा सरकारने जीएसटी लागू करण्याची घाई का केली, हा प्रश्न अनुत्तरित असताना देशात जीएसटी लागू केल्यामुळे येत्या काही काळात भारत आर्थिक मंदीत लोटला जाण्याची भीती जोशी

यांनी या वेळी व्यक्त केली.

सगळे छोटे व्यापारी चोर आणि करबुडवे आहेत, असा पूर्वग्रह मनात ठेवूनच केंद्राने हा कायदा लागू केला. प्रशासनातील उचपदस्थांना सामान्यांवर विश्वास नाही. पुन्हा एकदा 'इन्स्पेक्टर राज' येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नोकरशाहीचे वर्चस्व व भ्रष्टाचाराला यामुळे वाव मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे प्रतिपादनही जोशी यांनी यावेळी व्यक्त केले.

**युवा स्वतंत्रता ज्योत रॅली : सोमवार, १४ ऑगस्ट २०१७ :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई–विभागीय केंद्र औरंगाबाद व नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे युवकांमध्ये राष्ट्रभावना जागृत व्हावी या उद्देशाने शहरात 'युवा स्वातंत्र्य ज्योत रॅली'चे आयोजन स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला सोमवार, १४ ऑगस्ट २०१७ रोजी करण्यात आले होते. या रॅलीचे हे दहावे वर्ष असून रॅलीचे उद्घाटन औरंगाबाद शहरचे पोलिस उपायुक्त मा. राहुल श्रीरामे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पोलिस निरीक्षक मा. अनिल आडे हे उपस्थित होते. यावेळी युवकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

ही रॅली क्रांती चौक ते पैठण गेट या मार्गावर काढण्यात आली. यामध्ये स्थानिक संस्था, संघटना, राजकीय पक्ष, स्वातंत्र्य सैनिक, प्रशासकीय अधिकारी, ज्येष्ठ नागरिक तसेच महाविद्यालयीन युवक – युवती, शालेय विद्यार्थी यांचा समावेश होता. रॅलीमध्ये युवकांनी पेटती मशाल हातात घेऊन ''भारत माता की जय'', ''वंदे मातरम्'', ''जय जवान जय किसान'' आदी घोषणांनी शहर दणाणून सोडले. रॅली अतिशय शिस्तबद्ध रीतीने संपन्न झाली. ''वंदे मातरम्'' या देशभक्तीपर गीताने रॅलीची सांगता करण्यात आली.

यावेळी निलेश राऊत, सुहास तेंडूलकर, सुबोध जाधव, श्रीकांत देशपांडे, मंगेश निरंतर, गणेश घुले, प्रवीण देशमुख, महेश अचिंतलवार, दीपक जाधव, प्रतीक राऊत, अक्षय गोरे, सिद्धांत जाधव, सारंग बोराडे, दिनेश वंजारे, ऋषी खंडाळे, विजय मगरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

**'सिंहासन', शनिवार, दि. २६ ऑगस्ट २०१७ :**

महाराष्ट्रातील सत्ता संघर्ष आधोरेखीत करणारा 'सिंहासन' चित्रपट ४० वर्षानंतरही हाऊसफुल्ल झाला. चित्रपट चावडी उपक्रमात शनिवारी, आईनस्टाईन हॉलमध्ये हा चित्रपट दाखविण्यात आला. डॉ. जब्बार पटेल दिग्दर्शित 'सिंहासन' चित्रपट नावाजलेल्या अभिनेत्यांच्या हुकमी अभिनयासाठी प्रसिद्ध आहे.

चोखंदळ रसिकांना जगभरातील आशयसंपन्न चित्रपट दाखविणाऱ्या 'चित्रपट चावडी' उपक्रमाला चार वर्षे पूर्ण झाली आहेत. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई–विभागीय केंद्र औरंगाबाद व एमजीएम पत्रकारिता महाविद्यालय यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात येतो. प्रत्येक महिन्याला एक दर्जेदार चित्रपट दाखवून त्याच्यावर सविस्तर चर्चा करणारा हा उपक्रम आहे. इराण, इराक, जपान, इंग्लंड, अमेरिका हा देशांसह भारतातील प्रसिद्ध प्रादेशिक चित्रपट चावडी उपक्रमात दाखविण्यात येतात. डॉ. जब्बार पटेल दिग्दर्शित 'सिंहासन' चित्रपट शनिवारी, दि. २६ ऑगस्ट २०१७ रोजी सायं. ५ वाजता वाजता दाखविण्यात आला. चाळीस वर्षांपूर्वी प्रदर्शित 'सिंहासन' हा स्वतंत्र ठसा उमटवलेला राजकीय पट आहे.

विजय तेंडुलकर यांचे प्रभावी संवाद लेखन आणि सत्ता संघर्षातील डावपेच चित्रपटाचे बलस्थान आहे. या चित्रपटात अरुन सरनाईक, डॉ. श्रीराम लागू, निळू फुले, दत्ता भट, सतीष दुभाषी, नाना पाटेकर, डॉ. मोहन आगाशे, मधुकर तोरडमल असे लोकप्रिय कलाकार आहेत. आपल्या विरोधात कट शिजत असल्याचा निनावी संदेश फोनवर मिळताच अस्वस्थ झालेले मुख्यमंत्री आणि राजकीय डावपेचांना आलेला वेग चित्रपटात अत्यंत प्रभावीपणे दाखविण्यात आहे. दिगू टिपणीस (निळू फुले) या पत्रकाराच्या नरजेतून चित्रपट सरकतो. कामगार नेते सत्ताधारी आणि सामान्य यांचे वास्तव पाहून प्रेक्षक अंतर्मुख झाले. 'उषःकाल होता होता काळरात्र झाली...' या गीताने चित्रपटाचा आशय आणखी गडद केला.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रतिष्ठानच्या औरंगाबाद केंद्राचे सुबोध जाधव, श्रीकांत देशपांडे यांनी परिश्रम घेतले. यावेळी रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'सिंहासन' चित्रपटाच्या लोकप्रियतेचा प्रत्यय चित्रपट चावडी उपक्रमामुळे पुन्हा आला. वेगवेगळ्या वयोगटातील प्रेक्षक आवर्जून उपस्थित होते. रसिकांनी चित्रपटाच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. आपण हा चित्रपट कोणत्या चित्रपटगृहात पाहिला होता हे सांगत त्याचे वैशिष्ट्य सांगितले. पहिल्यांदाच हा चित्रपट पाहिलेल्या तरूण प्रेक्षकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

**'एकल' महिला व पाणी प्रश्न', शनिवार, दि. ९ सप्टेंबर २०१७ :**

एरवी महिला कुणाची तरी बायको, आई किंवा बहीण असेल, पण हक्कांचा मुद्दा पुढे आला, तर सर्व महिला एकल आहेत. असे प्रतिपादन 'ॲक्शन एड'च्या राज्यप्रमुख नीरजा भटनागर यांनी शनिवारी (ता. नऊ) केले. दक्षिण अमेरिकेत गृहिणींना कामगाराचा दर्जा दिला आहे. आपल्याकडे मात्र शेतीत अहोरात्र खपणाऱ्या महिलांना आपण शेतकरी मानायला तयार नाही, ही वस्तुस्थिती असल्याचे त्या म्हणाल्या.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई – विभागीय केंद्र औरंगाबाद व विकास अध्ययन केंद्र, मुंबई यांच्या वतीने लोकसंवाद उपक्रमाअंतर्गत 'एकल महिला व पाणीप्रश्न' या विषयावर शनिवार, दि ९ सप्टेंबर २०१७ रोजी परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. मराठवाडा महसूल प्रशिक्षण प्रबोधिनीच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात मंचावर 'ॲक्शन एड'च्या राज्यप्रमुख नीरजा भटनागर, पत्रकार दिप्ती राऊत, स्त्री अभ्यासक डॉ. वृषाली किन्हाळकर, रेणुका कड, सुरेश शेळके, निलेश राऊत, सुहास तेंडुलकर आणि सुबोध जाधव उपस्थित होते. धनश्री जोशी यांनी गायलेल्या सावित्रीच्या ओव्यांनी कार्यक्रमाची सुरुवात झाली. निलेश राऊत यांनी प्रास्ताविक केले.

रेणुका कड यांनी या विषयावरील आपल्या दोन वर्षांच्या अभ्यासादरम्यान आलेले अनुभव कथन केले. महिलांची सामाजिक स्थिती, बदलत्या समाजकारण, राजकारण आणि वातावरणाचा स्त्रियांच्या जीवनमानावर, आरोग्यावर होणारा परिणाम, पिण्याच्या पाण्यासाठीचा संघर्ष यासोबतच वृद्ध–विधवा, बालविवाह, आर्थिक शोषण अशा अनेक स्तरांवर प्रत्यक्ष जाऊन अभ्यास केल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या अभ्यास अहवालाचे यावेळी प्रकाशन झाले.

''अंतराळात गेली तर किंवा बलात्कार झाला तरच स्त्रीला वृत्तपत्रांतील पहिल्या पानावर जागा मिळते, असा सार्वत्रिक अनुभव आहे. महिलांना स्थानच नाही, कारण तिचे प्राधान्य आपल्या मनातच नाही. सर्वसाधारण महिलेचे असे असेल, तर एकल महिलांचे प्रश्न आज खूपच दुर्लक्षित आहेत,'' असे सांगत दिप्ती राऊत यांनी दुष्काळी दौऱ्यात महिलांचे पाहिलेले चित्र सांगितले. दुष्काळात टँकरमधून हंडाभर पाणी मिळण्यासाठीही कुणाच्या तरी दयेवर अवलंबून राहावे लागते, अशा विधवा, परित्यक्तांच्या होरपळीकडे कुणी पाहिलेच नाही, असा तक्रारवजा सूर त्यांनी लावला. १९९४ ला औरंगाबादेत परित्यक्ता हक्क परिषद झाली होती. त्याच मागण्या आजही कायम आहेत. आता या चर्चसत्राच्या माध्यमातून त्यावर सकारात्मक काम व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी प्राचार्य रा. रं. बोराडे, 'लोकपंचायत' चे अध्यक्ष पद्मभूषण देशपांडे, प्रिया धारूरकर यांच्यासह अनेक मान्यवर, अभ्यासक आणि विद्यार्थी उपस्थित होते. गणेश घुले यांनी सूत्रसंचालन केले. मयुरेश देशपांडे यांनी आभार मानले.

डॉ. किन्हाळकर यांनी आपल्या भाषणात समाजाच्या स्त्रियांकडे बघण्याच्या दृष्टिकोनावर कोरडे ओढले. ''एखादी मुलगी, स्त्री कुण्या पुरुषाशी बोलू लागली, तरी लोकांच्या भुवया उंचावतात. महिलांबद्दल शेरेबाजी करणाऱ्यांत महिलाच आघाडीवर असतात. सार्वजनिक ठिकाणी काम करणाऱ्या महिलांना कायम असा अनुभव येतो. ही मानसिकता बदलली पाहिजे,'' असे त्यांनी आवर्जून सांगितले.

**लघुपट निर्मिती कार्यशाळा : गुरुवार, दि. २८ सप्टेंबर २०१७ :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई–विभागीय केंद्र औरंगाबाद व नव महाराष्ट्र युवा अभियान व प्रयोग मालाड यांच्या संयुक्त विद्यमाने 'फिल्मिन्गो आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सवा'च्या निमित्ताने राज्यात नऊ ठिकाणी लघुपट निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यापैकी चौथी कार्यशाळा गुरुवार, दि. २८ सप्टेंबर २०१७ रोजी एमजीएम पत्रकरिता महाविद्यालय, औरंगाबाद येथे यशस्वीरित्या पार पडली.

प्रसिद्ध समीक्षक–लेखक–दिग्दर्शक अशोक राणे, प्रसिद्ध दिग्दर्शक शिव कदम यांनी उपस्थितांशी संवाद साधत मार्गदर्शन केले. यावेळी कार्यशाळेत लघुपटांची आवड असलेले १२४ कलाकार व विद्यार्थी सहभागी झाले होते. या कार्यशाळेत लघुपट म्हणजे नेमकं काय, लघुपट निर्मितीची इतर अंगे या प्रमुख विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच लघुपट म्हणजे पूर्ण लांबीच्या चित्रपटाचे लघुरूप नव्हे, हे स्पष्ट केले. तसेच देशविदेशातील लघुपट दाखवून व व्याख्यानाद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. भारतात जागतिक दर्जाचे लघुपट निर्माण व्हावेत, आणि लघुपटाविषयी लोकांपर्यत माहिती पोहोचावी, हा या कार्यशाळेचा प्रमुख हेतू होता.

कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे जिल्हा संघटक निलेश राऊत यांनी प्रास्ताविक केले. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रेखा शेळके यांनी मान्यवरांचे स्वागत केले. सुबोध जाधव, गणेश घुले, मंगेश निरंतर, श्रीकांत देशपांडे, महेश अचिंतलवार आदींनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

**जागर जाणिवांचा : बुधवार ११ ऑक्टोबर २०१७ :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे खा. सुप्रिया सुळे यांनी राज्यभरात 'युवा संवाद यात्रा' अंतर्गत 'जागर हा जाणिवांचा' हा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमात विविध महाविद्यालयांतील युवकांशी स्त्रीभ्रूणहत्या, हुंडाबळी, युवतींवरील अत्याचार, युवांची व्यसनाधीनता आदी सामाजिक समस्यांवर संवाद साधण्यात येत आहे. बुधवारी, ११ ऑक्टोबर रोजी औरंगाबाद शहरातील देवगिरी महाविद्यालय व सरस्वती भुवन महाविद्यालयात हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी स. भु. शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. दिनकर बोरीकर, 'मशिप्रमं'चे सरचिटणीस आमदार सतीश चव्हाण, विक्रम काळे, भाऊसाहेब पाटील चिकटगावकर, प्राचार्य डॉ. शिवाजीराव थोरे, प्राचार्य जे. एस. खैरनार, प्राचार्य दोडके आदी उपस्थित होते.

या दोन्ही कार्यक्रमात बोलताना खा. सुळे यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना मनमोकळेपणाने उत्तरे दिली. मराठा, मुस्लिम, धनगर आरक्षण, हुंडाबळी, स्त्री अत्याचार, मासिक पाळी, जातीवाद, भेदभाव, राजकारण, अशा असंख्य विषयांना वाचा फोडली. यात उत्तरे देताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, पूर्वीपेक्षा आता जाती, धर्मांची जास्त चर्चा होत आहे. हे चुकीचे आहे. आपण चुकीच्या मार्गाने चाललो आहोत. हा मार्ग बंद करण्यासाठी युवकांनीच पुढे आले पाहिजे. स्वतः पासून प्रत्येक सामाजिक बदलाची सुरुवात केल्यास कोणालाही अडचण येणार नाही. यासाठी प्रत्येकाने किमान स्वतःला बदलण्याची गरज असल्याचेही सुळे यांनी स्पष्ट केले. दोन्ही ठिकाणच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. देवगिरी महाविद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. तर स. भु. महाविद्यालयाचे नाट्यगृहही विद्यार्थ्यांनी खचाखच भरले होते.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी स. भु. महाविद्यालयात प्रतिष्ठानचे निलेश राऊत, सुबोध जाधव, मंगेश निरंतर, गणेश घुले, महेश अचिंतलवार, मयुर देशपांडे, रेणुका कड यांनी परिश्रम घेतले. शेवटी अभ्युदय फाऊंडेशनच्या दिवाळी पहाट कार्यक्रमाच्या पोस्टरचे विमोचन करण्यात आले.

## साहित्य व समाज

साहित्य कोणत्याही रंगाचे असेल तरी चालेल, पण आजूबाजूच्या परिस्थितीचा डोळसपणे अभ्यास करून, समाजात सर्व थरांत निर्माण झालेल्या अस्वस्थतेची जाणीव असणारे समाजचिंतन त्यात असले पाहिजे. आचार्य विनोबा भावे यांनी एकदा म्हटले होते, की लोकशाही हे प्रज्ञेचे राज्य असते. ही प्रज्ञा समाजाभिमुख असली पाहिजे, तरच ती समाजाचे परिवर्तन घडवून आणील, त्याला मार्गदर्शन करीत राहील. बुद्धीची कुवत वाढविणे, मने व्यापक करणे, जगातील नव्या प्रवाहांची समीक्षा करणे, स्वतःच्या संस्कृतीचा व परंपरेचा बुद्धिनिष्ठ अभ्यास करून, नव्या परिस्थितीला सुसंगत अशा मूलभूत परिवर्तनासाठी जनमानसाला तयार करणे ही पुढच्या पिढीतील चिंतनशील साहित्याची उद्दिष्टे असू शकतात.

– मा. यशवंतराव चव्हाण

# विभागीय केंद्र, लातूर

## कार्यवृत्त

**साने गुरूजी स्मृतिदिन : दि. ११ जून २०१७ :**

'आजच्या शिक्षणव्यवस्थेचे स्वरूप' या विषयावर चर्चा आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे नांदेड जिल्हा संघटक मा.श्री.प्रा.उत्तम सूर्यवंशी होते. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते विभागीय केंद्राचे सचिव मा. श्री. हरिभाऊ जवळगे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. याप्रसंगी जवळगे म्हणाले की, आमच्या शालेय जीवनात व आजच्या शालेय जीवनात आमूलाग्र बदल आहे. आमच्या वेळी असे ऑबजेक्टीव प्रश्न वगैरे नव्हते तर सर्व प्रश्नांची उत्तरे अगदी काळजीपूर्वक अभ्यास करून निबंधासारखे सविस्तर लिहावी लागत असे. आता आम्ही साने गुरुजी स्मृतिदिन विभागीय केंद्रांतर्गत येणाऱ्या चार जिल्ह्यांपैकी एका जिल्ह्यात साजरा करून आजच्या तरुण मुलामुलींना त्या जुन्या आठवणी करून देतो.

**राजर्षी शाहु महाराज जयंती : दि. २६ जून २०१७ :**

विभागीय केंद्राच्या वतीने राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. ॲड. मनोहरराव गोमारे यांच्या अध्यक्षतेखाली माजी खासदार, विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. आजच्या शिक्षणक्षेत्रात लातूर पॅटर्न निर्माण करणाऱ्या लातूर येथे चालणाऱ्या राजर्षी शाहू महाविद्यालयाचा पहिला प्राचार्य म्हणून काम करण्याची संधी मला मिळाली. इमारतीचा पाया भक्कम करावयाचा असेल तर अगोदर त्यासाठी खूप कष्ट घ्यावे लागतात. कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. मनोहरराव गोमारे म्हणाले, राजर्षी शाहू महाराज यांचे शिक्षणाबद्दलचे विचार डोळ्यासमोर ठेऊनच आम्ही ज्या भागात शिक्षणाची उणीव आहे, तिथे प्राथमिक शाळेपासून ज्युनिअर कॉलेजपर्यंत शिक्षण चालवतो. शेवटी सर्वांचे आभार विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांनी मानले.

**गुरूपौर्णिमा : दि. ९ जुलै २०१७**

विभागीय केंद्राच्या वतीने कळंब, जि. उस्मानाबाद येथे सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांशी संवाद साधण्यात आला. पूर्वी गुरूजनांबद्दल आम जनतेत मनोमन आदर होता ही बाब आज उरली नाही. त्याची अनेक कारणे आहेत. त्या कारणाचा शोध घेऊन शिक्षक, शिक्षणव्यवस्था आणि आम जनता हे यश मिळवणे गरजेचे आहे, असाच सूर या परिसंवादातून ऐकावयास मिळाला. यावेळी वयोवृद्ध अशा ५ सेवानिवृत्त अध्यापिका व ५ अध्यापक यांचा विभागीय केंद्राच्या वतीने सत्कार करण्यात आला.

**नागपंचमी : गुरूवार दि. २७ जुलै २०१७ :**

नागपंचमीनिमित्त 'सर्पमित्र संघटना' लातूर यांच्याशी विभागीय केंद्राच्या वतीने संवाद साधण्यात येऊन पशुपक्षांबद्दल होत असलेली हेळसांड आणि नैसर्गिकरित्या होत असलेला विनाश याबद्दल चर्चा झाली.

**लो. टिळक पुण्यतिथी, अण्णाभाऊ साठे जयंती : मंगळवार दि. १ ऑगस्ट २०१७ :**

लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना अभिवादन तसेच अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने अणाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. यादिवशी अगदी प्रभातसमयी अण्णाभाऊ साठे यांच्या गंजगोलाईजवळील पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करून अण्णाभाऊ साठे प्रेमिकांच्या उपस्थितीत 'आज अण्णाभाऊ साठे विचाराचा शोध' या विषयावर लातूर येथील मुक्त पत्रकार रामकुमार रायवाडीकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. 'आज साठे यांची विचारधारा लोप पावत आहे. त्याच्या शाहिरीतून सर्वजातीपंथातील विशेषतः तळागाळातील माता-बंधु-भगिनी व तरुण यांच्या कष्टाबद्दल विचार मांडले. पृथ्वी कष्टकऱ्यांच्या माथ्यावरच आहे याचाच सतत विचार अण्णाभाऊ साठे यांनी केला'. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांनी महात्मा फुले, शाहू महाराज, अण्णाभाऊ साठे यांच्या विचाराची आज नितांत गरज असल्याचे नमूद करून, हे विचार आज लोप पावत आहेत याबद्दल खंत व्यक्त केली. जर आपण या विचारापासून दूर गेलो तर आपल्यासमोर वेगळ्याच अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही असेही ते म्हणाले.

**स्वातंत्र्य : मंगळवार दि. १५ ऑगस्ट २०१७ :**

भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त तिरंग्यास अभिवादन करण्यात येऊन शहरातून निघालेल्या सार्वजनिक महारॅलीत सहभाग नोंदविण्यात आला.

**खो-खो स्पर्धा : मंगळवार दि. २२ ऑगस्ट २०१७ :**

मंगरूळ ता. औसा येथे औसा तालुका खो खो स्पर्धेच्या खेळात प्राथमिक माध्यमिक, व उच्च माध्यमिक मुलामुलींना खेळात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देण्याकरिता विभागीय केंद्राने सहभाग नोंदविला. ही स्पर्धा दि. २३,२४ व २६ ऑगस्ट या दिवशी घेण्यात आली. या स्पर्धेच्या उद्‌घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंगरूळ गावचे सरपंच सौ. गितांजली बालाजी जाधव या होत्या. तर उद्‌घाटक म्हणून विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांची उपस्थिती होती. कार्यक्रम समारोपाच्या अध्यक्षस्थानी मंगरूळ येथील शिक्षणप्रेमी व्यंकटराव बिराजदार हे होते, तर प्रमुख पाहुणे ॲड. शिवाजी बिराजदार हे होते.

**मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन : रविवार दि. १७ सप्टेंबर २०१७ :**

आखाडा बाळापूर ता. कळमनुरी जि. हिंगोली येथे मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंगोली जिल्हाप्रमुख प्राचार्य डॉ. गोपाळराव सोंडगे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय केंद्राचे, नांदेड जिल्हा प्रमुख, प्राचार्य डॉ. व्ही. एन. इंगोले याची उपस्थिती लाभली होती. या कार्यक्रमात विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे उपस्थित होते. मराठवाडा मुक्तिसंग्राममध्ये मराठवाड्यातील जे स्वातंत्र्यसैनिक मृत्यू पावले त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. जे स्वातंत्र्यसैनिक हयात आहेत त्यांचा विभागीय केंद्राच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अमोल काळे यांनी केले तर शेवटी सर्वांचे आभार प्रा.डॉ. महादेव मुद्देवाड यांनी मानले.

**किल्लारी श्रद्धांजली : शनिवार दि. ३० सप्टेंबर २०१७ :**

लातूर व उस्मानाबाद या दोन्ही जिल्ह्यांच्या मध्यभागातून वाहणारी तेरणा नदी. या तेरणा नदीच्या परिसरात वसलेली प्रसिद्ध व्यापारी पेठ किल्लारी येथे ३० सप्टेंबर १९९३ ला महाभयंकर भूकंप होऊन या भागातील एकूण ५२ गावे उद्‌ध्वस्त झाली आणि हजारो माताबंधू, वयोवृद्ध माणसे, लहान मुले मुली मृत्यूमुखी पडले. त्या सर्वांना विभागीय केंद्राच्या वतीने सालाबादप्रमाणे यावर्षी पण या भागातील गावात जाऊन ''यशवंत तुमच्या गावी'' या उपक्रमाद्वारे श्रद्धांजली वाहण्यात आली.

## विज्ञाननिष्ठ समाज

विज्ञानसेवेचा किंवा प्रसाराचा विचार करताना माझ्या मते त्याच्या दोन प्रमुख अंगांचा विचार केला पाहिजे. एक तर मानवजातीसमोर आज जी संकटांची परंपरा उभी आहे, ती नाहीशी करण्यासाठी, निसर्गाचे गूढ उकलून, मानवाला जास्तीतजास्त शक्ती प्राप्त करून देणारे संशोधन करणे आणि अशा प्रकारच्या संशोधनास प्रोत्साहन देणे. दुसरे, जे माझ्या मते जास्त व्यापक कार्य आहे, समाजास विज्ञाननिष्ठ बनविणे. हे काम करण्यासाठी मात्र आपणास जास्त कष्ट घ्यावे लागतील, प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागेल. विज्ञानाचे मूळ स्वरूपच तर्कसंगत, बुद्धिसंमत विचार असे आहे. हा विचार जनतेच्या मनात दृढमूल झाल्यावरच आपण एक आधुनिक समाज निर्माण करू शकतो. जुन्या सनातन कल्पना समाजातून काढून टाकण्याचा हाच एक कार्यक्षम उपाय आहे. या दिशेने जितक्या जलद वाटचाल होईल, तितक्या लवकर आपला देश व समाज प्रगतीशील राष्ट्रांच्या मालिकेत जाऊन बसेल.

– मा. यशवंतराव चव्हाण

# विभागीय केंद्र, अहमदनगर

## कार्यवृत्त

**कृषीकट्टा : जून २०१७ :**

सोमवार दि. २६ जून २०१७ रोजी मा.खा.यशवंतरावजी गडाख पाटील व खा. सौ. सुप्रियाताई सुळे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या तालुका स्तरीय कृषी कट्टयाचे आयोजन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई–विभागीय केंद्र अहमदनगर अंतर्गत भायगाव, तालुका शेवगाव, जि. अहमदनगर येथील नवनाथ बाबा मंदिर येथे करण्यात आले होते. या कृषी कट्यात 'एकात्मिक अन्न द्रव्य व्यवस्थापन' (ऊस व कापूस) या विषयाची सविस्तर माहिती सर्व शेतकऱ्यांना तज्ञ प्रा. डॉ. अनिल दुर्गुडे (मृदा व कृषी रसायनशास्त्र विभाग, म.फुले.कृषी विद्यापीठ, राहुरी) यांनी दिली.

हा कृषि कट्ट्याचा कार्यक्रम सकाळी ९.०० ते ११.३० या वेळेत घेण्यात आला होता. कार्यक्रमास ३९ शेतकरी व ३३ कृषी कन्या विद्यार्थिनींचा सहभाग होता. सदर कार्यक्रमात ऊस व कापूस पिकात अन्न द्रव्य व्यवस्थापन या विषयी सखोल माहिती दिली व शेतकऱ्यांच्या सर्व शंका योग्य प्रकारे सोडवल्या. हा कार्यक्रम मा. श्री. प्रशांत पाटील गडाख (सचिव, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र अहमदनगर) यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडला.

**शेतकरी मेळावा व चर्चासत्र : जुलै २०१७ :**

कृषी दिनाचे औचित्य साधून शेतकरी मेळावा व चर्चासत्राचे आयोजन कृषी महाविद्यालय सोनई, ता. नेवासा येथे करण्यात आले होते. याप्रसंगी डॉ. मुकुंदराव गायकवाड (कुलपती, अरविंद कृषी विद्यापीठ नागपूर) हे प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित होते. श्री गायकवाड यांनी शेती, जागतिक आयात–निर्यात, कृषी क्षेत्रासाठी मुक्त धोरण, शेती क्षेत्रातील प्रगतीचा आढावा व शेतीची सद्यःस्थिती याविषयी सविस्तर मार्गदर्शन व चर्चा केली.

याप्रसंगी श्री नानासाहेब रेपाळे, श्री दत्तात्रय बऱ्हाटे, श्री जगन्नाथ औटी आदीसह शेतकरी बांधव बहुसंख्येने उपस्थित होते. हा शेती कट्टा यशस्वी करण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र अहमदनगरचे सर्व सन्माननीय सदस्य व कृषी महाविद्यालय, सोनई चे प्राचार्य व कृषी कटटा समन्वयक आदीसह नेवासा तालुक्यातील शेतकरी प्रयत्नशील होते.

**कृषी कट्टा : ऑगस्ट २०१७ :**

कांदा व ऊस उत्पादन तंत्रज्ञान याविषयीचा शेती कटटा तरवडी, ता. नेवासा या ठिकाणी संपन्न झाला. याप्रसंगी श्री. नारायण निबे, विषय विशेषज्ञ कृषी विद्यापीठ विभाग, कृषी विज्ञान केंद्र दहीगाव हे प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित होते. श्री निबे यांनी ऊस व कांदा ही नगदी पिके आहेत. या पिकांच्या किफायतशीर उत्पादनांतून शेतकरी बांधव आपला सर्वांगीण विकास साधू शकतात म्हणून कांदा व ऊस या दोन्ही पिकांचे तंत्रज्ञान व शेती कौशल्य याविषयी माहिती सविस्तरपणे दिली.

याप्रसंगी श्री बाबासाहेब घुले, श्री जालिंदर गवळी, श्री पांडुरंग वडगे आदीसह शेतकरी बांधव उपस्थित होते. हा शेती कट्टा यशस्वी करण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र अहमदनगरचे सर्व सन्माननीय सदस्य व कृषी महाविद्यालय, सोनई चे प्राचार्य व कृषी कट्टा समन्वयक आदीसह तरवडी, ता. नेवासा येथील शेतकरी प्रयत्नशील होते.

**युवा स्वातंत्र्य जागृती रॅली : दि. १४ ऑगस्ट २०१७ :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई अंतर्गत संपूर्ण वर्षभर राज्यभरातील विविध विभागीय केंद्राअंतर्गत समाजजागृती, समाज उपयोगी व राष्ट्रभक्ती, राष्ट्रचेतना, सामाजिक व सर्वांगीण विकास यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. यावर्षी सालाबादप्रमाणे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई अंतर्गत खा. शरदचंद्रजी पवार साहेब, (अध्यक्ष, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई) व मा. खा. सुप्रियाताई सुळे (कार्याध्यक्ष यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई,) मा. शरदजी काळे (सचिव यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई) यांच्या प्रेरणेने स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला (युवा)

स्वातंत्र्य ज्योत रॅलीचे आयोजन तरूणाईमध्ये राष्ट्रभक्तीची भावना निर्माण व्हावी व समाजात राष्ट्रप्रेम निर्माण व्हावे यासाठी करण्यात आले.

युवा स्वातंत्र्य जागृती रॅली अंतर्गत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र अहमदनगर अंतर्गत मा. खा. यशवंतरावजी गडाख (अध्यक्ष यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई–विभागीय केंद्र अहमदनगर) व मा. प्रशांत पा. गडाख (सचिव यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र अहमदनगर) यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवार दि. १४ ऑगस्ट २०१७ रोजी आदर्श गाव मोरया चिंचोरे येथे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र अहमदनगर आणि स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालय, मोरयाचिंचोरे यांच्या संयुक्त विद्यमाने युवा स्वातंत्र्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

मंगळवार दि. १५ ऑगस्ट २०१७ रोजी ७१ वा स्वातंत्र्य दिन सोहळा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई–विभागीय केंद्र अहमदनगर यांच्या विद्यमाने सोनई, ता. नेवासा येथे साजरा करण्यात आला. याप्रसंगी ध्वजारोहण कार्यक्रम महंत सुनिलगिरीजी महाराज श्रीक्षेत्र त्रिवेणीश्वर देवस्थान हंडीनिमगाव, ता. नेवासा यांच्या हस्ते संपन्न झाला.

---

**चर्चासत्र : १८ ऑगस्ट २०१७ :**

**विषय :** ऊस व कांदा उत्पादन तंत्रज्ञान

**ठिकाण :** कुकाणा ता. नेवासा (कुकाणा व तरवडी संयुक्त)

**सहभागी शेतकरी वर्ग :** ७९

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र, अहमदनगर अंतर्गत ऊस व कांदा उत्पादन तंत्रज्ञान या शेती कट्ट्याचे आयोजन तरवडी ता. नेवासा, येथे तरवडी व कुकाणा परिसरातील शेतकऱ्यांसाठी संयुक्तरित्या करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून श्री. नारायण निबे (विषय विशेषज्ञ, कृषि विद्या विभाग, कृषि विज्ञान केंद्र, दहिगावणे) व डॉ. पतींग साबळे (सहाय्यक प्राध्यापक, उद्यानविद्या विभाग, कृषि महाविद्यालय, सोनई हे उपस्थित होते. या प्रसंगी तज्ज्ञ मार्गदर्शकांनी ऊस व कांदा उत्पादनासाठी योग्य बियाणे निवड, हंगामाची निवड, खते व पाणी व्यवस्थापन, कीड व रोग नियंत्रण, काढणीची वेळ तसेच कमी कालावधीत कमी खर्चात अधिक उत्पादन या विषयी शेतकऱ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.

या प्रसंगी श्री. शंकरराव कन्हेरकर, श्री. सुनिल भारस्कर व श्री. रामभाऊ तुपे, कृषि महाविद्यालय, सोनईचे प्राचार्य, डॉ. हरी मोरे, प्रा. डॉ. पतींग साबळे, प्रा. राजेंद्र लिपणे व कुकाणा व तरवडी परिसरातील प्रगतशिल शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा शेतीकट्टा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई–विभागीय केंद्र, अहमदनगर येथील सर्व सन्माननीय सदस्य व श्री. शंकरराव कान्हेरकर, श्री. सुनिल भारस्कर व श्री. रामभाऊ तुपे यांचे विशेष सहकार्य लाभले.

---

**चर्चासत्र : ७ सप्टेंबर २०१७ :**

**विषय :** ऊस व कांदा उत्पादन तंत्रज्ञान

**ठिकाण :** खेड ता. कर्जत

**सहभागी शेतकरी वर्ग :** ४५

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई –विभागीय केंद्र, अहमदनगर अंतर्गत ऊस व कांदा उत्पादन तंत्रज्ञान या शेती कट्ट्याचे आयोजन खेड ता. कर्जत येथे करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख तज्ञ मार्गदर्शक म्हणून श्री. नारायण निबे (विशेष विशेषज्ञ, कृषि विद्या विभाग कृषि विज्ञान केंद्र, दहिगावणे) व डॉ. पतींग साबळे (सहाय्यक प्राध्यापक, उद्यानविद्या विभाग कृषि महाविद्यालय सोनई) हे उपस्थित होते. या प्रसंगी तज्ञ मार्गदर्शकांनी ऊस व कांदा उत्पादनासाठी योग्य बियाणे निवड, हंगामाची निवड, खते व पाणी व्यवस्थापन, कीड व रोग नियंत्रण, काढणीची वेळ तसेच कमी कालावधीत कमी खर्चात अधिक उत्पादन या विषयी शेतकऱ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.

या प्रसंगी श्री. भाऊसाहेब मोरे, श्री. विजय साळुंके, श्री. योगेश जाधव, प्रा. डॉ. पतींग साबळे, प्रा. राजेंद्र लिपणे व खेड ता. कर्जत परिसरातील प्रगतिशील ऊस बागायतदार शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

हा शेतीकट्टा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई–विभागीय केंद्र, अहमदनगर येथील सर्व सन्माननीय सदस्य व श्री. मुकुल मोरे (एम.एस्सी.ॲग्री. कृषि अर्थशास्त्र विभाग, कृषि महाविद्यालय, लातूर विद्यार्थी), श्री. विजय साळुंके (बी.एस्सी ॲग्री. कृषि महाविद्यालय, सोनई माजी विद्यार्थी) व खेड ग्रामस्थांचे विशेष सहकार्य लाभले.

---

**चर्चासत्र : १२ ऑक्टोबर २०१७ :**

**विषय :** गहू व हरबरा उत्पादन तंत्रज्ञान

**ठिकाण :** कोपरगांव (रहाता व कोपरगांव तालुक्यासाठी संयुक्त)

**सहभागी शेतकरी वर्ग :** ६४

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र, अहमदनगर गहु व हरभरा उत्पादन तंत्रज्ञान या शेती कट्ट्याचे आयोजन मार्केट यार्ड, कोपरगांव व राहता तालुक्यासाठी संयुक्तरित्या करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून म. फु. कृ. वि. राहुरी येथील कृषी तंत्रज्ञान माहिती केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. कल्याण देवळाणकर उपस्थित होते. या प्रसंगी डॉ. देवळणकर यांनी गहू व हरबरा उत्पादनासाठी योग्य जातींचे बियाणे निवड, खते व पाणी व्यवस्थापन, कीड व रोग नियंत्रण, काढणीची वेळ तसेच कमी कालावधीत, कमी खर्चात अधिक उत्पादन या विषयी शेतकऱ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.

या प्रसंगी श्री. अंबादास आढाव, श्री. मनोज सोनावणे (तालुका कृषी अधिकारी, कोपरगांव), श्रीमती रंजनाताई आढाव (सेंद्रीय शेती, शेतकरी), कृषी महाविद्यालय, सोनईचे प्राचार्य डॉ. हरी मोरे, प्रा. योगेश जाधव, प्रा. डॉ. पतींगे साबळे, प्रा. राजेंद्र लिपणे व श्री. छत्रपती शिवाजी राजे गटाचे शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा शेतीकट्टा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई–विभागीय केंद्र, अहमदनगर येथील सर्व सन्माननीय सदस्य व श्री. अंबादास आढाव प्रगतिशील शेतकरी, कोपरगांव यांचे विशेष सहकार्य लाभले.

## स्त्री व समाज

जेव्हा स्त्रीत बदल होत जातो, तेव्हा समाजातही बदल होणं अटळ असतं. समाजबदलाची प्रक्रिया ही स्त्रीच्या बदलात प्रतिबिंबित होत असते. समाजबद्धलाची ती इंडेक्स असते. कोणत्याही समाजात बदल होत आहे की नाही, होत असेल, तो किती, कसा होतो आहे, जे अभ्यासायचं असेल, तर स्त्रीमधील बदल लक्षात घेतला, तरी कळू शकतं.

म्हणून म्हणावंसं वाटतं, भारतीय समाजात निश्चितपणे बदल घडू पाहताहेत, कारण भारतीय स्त्री बदलते आहे. हुंडाविरोधी, बलत्काराविरोधी आंदोलन करायला घरातील स्त्री आता रस्त्यावर येत आहे. समाजात बदल घडवायला, समाजातील दीनदुबळ्यांना प्रेम द्यायला ती हिरीरीनं पुढ सरसावली आहे. स्त्रीनं पुरुषाला संसारात सुख दुःखात साथ दिली. आता पुरुषानंही तिला साथ देण्यासाठी आपणहून पुढं यायला हवं.

– मा. यशवंतराव चव्हाण

# विभागीय केंद्र, सोलापूर

## कार्यवृत्त

**चित्रपट चावडी 'उदाहरणार्थ नेमाडे' : ७ ऑगस्ट २०१७**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र सोलापूर च्या वतीने अक्षय इंडीकर दिग्दशीत 'उदाहरणार्थ नेमाडे' या चित्रपटाचे आयोजन आनंद यात्री प्रतिष्ठानयांच्या सहकार्याने दि.०५ ऑगष्ट रोजी बार्शी येथील यशवंतराव चव्हाण सभाग्रहात संपन्न झाले. ६ ऑगष्ट रोजी मंगळवेढा येथील भारत टॉकीज रत्न प्रभा सोशल फौंडेशन यांच्या सहकार्याने दाखण्यात आला व ७ ऑगष्ट रोजी दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाच्या सहकार्याने सोलापूर शहरात या चित्रपटाचे आयोजन केले होते.

शहराबरोबरच ग्रामीण भागातही हा उपक्रम पोहचवण्यासाठी बार्शी व मंगळवेढा येथे आयोजित करण्यात आला, यासाठी विभागीय केंद्राचे सदस्य राहुल शहा व नागेश अक्कलकोटे यांचे मोलाचे सहकार्य लाभले सोलापूरात उद्योगपती श्री दत्ता अण्णा सुरवसे यांनी 'हॉटेल सूर्या'च्या वतीने ऑस्करची प्रतिकृती देऊन अक्षय इंडीकर यांना सन्मानित केले.

**लघुपट निर्मिती कार्यशाळा**

नव महाराष्ट्र युवा अभियानाचा उपक्रम विभागीय केंद्र सोलापूर प्रयोग मालाड व निर्मल कुमार फडकुले प्रतिष्ठान सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने लघुपट निर्मिती कार्यशाळेचे आयोजन ०६ ऑक्टोबर २०१७ रोजी निर्मल कुमार फडकुले सभागृहात करण्यात आले. याप्रसंगी प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक श्री अशोक राणे, श्री महेंद्र तेरेदेसाई यांनी मार्गदर्शन केले, विषयाची निवड पटकथा आणि लघुपटातून त्याची मांडणी आणि त्याचा प्रभाव अशा अनेक पैलूंवर मार्गदर्शन केले. यासाठी दोन लघुपट दाखण्यात आले, त्यातून प्रभावी मांडणीबाबत सखोल चर्चा करण्यात आली, १२० युवक व युवतींनी यात सहभाग नोंदवला होता. यात ग्रामीण भागातील युवा व युवतींची संख्या मोठ्या प्रमाणात होती.

या कार्यशाळेचे उद्घाटन विभागीय केंद्राचे श्री राजशेखर शिवदारे, माजी खासदार धर्माणा सादूल, रंगकर्मी सशिकांत लावणीस, आनंद कोलालकर, शिवाजी शेडगे यांच्या उपस्थितत झाले कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय केंद्राचे सदस्य श्री दत्ता गायकवाड यांनी केले व दिनेश शिंदे यांनी आभार मानले.

# विभागीय केंद्र, अंबाजोगाई

## कार्यवृत्त

दि. १४ ऑगस्ट २०१७ रोजी यशवंतराव प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र, अंबाजोगाई यांच्यावतीने युवा स्वतंत्र्यता ज्योत रॅली २०१७ चे आयोजन करण्यात आले होते, या रॅलीचे उद्घाटन दि. १४ ऑगस्ट २०१७ रोजी ठिक ६:३० वा. करण्यात आले, यावेळी उद्घाटक म्हणून 'मानवलोक'चे अध्यक्ष डॉ. द्वारकादासजी लोहिया, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा उपस्थित होते यावेळी युवा स्वतंत्र्यता ज्योत रॅलीची सुरुवात नगरपालिका ऑफीस येथून तहसील कार्यालय मार्गे, मंडी बाजार, शिवाजी चौक ते नगरपालिका ऑफीस येथे समारोप करण्यात आला, यावेळी तरुणांनी 'भारत माता की जय', 'वंदे मातरम', 'इन्कलाब झिंदाबाद', आदी घोषणा दिल्या, युवा स्वतंत्र्यता ज्योत रॅलीच्या शेवटी भारतीय सविंधानाच्या सरनाम्याचे वाचन करुन घेण्यात आले, यानंतर राष्ट्रगीताने रॅलीचा समारोप करण्यात आला, यावेळी रॅलीमध्ये सहभागी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण विभागीय केंद्र अंबाजोगाई चे सचिव डॉ. नरेंद्र काळे, दगडू लोमटे, अक्षय मुंदडा,अंबाजोगाईचे उपनगराध्यक्ष सारंग पुजारी, अनिकेत लोहिया, मा. आ. पृथ्वीराज साठे, राजकिशोर मोदी, अँड. जयसिंग चव्हाण, अभिजीत जोंधळे, मुजीब काझी, प्रा. मुकूंद राजपंखे, अँड. संतोष लोमटे, डॉ. महेन्द्र जाधव, सुनील चिखले,अँड. प्रशांत शिंदे, दिग्विजय लोमटे, रंजीत मोरे, गोंविद टेकाळे, आशिष जाधव, अंकुर मोरेसह विविध सामाजिक संघटनाचे २०० ते २५० कार्यकर्ते उपस्थित होते.

### प्रगती व समस्या

एखादी योजना आपण आखतो, ती पार पाडू लागतो, त्या वेळी तिच्या सामाजिक, आर्थिक परिणामांची समग्र जाणीव अनेकदा आपल्यास होत नाही. जसजसे आपण त्या मार्गाने पुढे जातो, तसतसे आपणांस नवे प्रश्न दिसू लागतात. उदाहरणच द्यावयाचे झाले तर शिक्षणाचे देता येईल. शिक्षणाचा अनिर्बंध प्रसार व्हावा, अशा मताचा मी होतो आणि आजही आहे. शेकडो वर्षे निरक्षरतेच्या, अज्ञानाच्या अंधारात चाचपडणाऱ्या भारताला विज्ञानाचा प्रकाश लवकरच दिसावा, ही त्यामागची तळमळ होती. ही विज्ञानाची कवाडे उघडली, प्रकाश आला आणि त्यामुळे नवा, तंत्रज्ञानाचा वर्ग निर्माण झाला. त्यातूनच बेकार तंत्रज्ञांची व शिक्षितांची समस्या आज आपल्यापुढे उभी आहे. एखाद्या वर्गाला पुढचे भवितव्य स्पष्ट दिसले नाही, की तो अस्वस्थ होतो. काहीतरी नवा मार्ग शोधतो. शासन अशा वर्गाबाबत थंड व उदासीन राहिले, तर त्या वर्गाच्या असंतोषाला राजकीय स्वरूप येते. हा राजकीय असंतोष एका शैक्षणिक धोरणातून निर्माण झालेला आहे, असे लक्षात येते. समाजातील तंग परिस्थिती अशा अनेक कारणांमुळे निर्माण होते.

– मा. यशवंतराव चव्हाण

# विभागीय केंद्र, ठाणे

## कार्यवृत्त

**मुशायरा : ११ जून २०१७ :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या ठाणे केंद्राने रविवार दिनांक ११ जून २०१७ रोजी ५.३० वाजता 'मुशायरा' हा मराठी, हिंदी तसेच उर्दू गझल गायनाचा कार्यक्रम मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे येथे आयोजित केला होता. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा.श्री. नितीन आरेकर यांनी केले. ख्यातनाम उर्दू गझलकार श्री. इरफान जाफरी यांच्या उर्दू गझलांनी कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या प्रसंगी हिंदी गझलकार श्रीमती सुलभा कोरे तसेच श्री लक्ष्मण शर्मा यांनी आपल्या गझलांनी उपस्थितांची मने जिंकून घेतली. सदर कार्यक्रमास मराठी गझल सादर करण्यासाठी श्री. डॉ. महेश केळुस्कर, श्री. प्रशांत मोरे, श्री. शशीकांत तिरोडकर तसेच प्रा. श्रीमती प्रतिभा सराफ अशा मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले होते. दर्जेदार रसिकांनी या कार्यक्रमास आवर्जून उपस्थिती लावल्याचा आनंद भरगच्च गर्दी बघून निमंत्रितांना, झाला ते त्यांच्या खुमासदार काव्यांमधून प्रतीत झाले.

**शिक्षण दिन २ सप्टेंबर २०१७ :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईच्या ठाणे केंद्रातर्फे शिक्षक दिनाच्या पूर्व संध्येला दिनांक २ सप्टेंबर २०१७ रोजी विविध क्षेत्रात ज्ञानार्जनाचे निरलसपणे काम करणाऱ्या ५ शिक्षिकांचा सत्कार करण्यात आला. हा कार्यक्रम ठाणे पूर्व मधील मंगला हायस्कूलच्या सभागृहात सायंकाळी ५ वाजता आयोजित केला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी निवडणूक आयुक्त सौ. नीला सत्यनारायण, उपस्थित होत्या. कार्यक्रम सुरू करण्याआधी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, पत्रकार आणि साहित्यिक श्रीमती शिरीष पै यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या फोटोला हार घालून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सचिवांचे प्रास्ताविक आणि अध्यक्षांच्या सत्कारानंतर सौ मोनिका नाले यांनी उपस्थित पाचही शिक्षिकांची मुलाखत घेतली. कर्णबधीर मुलांना शिकविताना येणारे अनुभव सौ. वर्षा वैद्य व सौ. छाया घाडगे या दोघींनी मुलाखती दरम्यान विस्तृतपणे उपस्थित जनसमुदायासमोर मांडले. बाहुली नाट्यातून विद्यार्थ्यांना विषयाचे आकलन होते, हे सौ. प्रज्ञा जोशी यांनी त्यांच्या मुलाखतीमध्ये सांगितले. झोपडपट्टीतल्या मुलांना शिकवताना किती वेगवेगळ्या समस्यांना तोंड द्यावे लागते, हे सौ. गीता बलोदी यांनी सांगितल्यावर उपस्थित लोक अचंबित झालेत.कुमारी रूचिका इरकशेट्टीचे मतिमंद मुलांसाठी काम करत असताना त्यांच्या पालकांचा मुलांकडे बघण्याचा दृष्टिकोन व तुटपुंज्या निधीत करावी लागणारी कसरत ऐकून सभागृहातील प्रेक्षकांतून सहानुभूतीपर विचार येऊ लागले व मदतीचा ओघ उपस्थितांमधून येण्यास सुरुवात झाली. यावेळी काही दिव्यांग मुलांनी आपले अनुभव व प्रगती सांगितली. प्रत्येक शिक्षिकेच्या मुलाखतीनंतर त्यांचा सत्कार सौ. नीला सत्यनारायण यांच्या हस्ते करण्यात आला. प्रत्येकाला शाल, श्रीफळ, पुस्तक व प्रमाणपत्र देण्यात आले. आपल्या अध्यक्षीय भाषणात सौ. नीला सत्यनारायण यांना सर्वच शिक्षिकांच्या कार्याचा गौरव तर केलाच, पण यशवंतराव चव्हाण प्रतिष्टानच्या या उपक्रमाचे तोंडभरून कौतुक केले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान ठाणे केंद्राने अशा शिक्षिकांच्या कार्याची दखल घेतली त्यासाठी देखील त्यांनी केंद्राचे आभार मानले.

**ज्येष्ठ नागरिक दिन : ३ ऑक्टोबर २०१७**

मंगळवार दिनांक ०३ ऑक्टोबर २०१७ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, ठाणे केंद्र व रोटरी क्लब ऑफ ठाणे नॉर्थ यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून ठाण्यातील सहयोग मंदिराच्या सभागृहात सायंकाळी ५.३० वाजता सुप्रसिद्ध गायिका सौ अनुजा वर्तक व श्री. भगवंत कुलकर्णी यांच्या 'वन ॲण्ड ओन्ली आशा' हा संगीताचा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी सामाजिक क्षेत्रात भरीव कामगिरी केलेल्या पाच ज्येष्ठ नागरिकांचा डॉ. सौ. मंजिरी देव, डॉ. सौ. माधुरी पेजावर, श्री अविनाश व सौ. नंदिनी बर्वे, श्रीमती सुनंदाताई पटवर्धन, श्री. सदाशिव टेटविलकर सत्कार करण्यात आला. हा सत्कार ठाणे महानगरपालिकेचे निवृत्त आयुक्त श्री. प्रभाकर मणचेकर (आय.ए.एस.) यांच्या अध्यक्षतेखाली झाला. कार्यक्रमात श्रीमती आशा भोसले यांनी गायलेल्या अप्रतिम गाण्यांचा आस्वाद रसिकांना मनमुराद लुटण्यासाठी सुवर्णसंधी विनामूल्य मिळाली. कार्यक्रमाला रसिकांनी भरपूर गर्दी केली होती.

# देवराष्ट्रे अहवाल

दि. १ जून २०१७ ते ३० सप्टेंबर २०१७ या कालावधीत जन्मघर स्मारकास ९९६ पर्यटकांनी तर विविध ठिकाणच्या ३ जि.प. शाळेच्या ३३५ विद्यार्थांनी भेट दिली.

दि. १ जून २०१७ रोजी यशवंतराव चव्हाण जन्मघर स्मारकास श्री.दीपक बबनराव नलवडे (अप्पर जिल्हाधिकारी तथा उपायुक्त ,पुनर्वसन विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे) यांनी भेट दिली.

दि. १८ ऑगस्ट २०१७ रोजी विठामाता चव्हाण स्मुतीदिन साजरा करण्यात आला. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई ,केंद्र देवराष्ट्रे व यशवंतराव चव्हाण हायस्कूल याच्या संयुक्त विद्यमाने कथाकथनाचा कार्यक्रम पार पाडला. श्री. बी. के. शिंदे यांच्या कथाकथनकार हस्ते कथाकथनकार रमजान मुल्ला यांना 'कृष्णाकाठ' हे पुस्तक व गुलाब पुष्प देऊन श्री.मुल्ला यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून कथाकथनकार श्री.रमजान मुल्ला व कराड विभागाचे श्री.मोहनराव डकरे याचे हस्ते विठामाता यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

या कार्यक्रमावेळी मुल्ला म्हणाले, की पतीच्या निधानंतर विठामाता चव्हाण अत्यंत कष्टमय जीवन जागल्या, त्यांच्या ओव्या समाजाला दिशादर्शक व प्रेरणादायी आहेत. यशवंतराव साहित्याचा गुण त्यांच्या आईकडूनच मिळाला. आज संस्काराची मुल्ये हरवत चालली आहेत, यावेळी आईची महती सागणाऱ्या अनेक कविता व कथा त्यांनी सादर केल्या, व उपस्थितांची दाद मिळवली.

यावेळी देवराष्ट्रे गावच्या महिला सरपंच सौ. जयश्री मोरे, माजी उपसभापती मोहनराव मोरे, माजी सभापती सौ. शोभाताई होनमाने,तसेच पंचायत समितीच्या सदस्या सौ.स्मिता महिंद व इतर मान्यवर उपस्थित होते. श्री. बी. के. शिंदे सर यांनी प्रमुख पाहुण्यांचे व मान्यवरांचे आभार मानले.

कुसुमाग्रज प्रतिष्ठान नाशिक अंतर्गत चालवली जाणारी योजना ग्रंथ तुमच्या दारीया योजनेअंतर्गत सांगली जिल्ह्यामध्ये एकूण १३ पेट्या आहेत. त्यातील २ पेट्या देवराष्ट्रे केंद्रामध्ये आहेत. या योजनेअंतर्गत सर्वात जास्त वाचक देवराष्ट्रे केंद्रामध्ये असल्यामुळे कुसुमाग्रज प्रतिष्ठान नाशिकचे वाचन समितीचे अध्यक्ष श्री.विनायक रानडे यांनी देवराष्ट्रे केंद्राचे अभिनंदन केले व या वाचन चळवळीचा उद्देश पार पडल्याचे सागितले.

मा. चव्हाण साहेबांच्या जन्मघरात चालवल्या जाणाऱ्या वाचनालायाचा देवराष्ट्रे व देवराष्ट्रे गावच्या जवळच्या गावांना चांगलाच फायदा होत आहे. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या मुलांची संख्या ५४ आहे तर सर्वसाधरण वाचकांची संख्या ही १९० पर्यंत पोहोचली आहे. तसेच प्रतिष्ठानने देवराष्ट्रे केंद्रामध्ये २ संगणक दिले आहेत, त्या संगणकावरती विद्यार्थांनी स्पर्धा परीक्षेचे फॉर्म भरणे,नोकरी संदर्भात माहिती मिळवणे सोपे झाले आहे.संगणक वापरावयास येणाऱ्या विद्यार्थ्यांकडून कोणतेही शुल्क आकारले जात नाही.

# यशवंतराव चव्हाण राज्य पारितोषिक पुरस्कारप्राप्त मान्यवर

| सन | पारितोषिक विजेता | पारितोषिक |
|---|---|---|
| १९९० | मा. तात्यासाहेब कोरे | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| १९९१ | मा. बाबा आढाव | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| १९९२ | मा. विजय बोराडे | ग्रामीण विकास पारितोषिक |
| १९९३ | मा. नारायण सुर्वे | मराठी साहित्य-संस्कृती पारितोषिक |
| १९९४ | मा. आप्पासाहेब चमणकर | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| १९९६ | श्रीमती शांताबाई दाणी | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| १९९६ | मा. अरूण निकम | ग्रामीण विकास पारितोषिक |
| १९९७ | मा. शंकरराव खरात | मराठी साहित्य-संस्कृती पारितोषिक |
| १९९८ | डॉ. जयंतराव पाटील | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| १९९९ | मा. दादासाहेब रुपवते | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| २००० | सर्च-शोधग्राम, गडचिरोली | ग्रामीण विकास पारितोषिक |
| २००१ | कवयित्री शांता शेळके | मराठी साहित्य-संस्कृती पारितोषिक |
| २००२ | 'प्रयोग' परिवार | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| २००३ | डॉ. यु. म. पठाण | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| २००४ | डॉ. चित्रा नाईक | ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास |
| २००५ | पं. भीमसेन जोशी | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २००६ | श्री. भंवरलाल जैन | कृषी-औद्योगिक समाजरचना/व्यवस्था प्रशासन पारितोषिक |
| २००७ | श्री. अनिल काकोडकर | सामाजिक एकात्मता विज्ञान-तंत्रज्ञान पारितोषिक |
| २००८ | प्राचार्या लीला पाटील | ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास |
| २००९ | श्रीमती किशोरी आमोणकर | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २०१० | श्री. सा. रे. पाटील | कृषी-औद्योगिक समाजरचना/ व्यवस्था प्रशासन पारितोषिक |
| २०११ | मराठी विज्ञान परिषद, मुंबई | सामाजिक एकात्मता विज्ञान-तंत्रज्ञान पारितोषिक |
| २०१२ | मातृमंदिर, देवरुख, रत्नागिरी | ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास |
| २०१३ | मा. श्री. गोविंदराव तळवलकर | मराठी साहित्य संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २०१४ | मा. श्री. शरद जोशी | कृषी-औद्योगिक समाजरचना/व्यवस्था प्रशासन |
| २०१५ | श्रीमती अरुनिमा सिन्हा | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २०१६ | श्री. प्रतापशेठ साळुंखे | ग्रामीण विकास/आर्थिक सामाजिक विकास |
| २०१७ | श्री. भुजंगराव कुलकर्णी | कृषि औद्योगिक समाज रचना/व्यवस्थापन प्रशासन |

# यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त मान्यवर

| अ. नं. | पुरस्कार प्राप्त मान्यवराचे नाव | वर्ष |
|---|---|---|
| १ | प्राध्यापक मधु दंडवते | १९९५ |
| २ | श्री. बियांत सिंग– मरणोत्तर | १९९६ |
| ३ | डॉ. सी. सुब्रमण्यम् | १९९७ |
| ४ | श्रीमती इला भट | १९९८ |
| ५ | श्रीमती आवाबाई वाडिया | १९९९ |
| ६ | श्री. सुंदरलाल बहुगुणा | २००० |
| ७ | डॉ. व्ही. कुरियन | २००१ |
| ८ | डॉ. जयंत नारळीकर | २००२ |
| ९ | श्री. आर. के. लक्ष्मण | २००३ |
| १० | न्या. व्ही.आर. कृष्णा अय्यर | २००४ |
| ११ | श्री. सॅम पित्रोदा | २००५ |
| १२ | श्री. नारायण मूर्ती व सौ. सुधा मूर्ती | २००६ |
| १३ | श्री. आर. के पचौरी व श्रीमती सरोज पचौरी | २००७ |
| १४ | इस्त्रो – (इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन) | २००८ |
| १५ | प्रो. यश पाल | २००९ |
| १६ | श्रीमती महाश्वेता देवी | २०१० |
| १७ | एअर चीफ मार्शल श्री. अर्जुनसिंग | २०११ |
| १८ | डॉ. ई. श्रीधरन | २०१२ |
| १९ | श्री. झुबिन मेहता | २०१३ |
| २० | श्री. रतन टाटा | २०१४ |
| २१ | डॉ. विजय केळकर | २०१५ |
| २२ | श्री. नंदन निलेकणी | २०१६ |

# प्रतिष्ठानची विक्रीसाठी असलेली प्रकाशने

| | | |
|---|---|---|
| १. | यशवंतराव चव्हाण : विधिमंडळातील निवडक मराठी भाषणे : भाग १ – संकलन : डॉ व्ही जी खोबरेकर | २५०.०० |
| २. | वाय. बी. चव्हाण : सिलेक्टेड स्पीचेस – विधिमंडळ – भाग २ – संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| ३. | सिलेक्टेड स्पीचेस इन पार्लमेंट – वाय. बी. चव्हाण – खंड १ ते ४ संपादक : राम प्रधान प्रत्येकी | २५०.०० |
| ४. | यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार संकलन – ना. धों. महानोर | १.०० |
| ५. | सह्याद्री वारे – यशवंतराव चव्हाण | २५०.०० |
| ६. | म. जोतिबा फुले यांचे निवडक विचार संकलन – प्रा. गजमल माळी | १२.०० |
| ७. | बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास – संपादक – वि. स. पागे | ३५.०० |
| ८. | महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन – संपादन : अण्णासाहेब शिंदे | २००.०० |
| ९. | महाराष्ट्र : एक दृष्टिकोन – शरदराव पवार – भाषणसंग्रह – संपादन : दादासाहेब रुपवते | ७५.०० |
| १०. | पंचायत राज, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास संपादन : पी. बी. पाटील | १००.०० |
| ११. | नवभारत : परिवर्तनाची दिशा – संपादन : पी. बी. पाटील | |
| १२. | विमुक्तायन : महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : चिकित्सक अभ्यास संशोधक / लेखक – लक्ष्मण माने | २५०.०० |
| १३. | महिलांसंबंधीचे धोरण : स्वयंसिद्धतेकडे वाटचाल – डॉ. नीलम गोऱ्हे | १५.०० |
| १४. | यशवंतराव चव्हाण – चरित्र – लेखक – अनंतराव पाटील | ८०.०० |
| १५. | शब्दाचे सामर्थ्य – संपादन : राम प्रधान | ३७५.०० |
| १६. | महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल : एक आढावा (इंग्रजी) | |
| | (यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांचे संयुक्त प्रकाशन) | २५०.०० |
| १७. | बाउंटीफुल बनियान – डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील चरित्र – खंड ४ (इंग्रजी) बॅ. पी. जी. पाटील | ८००.०० |
| १८. | ज्येष्ठ नागरिकांसाठी पुस्तिका | ३५.०० |
| १९. | अजिंठा – (काव्यसंग्रह) लेखक : ना. धों. महानोर (इंग्रजी) | १५०.०० |
| २०. | 'ई'बुक (मराठी/इंग्रजी) (यशवंत साहित्य / फोटो) | १५०.०० |
| २१. | न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा | ४००.०० |
| २२. | शैक्षणिक गुणवत्ता : आव्हान आणि आवाहन – डॉ. वसंत काळपांडे | २००.०० |
| २३. | हवामान बदल आणि महाराष्ट्र | ५०.०० |

| | |
|---|---|
| २४. उपक्रम : वेचक-वेधक - डॉ. वसंत काळपांडे | १००.०० |
| २५. स्त्रीरत्न सावित्रीबाई फुले - श्रीनिवास भालेराव | २०.०० |
| २६. स्त्रियांचे कायदे, आरोग्य आणि योजना - सुप्रिया सुळे | २०.०० |
| २७. 'संवादिनी' - सुप्रिया सुळे | २०.०० |
| २८. 'शाळांचे प्रगतिपुस्तक' डॉ. वसंत काळपांडे, बसंती रॉय, शुभदा चौकर | २००.०० |
| २९. Yashwantrao Chavhan : an Autobiography | ३९५.०० |
| ३०. यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र - कृष्णाकाठ | ३००.०० |
| ३१. यशवंतराव चव्हाण व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व | ५००.०० |
| ३२. शिक्षणवृत्ती - डॉ. कुमुद बन्सल | २००.०० |
| ३३. शिक्षणकट्टा - बसंती रॉय | २००.०० |
| ३४. वाटचाल ई-शिक्षणाची - बसंती रॉय | २००.०० |
| ३५. हवामान बदलास आमचे उत्तर | १००.०० |
| ३६. विचारसूत्रे - संपादन : पद्मभूषण देशपांडे | २००.०० |
| ३७. पाणीबाणी - प्रभाकर साळेगावकर | १६०.०० |
| ३८. पर्व-प्रगतीचे परिवर्तनाचे - पद्मभूषण देशपांडे (मराठीबरोबरच हिंदी, इंग्रजी, ऊर्दूतही उपलब्ध) | खाजगी वितरणासाठी |
| ३९. Whats App चर्चा- शिक्षण विकासाच्या - संपादक : माधव सुर्यवंशी, नितीन खंडागळे, किशोर भागवत | |

- डीव्हीडी व ऑडीओ कॅसेट्स
- मी एस. एम. : एस. एम. जोशी यांचा जीवनपट
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जीवनपट
- प्रवासी पक्षी : सुप्रसिद्ध साहित्यिक कुसुमाग्रज यांचा जीवनपट
- पु. ल. वृत्तान्त : पु. ल. देशपांडे यांचा जीवनपट
- वरील चारही व्हिडिओ कॅसेट्सची निर्मिती दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांची
- कॉ. केशवराव जेधे : कॉ. केशवराव जेधे यांचा जीवनपट, दिग्दर्शक - श्री. राम गबाले
- येस आय ॲम कम्युनिस्ट : कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या जीवनावरील अनुबोधपट, दिग्दर्शक : विनय नेवाळकर

- 'बशर नवाज : ख्वाब, जिंदगी और मै' माहितीपट, दिग्दर्शक – जयप्रद देसाई
- 'जागर हा जाणिवांचा....' लघुपट, दिग्दर्शक – चंद्रकांत कुलकर्णी
- 'कृष्णाकांठ' : ऑडीओ सी. डी. (ध्वनिमुद्रिका)

**चित्रपट**

- यशवंतराव चव्हाण... बखर एका वादळाची : दिग्दर्शक – जब्बार पटेल

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई निर्मित संकेतस्थळे**

- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे संकेतस्थळ – http://ybchavanpratishthan.org/
- यशवंतराव चव्हाण यांचे समग्र संदर्भ साहित्य – http://ybchavan.in
- धर्मानंद कोसंबी यांचे समग्र साहित्य – http://dharmanandkosambi.com/
- केतकरकृत महाराष्ट्रीय ज्ञानकोश – http://ketkardnyankosh.com/
- महर्षि विठ्ठल रामजी शिंदे समग्र साहित्य – http://virashinde.com/
- इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळाकडे उपलब्ध दुर्मीळ कागदपत्रांचे डिजिटायझेशन – http://vkrajwade.com

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
नवमहाराष्ट्र युवा अभियान | प्रयोग मालाड

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

# FILMINGO

आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सवाच्या निमित्ताने

## SHORT FILM MAKING WORKSHOP

लघुपट निर्मिती कार्यशाळा



मार्गदर्शक :
**अशोक राणे**
प्रसिद्ध समीक्षक, लेखक -दिग्दर्शक

मुंबई, बदलापूर, नाशिक, औरंगाबाद, अहमदनगर, अंबाजोगाई, पुणे, बारामती, आणि सोलापूर येथे संपन्न

■ लघुपट म्हणजे नेमके काय? ■ पटकथा लेखन ■ छायाचित्रण आणि संकलन ■ लघुपट निर्मितीची इतर अंगे ■ लघुपट त्यांचे आणि आपले इत्यादी विषयी विस्तृत मार्गदर्शन









यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
आयोजित

# युवा संवाद यात्रा

'जागर हा जाणिवांचा'





स्त्रीभ्रूणहत्या, हुंडाबळी, युवतींवरील अत्याचार व युवांच्या व्यसनाधीनता विरोधातील संवादयात्रा